# सापडलेला हरवला !

अगदी परवापरवापर्यंत विजय तेंडुलकर नावाच्या लेखकाबद्दल मला फारशी फिकिर नव्हती. वाटायचे की ह्या लेखकाच्या लेखनात जितके मिळेल त्यापेक्षा त्याच्याशी बोलण्याराहण्यात अधिक मिळते, अगदी अनंत हस्ते मिळते, नाना विषयांबद्दल रसरसून मिळते. इतर लेखक म्हणतात की, मला शोधायचे असेल तर माझ्या ग्रंथात शोधा, तिथे मी तुम्हाला सर्वार्थांनी आणि सर्वांगांनी सापडेन. पण तेंडुलकरांचे तसे नव्हते. त्यांची नाटके मी वाचली होती, पाहिली होती, त्यांच्या कथाही मी वाचल्या होत्या. पण त्या लेखनापेक्षाही त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलण्यात माणूसपणाचे जे विलोभनीय

२४ जानेवारी १९७०
चाळीस पैसे

# माणूस

दर्शन घडे, जो उल्हासमय प्रत्यय येई तो माझे जीवन समृद्ध आणि समुत्सुक करणारा असे. आणि म्हणून मला लेखक म्हणून विजय तेंडुलकरांची फारशी पर्वा वाटत नसे. मी माणूस म्हणून त्यांच्या सहवासात राहण्यातच पूर्ण समाधानी असे. आणि ही गोष्ट इतकी विरळ आणि खाजगी असे की कधी कधी माझ्या मनात असा विचार येत असे, की जर कधी काळी 'विजय तेंडुलकर : एक माणूस' असा लेख लिहायचा असेल तेव्हा मला फार आणि विविध अनुभवांचा खजिना उलगडून दाखवण्याची अपूर्व संधी मिळेल. पण हे माझे स्वप्न विजय तेंडुलकरांनी दोन तीन वर्षांपूर्वी पार उध्वस्त केले. महाराष्ट्र टाईम्समध्ये 'कोवळी उन्हे' हे सदर लिहून त्यांनी माझ्या खाजगी

मुखपृष्ठ २ वर.

...मुखपृष्ठ १ वरून

मक्तेदारीस नष्ट केले आणि आपल्या अनेकविध पैलूंनी समृद्ध व्यक्तित्त्वाचे विश्वरूपदर्शन सगळ्यांना मुक्तपणे करून देण्यास सुरुवात केली...आणि पुढे पुढे तर 'रातराणी'च्या सदरातून मानवी संस्कृतीची अंगप्रत्यंगे उमलून उमलून दाखविली. ती किती विविध आहेत ते पाहिले म्हणजे ह्या तेंडुलकर नामक माणसाचे जीवन किती नाना रंगांचे आणि पाकळ्यांचे आहे याचा साश्चर्य आनंद होतो....ह्या जीवनातील ही अनेक रंगी फुले तेंडुलकर नामक माणूस कशा हलक्या हातांनी टिपतो....

र. कृ. जोशीची Caligraphy पाहून तो लुब्ध होतो आणि त्याला घेऊन जवळच्या हॉटेलात जातो, तेथे चहाचे घुटके घेत अक्षरांचे व्यक्तिमत्त्व समजावून घेतो, ...कधी ब्रेबार्न स्टेडियमवर जाऊन कुत्र्यांच्या स्पर्धा अनिमिष नेत्रांनी पाहतो आणि एका कुत्र्याची पाचशे रुपये किंमत ऐकून भू: म्हणतो...नववर्षाच्या सुरुवातीला कॅलेंडर गोळा करण्याच्या हव्यासावर इतरांची टिकाटिप्पणी निमूटपणे ऐकून घेतो पण मनातल्या मनात म्हणतो की 'मी मात्र माझ्या घराच्या भिंतीवर मिळेल ते कॅलेंडर लावणार आहे...'

अमेरिकेतल्या निवडणुकींच्या निमित्ताने पत्र पाठवताना हा माणूस 'प्रभाकर पाध्ये खुशाल आहेत' अशी कोपरखळी मारण्यात टिंगलीचा आनंद मोकळेपणाने उपभोगतो....

'सबरंग' बडे गुलाम अली गेले ह्या वार्तेने ह्याच्या अंतःकरणात पाच वर्षांमागची एक रात्र पुन्हा दाटून येते आणि हा गानलुब्ध माणूस म्हणतो की, "आम्ही सारेच या विचारासरशी एकदमच एकमेकांकडे पाहतो – नजरात एकच भाव; छे, छे, गुलाम अली गेले नाहीत." ...कधी हाच माणूस 'पोरांच्या आग्रहाखातर' सर्कशीच्या तंबूत शिरतो आणि मृत्युगोलातल्या फटफटीवरच्या जीवघेण्या सुरकांड्यांपर्यंत रंगून जातो आणि विदूषक फार आवडला म्हणून मुलाला बिनदिक्कत सांगतो...कधी स्वतःतला अभिमानी लेखक बाजूस ठेवून आचार्य अत्रे ह्यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसाच्या दरबारी स्वागतसोहळ्यात सामान्य मराठी

मलपृष्ठ १ वर...

२४ जानेवारी १९७०

समग्र साप्ताहिक



# माणूस

वर्ष नववे : अंक चौतीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

मार्गाच्या शोधात आपण केलेले प्रगट चिंतन वाचले व माझी सम संवेदना व्यक्त करण्याकरिता पत्र लिहावयास घेतले. आपल्या समाजाच्या एका मूलभूत समस्येला आपण हात घातला आहे.


आमच्या I. I. T. मधल्या रिसर्च स्कॉलरपासून तुम्ही म्हणता त्या छोट्या शेतकऱ्यापर्यंत सगळ्यांनाच ते विवेचन लागू आहे. कोणती गोष्ट, कोणता विचार आम्हाला काय करावयास लावील, ह्याचे मुक्त मंथन आपल्याला सतत करावे लागेल.

देश उन्नतीसाठी लेनिन व माओ ह्यांनी आपले आपले मार्ग शोधले हे ह्या देशातील कम्युनिस्टांना अजून समजावयाचे आहे. कदाचित तीच गोष्ट भारतीय तत्वज्ञानाच्या पाठीराख्यांना लागू असावी. वैभव व समृद्धीत जन्माला आलेले तत्त्वज्ञान आज दरिद्री असलेल्या देशाला आम्ही लावू पहात आहोत.

कम्युनिझमला नेमका कोठे विरोध करावा लागेल हे आपण फार अचूकपणे दाखविले आहे. नाहीतर या देशातला समाजवाद म्हणजे दारिद्र्याचे वाटप एवढाच अर्थ व्हावयाचा. समस्यांचा स्वतंत्र शोध घेण्याचा आपला प्रयत्न असाच चालू राहू द्या !

जानेवारी, १२ अजित पटवर्धन,
आय. आय. टी. पवई

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# पर्वत

विजय तेंडुलकर

हवेत गुलाबी गारठा आहे.

आज या झोपडपट्टीची शान वेगळी आहे. तोंडाशी समारंभाची माफक पण लक्षात येणारी आरास आहे. एक लाकडी महाद्वार वगैरे. बघ्यांची गर्दी जमली आहे. भरपूर पोलीस हजर आहेत. सारखे बाजू हटो बाजू हटो करताहेत.

कोई मिनिष्टर आनेवाला है शायद ! – एक टॅक्सीवाला त्या गर्दीतून कौशल्याने गाडी काढीत शिवी घातल्यासारखा शेरा मारतो.

आराशीतून आत शिरले की दुतर्फा मातीबिती टाकून नुकती कालपरवा व्यवस्थित केलेली निरुंद वाट आहे. मलमूत्राचा दर्प नाही. इतस्ततः घाण विखुरलेली नाही. लूत लागलेली कुत्री लोळलेली नाहीत. नागडी उघडी पोरे खेळत नाहीत. कोंबडीची पिसे पडलेली नाहीत की भांडणतंट्याची परिचयाची किचकिच नाही. माणसांनी जवळजवळ अंगभर कपडे घातले आहेत. पोरे आज कशी स्वच्छ आहेत. घरे नीटनेटकी वाटतात. दारादारात वाट पहाणारे स्त्रीपुरुष चेहरे दिसताहेत. नवख्याकडे ते कुतूहलाने पहातात. उत्तर हिंदुस्तानी बोलीत एकमेकात कुजबुजतात.

आणखी आत शाळा आहे. या वसतीसाठी काही धडपड्या ध्येयवाद्यांनी चालवलेली शाळा. बैठ्या इमारतीपेक्षा पटांगण मोठे. पटांगणात एक तात्पुरते व्यासपीठ. व्यासपीठापुढे तुरळक प्रेक्षक बसलेले. व्यासपीठामागे एका झालरीवर सोनेरी अक्षरे: बादशहा खान चिरायु होवोत. मागे सिनेमाची गाणी दूरध्वनीक्षेपकाच्या भसाड्या स्वरात लागलेली. पटांगणाच्या दुसऱ्या टोकाला कुंपणापलीकडे हारीने काही उघडीबोडकी माणसे अवघडून तटस्थ उभी; इकडेच पहात; पायखान्यांशी. ड्यूटीवरचा एक सबइन्स्पेक्टर न रहावून म्हणतो, अजून नंबर संपत नाहीत काय रे तुमचे ? सकाळधरने रांग आहेच. आटपा लवकर. पहाणारे हे मनावर न घेता स्थितप्रज्ञपणे उभेच. इन्स्पेक्टर रागावता रागावताच पाठ वळवून गालातल्या गालात हसतो.

समारंभाचा एक चष्मेवाला पांढरपेशा सेक्रेटरी कडेने उभे असलेल्यांना बसून घ्यायला पुन्हा पुन्हा सांगतो आहे आणि कोणी त्याचे ऐकत नाही आहे. शाळेच्या दाराशी गणवेषातल्या छोटया छोटया मुलांची चळवळती रांग केव्हांपास्नं एकेक पाय पालटीत पाहुण्यांना मानवंदना देण्याच्या महत्त्वाकांक्षेने उभी आहे. त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी त्यांच्या शिक्षिका पांढरी पातळे नेसून लगबग करताहेत. सगळा मिळून एकच गोंगाट आणि एक न संपणारी उत्सुक प्रतीक्षा.

गर्दी वाढू लागते. बसून घेण्याच्या आर्जवांना यश मिळू लागते. येणारात आजू-बाजूचे झोपडीवाले चिल्ल्यापिल्ल्यांसकट आहेत आणि काही पांढरपेशे आणि त्यांची मुलेबाळे आहेत. झोपडीवाल्यांच्या मुद्रांवर कुतूहल आहे आणि त्यांच्या पोरांच्या कमरेला कधी नव्हे ती एकेक चड्डी आहे. पांढरपेशे रविवारी सकाळी लौकर उठून सलूनमध्ये जावे त्या कर्तव्यतत्परतेने आणि गांभीर्याने येत आहेत. फिल्मी गाणी थांबून दूरध्वनीक्षेपकावर सतार सुरु होते. सतार थांबवून मध्ये मध्ये 'बादशहाखान निघाले आहेत,' 'ते येताहेत,' 'ते वाटेवर आहेत,' 'दोन चार पाच मिनिटात पोचतीलच' असे हिंदी-मराठी दिलासे मिळू लागतात. पटांगणापल्याडच्या पाव-खान्यापुढचा 'क्यू' देखोल संपला आहे पोलिसांनी पटांगणाच्या चौबाजूंना चख मोर्चे बांधले आहेत. भारतीय बैठका श्रोत्यांनी गजबजल्या आहेत.

आणि एकदम साऱ्या गोंगाटाचा स्वर चढून तुटतो, एक हुंकार उमटतो आणि घोषणा होते, बादशहा खान झिंदाबाद !

माणसांच्या घोळक्यातून आता एक पर्वत पटांगणात उतरतो. या पर्वताची माती रसरशीत लालगुलाबी आहे. याच्या शिखरावर प्रदीर्घ तपस्येचे शुभ्र हिम पसरले आहे. हा अनादि कालातून वारे वादळे पचवीत वर्तमानात पोचल्यासारखा वाटतो आहे. तसाच खडबडीत, तसाच शिणलेला, तसाच कोठे कोठे ढासळलेला तरीही उन्नत आणि अविचल.

पर्वत व्यासपीठावर चढतो आणि बैठकीवर मधोमध पुढेच त्याला बसवले जाते. मागे काही टेकड्या स्थानापन्न होतात. अंग दुमडून हा मेरूमांदार लीनपणे, भारावलेला बसला आहे. आणि छायाचित्रकार त्याचे फोटो घेण्यासाठी जिवाची धावपळ करताहेत. हिमालयानंतर छायाचित्रासाठी इतका मनोहारी आणि आव्हान ठरावा असा विषय दुसरा नसेल.

कोणीतरी पुटपुटते, आहे माहीत ? सानेगुरुजी अगदी असेच बसत...

छायाचित्रकारांच्या चौदिशांकडून नेम धरणाऱ्या तापयासमोर व्यासपीठावरचा विद्ध गरुड आपली वेदना भोगीत क्षणकाळ विसावला आहे. त्याला कॅमेऱ्यांची क्षिती

---

जागेअभावी 'दिल्ली दिनांक' हे सदर या अंकात
जाऊ शकले नाही. 'मार्ग' ही रेंगाळले. —संपादक.

---

नाही. आसमंताचे भानदेखील नाही. तो या व्यासपीठावर असला तरी तो वेगळा वाटत नाही. तो आहे एका दिगंताएवढ्या प्रचंड, अदम्य, चिरंतन वेदनेचा; त्या वेदनेत सर्वस्वाने रुतलेला, ती वैश्विक वेदना आपल्या एकाच काळजात शोषून घेऊन संपवू पहाणारा.

आता बादशहाखान बोलू लागतात, कॅमेरेवाले 'फ्लॅश' मारतात, चांगल्या 'अँगल' साठी गर्दीत धडपडतात, चलच्चित्रपटाचे कॅमेरे जवळपास दोनतीन ठिकाणांहून चालू होतात; तेवढ्यात वरून विमानेही घरघरत जाऊ लागतात. कसले तरी भोंगे वाजतात आणि ते काही केल्या लौकर थांबत नाहीत, दूरध्वनी-क्षेपकदेखील मध्येच दगा देऊ लागतो.

व्यासपीठावरची समूर्त वेदना पल्तुनी टोपी सरकवून शुभ्र मस्तक खाजवीत विषण्ण हसत म्हणते, मी काय सांगतो ते ऐकूच जाऊ देत नाहीत!

अखेर त्यातच एका निकराने, नाइलाजाने खुदा–इ–खिदमतगार सरहद्दी गांधी बोलू लागतात. समोरच्या गर्दीत कोठे असेलच तर त्या सारासार विवेकाला कळ-कळीने, परोपरीने, पोटातल्या उमाळ्याने आवाहन करू लागतात. साधे शब्द. खडखडीत शब्द. पण त्यातून आतल्या अपार–अपार कणवेचे जिवंत अक्षरे पाझरतात. अरे घोषणा कसल्या करता? दर्शन कुणाचे घेता आणि पायावर डोके कुणाच्या ठेवता? कोण देव? कोण मोठा? तुम्हाला सगळे फसवताहेत, पहा! डोळे उघडा! शहाणे व्हा! लबाड, हुशार, चतुर, कारस्थानी, राजकारणी माणसांनी तुमची ही हालत केली आहे आणि तुमच्या भाबडेपणावर आणि आंधळेपणावर ते आपल्या महत्त्वाकांक्षांच्या हवेल्या उठवताहेत. तुम्हाला डोळे आहेत. तुम्ही पाहू शकता. तुम्ही विचार करू शकता. तुम्ही मस्तक खडबडवलेत तर या लबाड माण-सांचे सारे अस्तित्व क्षणार्धात नष्ट होईल. म्हणून आंधळे आता राहू नका. श्रद्धाळू राहू नका, भाबडे राहू नका. हे सारे फार झाले. याने तुमची काय ही हालत झाली आहे! तुम्हाला या तुमच्या श्रद्धास्थानांनी आणि विश्वासू पालनकर्त्यांनी पुरते–पुरते नागवले आहे. अरे या आधुनिक देवांनी आणि दैत्यांनी मिळून तुमच्या वसाहु-तीचा कट की रे रचला आहे, म्हणून माझ्या मुलांनो, आता तरी एकदाच खडबडून उठा–मस्तक झाडा, ताठ उभे रहा, आपआपसातले झगडे टाका आणि उन्नत व्हा–मलाही वंदन करू नका, मलाही प्रमाण मानू नका, स्वतःचा विवेक जागा करा–

असंख्य श्रोते टक लावन मंत्रमुग्ध आहेत. पोरेटोरेही भारली आहेत. पोलिस पोलीस वाटत नाहीत, गर्दीतले अत्यंत राकट रांगडे चेहरेही मूल होऊन पहाताहेत–

पण कोणी ऐकते आहे का? कोणी जागे आहे का? कोणाला साक्षात्कार होतो आहे का? कोणाच्या मेंदूपर्यंत ही आच, हा आशय, हे आवाहन, ही हाक पोचते आहे का? की सारेच केवळ मंत्रमुग्ध आहेत? सारेच केवळ भक्तीने आणि आदराने दबले आहेत? सारेच एका दुर्मिळ दर्शनाच्या भाबड्या, तात्पुरत्या, चित्त-चारक आनंदात न्हात आहेत?

चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

२४ जानेवारी १९७०

पर्वत एका होतो. विद्ध गरुड दुखरे, अवजड, वृद्ध पंख पसरून उठतो. वेदना गर्दीकडे पाठ फिरवून, गर्दीतून गर्दीबरोबर पुढे कोठे तरी जमलेल्या गर्दीसाठी निघते. धक्काबुक्की होते. कोणीतरी जबरदस्तीने हार घालते, कोणी पाया पडते. कोणी धंगाला हात लावून तो कपाळी लावतात.

... पण कोणी एकते आहे का ? कोणी जागे आहे का ? कोणाच्या मेंदूपर्यंत एक हाक पोचते आहे का ?


हवेतला गुलाबी गारठा कमी होतो आहे. ◻

# हॅपनिंग

अक्षरांच्या क्षेत्रातला एक कल्पक आणि अस्वस्थ माणूस गेल्या एकतीस डिसेंबरला संध्याकाळी एक वेगळा प्रयोग घेऊन मुंबईच्या रस्त्यात उतरला. र. कृ. जोशी हे नाव.

केव्हा तरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात लाठी चालवलेले आणि त्यानंतर यथाकाल कुटुंबवत्सल बनून, कचेरीतून जातांना न चुकता वाटेत भाजी घेऊन आणि गणपतीचे दर्शन घेऊन घरी पोचणारे काहीसे ओबडधोबड, रुक्ष व्यक्तिमत्व सुचवते, काचाचे धोतर, गुंड्या लावलेला कोट असा याचा परंपरानिष्ठ पोषाख भासतो. परंतु नावे आणि माणसे यांचे प्रत्यक्षात नेहमीच जमते असे नाही. र. कृ. जोशी हा कवी आणि चित्रकारही असू शकतो. इतकेच नव्हे तर परंपरा तोडू पहाणारा कवी असू शकतो. नव्यातील नव्यांनाही 'सत्यकथा' मासिकाच्या दिवाळी अंकातल्या आपल्या सचित्र कवितांनी तो गांगरवतो. तो चक्क स्वप्ने जगतो; या स्वप्नात माणसांना स्थान नसते. या माणसाला अक्षरे आणि लिप्यांचीच स्वप्ने दिसतात. अक्षरांना स्वभाव असतात, व्यक्तिमत्त्वे असतात, लकबी असतात, प्राण असतो असे हा म्हणतो. हा अक्षरेच चितारतो, वेगवेगळ्या पद्धतींनी चितारलेल्या अक्षरांना कविता मानतो. या अक्षरसृष्टीत धुंद असतो. लांब केस वाढवतो. रंगीबेरंगी कपडे पहेनतो. इतके असून यात एक परंपरेशी चांगले नाते सांगणारा साधा बगडा र. कृ. जोशीही आहे हे विशेष. रंगीबेरंगी कपड्यातही 'काचाचे धोतर – सर्व गुंड्या लावलेला कोट' संस्कृतीची सुस्पष्ट खूण देणारा हा काव्यक्षेत्रातला उत्पाती, प्रयोगशील, चळवळ्या, संवेदनाक्षम जोशी आहे. शब्दापेक्षा डोळ्यांनी अधिक बोलणारा आणि अंतर्मुख.

'रस्त्यात उतरणे' ही वास्तविक राजकीय चळवळयांची पेटंट धमकी; पण एका सांस्कृतिक चळवळीचा आरंभ र. कृ. ने मुंबईतल्या म्यूझियम भागातल्या उघड्या वाघड्या 'कार – पार्क'वर केला. बोलावता येतील तेवढ्या माणसांना त्याने या दिवशी सध्याकाळी ठीक सहा तीसला कार – पार्कशी पाचारण केले तो म्हणाला सहा तीस म्हणजे सहा तीसच. सहा पस्तीसला आलाच तर कदाचित काहीच दिसणार नाही !



हाच शो इथून दुसरीकडे – तिथून तिसरीकडे...

सारे – म्हणजे मूठभरच–कधी नव्हे एवढे दिली वेळ सांभाळून उत्सुकतेने जमले. कार – पार्कवर एक दोन गाड्यांशिवाय काहीसुद्धा नव्हते. र. कृ. ही नव्हता. दिवस अंधारत होता. समोरच्या जहांगीर आर्ट गॅलरीत कोणी शोध घेतला पण र. कृ. तिथेही नव्हता. कोणी डोळे मिचकावीत म्हणाले, हाच तर र. कृ. चा नवा प्रयोग नसेल ? ठीक सहा – तीसला कार – पार्कमध्ये तोवर तब्येतीने गप्पा मारणारे तिघे चौघे गप्पा मारण्याचे थांबले. कोठून तरी आणखी सात आठ लगबगीने आले. भराभरा सर्वांनी डोक्यावर कागदी पिशव्यांसारख्या लोकविलक्षण टोप्या चढवल्या. तेवढ्यात असल्याच पिशवीखाली ओळखू न येणारा, एकादा योद्धा आणि बँडवाला यांच्या दरम्यानचे कांहीतरी दिसणारा गंभीरप्रकृती र. कृ. देखील साक्षात् प्रकट झाला. जोशीने ऑर्डर दिली. एक पिशवीवाला मधोमध बसून एक रानटी वाद्य वडवू लागला. त्या तालावर सगळे पिशवीवाले गोल फिरत नाचू लागले. या नाचाला एक सैलसर ताल होता; तोही जंगली वाटणारा. नाचणारे गात बीत नव्हते, नाचणाऱ्या जंगली टोळ्यांप्रमाणे कसल्या तरी घोषणा ते ओरडत होते. या टोळीचा प्रमुख जोशी टोळीला आपल्या बसक्या, घोगऱ्या आवाजात ओरडत, नाचून, हात हवेत फेकून घोषणा देत होता. टोळी त्या घोषणा किंचाळत एक जंगली नाच करीत होती. जमलेले मूठभर सुसंस्कृत स्तिमित होऊन पहात होते. आणखी जमत

होते. रस्त्यावर भटकणारी पोरे अचंब्याने न्याहाळीत होती. रस्त्यावरच राहणारे प्रौढ आपल्या दाढच्या जटा खाजवीत हीही मोफतची करमणूक पाहून घेत होते. जाते येते 'कार' वाले एकतीस डिसेंबरची ऐतिहासिक रात्र सुरू झाल्याचे मनोमन म्हणत असतील. या रात्रीतल्या ठराव जल्लोषाचा त्यांना हा भाग वाटला असेल, पण र. कृ जोशी नामक 'काच्याचे धोतर – गुंडया लावलेला कोट' परपरेच्या आणि लांब केस, रगीत पोषाख व्यक्तिमत्त्वाच्या सवेदनाक्षम माणसाला एवढेच अभिप्रेत नव्हते. – असूच शकत नव्हते. आता उत्स्फूर्तपणेच त्याच्या या नृत्यात एक हाडकुळी चष्मेवाली तरुणीही सामील झाली आणि इतराबरोबर तीही नाचू ओरडू लागली.

नाचणाऱ्या प्रत्येक टोपीवर प्रत्येक भारतोय भाषेतले एकेक टपोरे अक्षर दोन्ही बाजूंना चितारले होते. जोशी देत होता आणि नाचणारे साथ दार उच्चारीत होते. त्या घोषणाही भारतीय भाषांतल्य होत्या. सर्व घोषणांचा आशय एकच होता. एकोणीसशे एकोणसत्तर सपले. एकोणीसशे सत्तरचे स्वागत असो ! हा एकच दिसत आशय मराठीत आपला, हिंदी गुजरातीत आणि इतर भारतीय परिचित भाषात पार कोठल्या तरी परलोकावरचा आणि दुर्बोध वाटत होता. सर्व भारतीय भाषांचा एकच कोलाहल जोशी आणि त्यांच्या नाचवाल्यांनी मोठमोठ्या भसाडया आवाजात, आक्रमक हालचालींचे एक नृत्य करीत मांडला होता आणि म्युझिअमचा तो छोटा कार – पार्क त्या छोटचाशा पण बेहोष गोंगाटाने कसा भरून गेला होता.

सहा पस्तीस, कळ दाबावी तसे जोशी आणि पार्टीचे हे म्युझिअमच्या कार–पार्क-वरचे रानटी नृत्य थांबले आणि डोक्यावरच्या लोकविलक्षण टोप्या काखोटीला 'म्यान' झाल्या. नाचलेले सगळे एकदम सुसंस्कृत सभ्य आणि थकलेले वाटू लागले चष्मेवाली तर तशी नाचली यावर कुणाचा –तिचादेखील कदाचित–


मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमानुसार लिहिलेले

**सुगम समाजशास्त्र**

लेखक : प्रा. उत्तम बा. भोइटे, एम्. ए.

*श्रीशिवाजी महाविद्यालय, परभणी*

मूल्य रु. ६–०० रजि. ट. खर्च रु. १–२०

**व्हीनस प्रकाशन**

३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०

विश्वास बसला नसता. जोशी घाम पुसत कारपार्कवरच्या मूठभर परिचितांशी संवाद करू लागला. जोशी म्हणाला, ही सर्व भारतीय भाषांच्या वतीने आम्ही नव-वर्षाला प्रतीकात्मक बधाई दिली.

## हे नाचणारे कोण ?

शब्दांपेक्षा हातांनी अधिक बोलत जोशी म्हणाला, आपलेच आपण काम करतो त्या जाहिरात संस्थेतले सहकारी.

या प्रकाराला काय म्हणायचे ?

याला परदेशात 'हॅपनिंग' म्हणतात. काहीजणांनी एका सार्वजनिक जागी ठरवून उभी केलेली 'घटना' असते.

या तुमच्या 'घटने'चा अर्थ काय ?


जसा जाणवेल तसा. पण हेतू भारतातल्या अनेक भाषांचे आजचे 'हे' वेगवेगळ्या प्रतीकात्मक पद्धतीनी जाहीर रित्या मांडण्याचा आहे—स्वरूप. उदाहरणार्थ आज हे नृत्य झाले. यानंतर एकाद्या नाटकाआधी दुसरी आणि तिसरी घंटा यांच्या दरम्यानच्या कालावधीत प्रेक्षागृहातले आमचे वेचक प्रेक्षक एकमेकात मोठ्यांदा एक संवाद करतील. प्रत्येक प्रेक्षक वेगवेगळ्या भाषेत एकमेकाशी बोलेल. म्हणजे एकजण बंगालीत काही म्हणेल तर दुसरा त्यावर तामीळमध्ये उत्तर देईल आणि समजा की तिसरा कन्नड कॉमेंट करील वगैरे. याशिवाय क्रॉस मैदानावरदेखील एक हॅपनिंग स्टेज २६ जानेवारीस करण्याचा विचार आहे; पण त्याला जास्त माणसे हवीत. ही सर्व माणसे सर्व भारतीय भाषा चितारलेल्या एका मोठ्या कागदी चादरीखाली निजतील. मग सर्व उठून बसून चादरीचे आपापले टोक थोडेथोडे टरकावू लागतील. अशा सगळ्या चादरीच्या चिंध्या झाल्या की संपले-हॅपनिंग. अजून बऱ्याच या आहेत-कल्पना. नंतर भेटू. आता इथून दुसरीकडे हे आजचेच हॅपनिंग पुन्हा सादर करणार—तिथून तिसरीकडे-असे मध्यरात्रीपर्यंत किंवा आमच्यातले पुरेसे लोक नाचण्याच्या परिस्थितीत असेपर्यंत आज चालणार. ही भारतीय भाषांच्या वतीने नव-वर्षाला आमची प्रतीकात्मक बधाई.

आणि र. कृ. जोशी त्याच्या सहकाऱ्यांबरोबर संथपणे रात्रीच्या अंधारात निघून गेला. अक्षरांची स्वप्ने जगणारा एका वास्तवाची ठुसठुसती जाणीव मागे ठेवून गेला.

पाहिलेल्या 'हॅपनिंग'मधून बधाईपेक्षा आजचा भाषाभेदांचा कल्लोळ, आक्रमक ओरडा आणि रानटी युद्ध—नृत्याचा रक्तपिपासू आवेशच व्यक्त झाला होता असे वाटले.

समोरचा कारपार्क आता भोवतालच्या सार्वजनिक दिव्यांनी उजळला होता आणि काही कंगाल आकृत्या त्यात जोशीच्या ताज्या हॅपनिंगची नक्कल करीत खदखदा हसत होत्या.

□ □ □



# समाजवादाचा निळा पक्षी

मौजे गांधीनगर

लेखांक तीन

श्री. ज. जोशी

अहमदाबादमध्ये एक दिवस अगोदरच पोचलो. दुसरा दिवस मोकळाच होता. तास दीड तास अहमदाबादच्या रस्त्यातून उगीचच भटकलो. कुठल्याही गावाचे समाजजीवन बघायचे, तर अगदी छोटया, – थोडयाशा घाणेरडया हॉटेलांना, मध्यम वर्गियांच्या वसाहतींना आणि भाजी मार्केटांना भेटी द्याव्यात असं माझं मत आहे. अहमदाबादमध्ये मी नवीनच होतो, त्यामुळे काय बघायचे, हेच कळत नव्हते. दिशाहीन हिंडण्याचा लवकरच कंटाळा आला आणि मग एकदम वकीलसाहेबांची

आठवण झाली. मुंबईहून त्यांना मी पत्र पाठवले होते. ते वयस्कर गुजराथी वकील आहेत. अनेक वर्षे मुंबईत प्रॅक्टिस केल्यावर आता ते परत अहमदाबादला आले आहेत. त्यांच्याशी बोलण्यामुळे काही नव्या गोष्टी कळतील असं वाटलं.

रिक्षा करून आम्ही कॅलिको मिलपासल्या त्यांच्या घरी गेलो. दारावरची पाटी वाचून घंटा दाबली. वकीलसाहेबांनीच दार उघडले. त्यांची साठी उलटली होती, शरीर रोगजर्जर होतं.

आम्ही नमस्कार केले आणि ओळख सांगितली. खुर्चीत बसल्यावर मी त्यांच्या डोळ्यांकडे पाहिले. चमत्कारिक विषण्णता आणि उपहासगर्भता त्यांच्या निस्तेज डोळ्यांत घर करून असलेली मी पाहिली. म्हाताऱ्या शाळा मास्तरच्या किंवा कारकुनाच्या डोळ्यांत निराशा असतेच ! पण ती बहुधा निर्जीव आणि कळाहीन असते. वकीलसाहेबांच्या डोळ्यांतली निराशा मात्र तलवारीच्या पात्याप्रमाणे लख-लखीत होती.

"आम्ही अहमदाबादची काँग्रेस बघण्यासाठी मुद्दाम आलो आहोत." असं मी सांगितलं. आणि माझं मलाच कसंतरी वाटलं. तलवारीचे पाते असलेले डोळे हसले. ते हास्य मला सहन झाले नाही.

पहिले सलामीचे एकदोन हात झाले. मग ते बोलायला लागले, "अहमदाबादची काँग्रेस, बघण्याजोगं तीत आहे काय ?"

"आम्ही मुंबईलाही जाणार आहोत."

"अहो, मुंबईही तिचीच बहीण. हिला झाकावी आणि तिला उघडावी ..मी इथं बसून दोन्ही ठिकाणची भाषणं लिहून देतो....गरीब अधिक गरीब झाले... श्रीमंत अधिक श्रीमंत झाले ..ही दरी मिटवण्यासाठी आपण प्रयत्नशील असायला हवं...जाती जातीत भेद असता कामा नयेत...अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे...आपण भांडवलशाहीचा नाश करून देशात समाजवाद आणला पाहिजे..." ते खूप हसले व म्हणाले, "हिंदुस्थानातला पंधरा-सोळा वर्षांचा कोणताही मुलगा ही भाषणं दोन मिनिटांत तयार करून देईल."

त्यांच्या नैराश्यवादाचा परिणाम माझ्यावरही होत चालला होता. त्याच्या पकडीतून सुटण्याची धडपड करीत मी म्हटले, "तुम्ही फार लाईटली बोलत आहात. गेल्या वीस पंचवीस वर्षांत आपण जी प्रगती केली..."

"काहीच प्रगती केली नाही. परवाच तुमचे चव्हाण म्हणाले, गरीब माणूस जिथे होता तिथेच अजून आहे. नेहरूही दर वर्षी तसंच म्हणत. इंदिरा गांधी तेच म्हणतात."

"आपण राष्ट्रीय एकात्मतेचे प्रयत्न केले..."

"ते बंगाल आणि मद्रास सांगतातच आहेत. हिंदू मुसलमानांची एकी अहमदा-बादेत परवा बघितलीच...." वकीलसाहेब थोडा वेळ थांबले आणि म्हणाले,

"आपण नुसती पोपटपंची करतो. विचारांबद्दल साधी ऑनेस्टीदेखील नाही. तुम्ही मराठी लोक तर भयंकर आहात. चव्हाणांनी प्रथम सिंडिकेटला पाठिंबा दिला तेव्हा तुम्ही सिंडिकेटवादी होतात. चव्हाणांना आता इंडिकेटमध्ये समाजवाद सापडला...तुम्ही सगळे इंडिकेटवादी झालात! महाराष्ट्र बुद्धिवादी आहे, असं म्हणून तुम्ही गुजराथला हिणवत होतात. चव्हाणांनी बाजू बदलल्यावर एकाही व्यक्तीनं त्यांना विरोध दर्शविला नाही, हा तुमचा बुद्धिवाद!"

"गुजराथ्यांचं तरी काय, तसंच आहे. मुरारजी जर इंडिकेटमध्ये असते तर इंडिकेटची कांग्रेस अहमदाबादला भरली असती."

वकीलसाहेब थोडा वेळ गप्प बसले. मग काही विचार करून ते म्हणाले, "आपण सगळेच बुद्धिमंद आणि चाइल्डिश आहोत. कोणत्याच गोष्टीचा आपण विचार करत नाही...समाजवादाचा डंका प्रथम नेहरूंनी वाजवला. आपण विचारच केला नाही. तोच अजून वाजवत आहोत...गोरगरीब, अक्षरशत्रू, घराचा उंबरठाही न ओलांडणाऱ्या स्त्रिया, हे सगळे 'समाजवादी'च आहेत...हसू येतं."

"समाजवादाची थट्टा करू नका. मीही समाजवादीच आहे."

"तुम्ही कोणते समाजवादी आहात हे मला सांगा!...लेनीन, स्टॅलिन, माओ, नेहरू हे सगळे समाजवादीच. यातले तुम्ही कोण?"

प्रश्न भेदक होता. मी उत्तर देऊ शकलो नाही. वकीलसाहेब बराच वेळ त्यांच्या पद्धतीत बोलत राहिले. ते सिनिक होते, हे उघड होतं. पण त्यांच्या बोलण्याचा अम्मल सहजासहजी टाळता येण्याजोगा नव्हता.

त्यांचा निरोप घेऊन निघालो आणि दिवसभर त्याच विचारात होतो. रात्री वेडीवाकडी स्वप्नं पडत होती. एका स्वप्नात विकलांग रोगजर्जर असा माणूस दिसला. दात विचकीत तो म्हणाला, "मी समाजवाद आहे. देशातल्या पुढाऱ्यांनी माझ्या अंगावरचे लचके इतके तोडून खाल्ले आहेत की आता अस्थिपंजराशिवाय मजजवळ काही नाही....मला मरावसं वाटतं. पण भारतातले पुढारी मला मरूही देत नाहीत. मी मेलो की ते मेलेच. भिकारी लोक भिक्षा मिळवण्यासाठी विद्रूप मुलं जवळ बाळगतात. ती मुलं मरणार नाहीत याची ते काळजी घेतात. त्याचप्रमाणे या देशातले पुढारी मतं मिळवण्यासाठी मला जवळ बाळगतात. ते मला मरू देत नाहीत."

अर्धवट झोपेत पाहिलेले ते 'समाजवादा'चे भूत माझ्या चांगलेच मानगुटीवर बसले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी पारगावकरांबरोबर कांग्रेसच्या मंडपात गेलो आणि विषय नियामक समितीची बैठक पाहण्यासाठी पत्रकारांच्या गॅलरीत बसलो तेव्हाही ते भूत माझ्या मानेवर बसून गळा आवळीत होतंच.

व्यासपीठावर मध्यभागी नेहरूंची, पटेलांची आणि लालबहादूर शास्त्रींची तैलचित्रे होती. मी आदरभावाने त्या तैलचित्रांकडे पाहत होतो. परंतु खांद्यावरचा

त्या भुताचे अभद्र हसणे कानावर येतच होते.

त्या हसण्याची कटकट व्हायला लागली. व्यासपीठावर अजूनही कोणी पुढारी आले नव्हते. सुन्न वाटत होतं म्हणून कांग्रेस समितीनं पत्रकारांसाठी जी निरनिराळी परिपत्रके वाटली होती ती मी पाहत बसलो. त्या सर्वात 'म्हैसूर स्टेट कमिटी फॉर सोशॅलिस्ट अॅक्शन' यांनी प्रसिद्ध केलेले 'निजलिंगप्पा' हे परिपत्रक मला फार गमतीचे वाटले. मुखपृष्ठावर पुढील वाक्ये जाड टाइपात लिहिली होती, " Morarji – the greatest socialist of 20th century..." **Indira the** Goddess of power that failed." Kamaraj – nails Indira's big bald black lies. "

मी आत वाचत गेलो. एके ठिकाणी लिहिले होते,

" What kind of a socialist, is Mr. C. Subramaniam ? At Madras, is a place called Adayar. C. S. has built a palatial mansion at a cost of nearly Rs. 2 lakhs. C. S. lives in an air conditioned room and talks about socialism.

त्याच्याच पुढे लिहिलं होतं.

" Indiraji the greatest socialist in the world. "

आणि नंतर विचारणा केली आहे.

" दररोज पंचवीस हजार रुपये खर्च करणाऱ्या, आणि स्वत:साठी पन्नास लाखांचा राजवाडा बांधण्याचा हट्ट धरणाऱ्या इंदिराजी सोशॅलिस्ट कशा ? "

दुसऱ्या बाजूला लिहिलं आहे,

Morarji Desai, is the greatest socialist of the 20 th century

त्या वाक्याखाली विवरण केलेले आहे,

" Long before the P. M. ever dreamt about Nationalisation of Banks, Morarji, hit at the very root of all the ills of our economy, the craze to hoard gold "

मी ते पत्रक वाचत होतो तेवढ्यात कांग्रेसचा तो विस्तीर्ण मंडप भरत चालला होता. दहा पंधरा हजार लोक तरी आत बसले असावेत. बाहेरच्या बाजूलाही चारी अंगांनी प्रचंड जनसमुदाय घोंघावत होता. गांधीनगर हे अगदी शेतात वसवलेले आहे. आसपास डांबरी रस्ते मुळीच नाहीत. घोड्यांच्या टापांनी उडावी तशी धूळ सारखी वर उडत होती. आकाश कुंद झालं होतं. समुद्राच्या लाटांचा यावा त्याप्रमाणे लोकांच्या गर्दीचा आवाज मंडपात ऐकू येत होता.

मंडपात बसून मी त्या प्रचंड गर्दीकडे बघत होतो. मी स्तिमित झालो होतो. पुण्याहून निघताना अहमदाबादच्या अधिवेशनाबद्दलची केविलवाणी चित्रे मी रंगवलेली होती. मोरारजी, निजलिंगप्पा, एस. के. पाटील, वगैरे मंडळींना जन-

मानसात थोडेदेखील स्थान नाही असे मला वाटत होते. माझा तो अंदाज सपशेल चुकला होता. राष्ट्रीय चळवळीमध्ये मोठमोठ्या पुढाऱ्यांचा चाले, त्याप्रमाणे मोरारजींचा आणि निजलिंगप्पांचा जयजयकार चालला होता. आश्चर्यचकित होऊन मी शेजारच्या गुजराथी पत्रकाराला म्हटले, " इतका रिस्पॉन्स मिळेल, असं वाटत नव्हतं."

त्या पत्रकारानं भुवया आकुंचित केल्या आणि लहान मुलाकडे एखाद्या जाणत्यानं बघावं, तसं माझ्याकड बघत तो म्हणाला " त्यात आश्चर्य कसलं ? हिंदुस्थानात कुठेही आणि कशालाही गर्दी होतेच. दोन दिवसांनी मुंबईलाही तशीच होईल... नेहरूंच्या प्रेतयात्रेला जेवढी गर्दी झाली तेवढीच शास्त्रींच्याही झाली...क्रुश्चेव्हला बघायला जेवढे लोक जमले, तेवढेच सरहद्द गांधींनाही जमले."

" मला वाटले होते, मोरारजींचा समाजावर काहीच होल्ड नसेल."

" हे वाटणंच चूक आहे. सगळे पुढारी वाईट आहेत, आणि सगळे चांगले आहेत. मोरारजींनी काय केलंय ? उलट त्यांनी सगळ्यांकरता निंदा सोसली. जवाहरलाल नेहरू नामानिराळे राहिले. पण त्यांच्याच मंत्रीमंडळात दुय्यम स्थान असणारे मुरारजी समाजवादाच्या मार्गातली अडचण ठरले...मोठी मौज आहे."

मी काहीच बोललो नाही. मोरारजींना ज्या अपमानास्पद तऱ्हेनं मंत्रीमंडळातून बाहेर पडावं लागलं, त्याचा डंख प्रत्येक गुजराथी माणसाच्या मनात आहे हे उघड होतं.

तोच पुढे म्हणाला, "मोरारजींच्या मुलाबद्दल तरुण तुर्कांनी इतकी धमाल माजवली. पण जगजीवनरामनी प्राप्तीकर दिला नाही, याबद्दल एक शब्दही बोलण्याची त्यांची प्राज्ञा नाही... They are all cowards and careerist–"

व्यासपीठावर एकामागून एक पुढारी यायला लागले. प्रथम मोरारजी आले. कित्येक वर्षांनी मी मोरारजींना बघत होतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर मला वाटतं, ते महाराष्ट्रात फिरलेच नसावेत. सत्तरीच्या घरात आलेला हा माणूस अजूनही ताठ आहे. डोळ्यात हुकूमत आहे. कांती तर हेवा करण्याजोगी आहे. लोकांनी प्रचंड टाळ्या वाजवल्या. मग निजलिंगप्पा आले पासष्ट सत्तर वर्षांचा हा वृद्ध माणूस दिसायला अगदीच गचाळ आहे. नेहरूंच्या सुरूपतेशी किंवा सरदारांच्या भेदक करडेपणाशी त्यांची तुलनादेखील करणे अशक्य आहे एखाद्या रिटायर्ड हेडक्लार्कप्रमाणे ते दिसतात. पण तरीदेखील लोकांनी त्यांचे प्रचंड स्वागत केले. एखाद्या सिनेमा नटानं स्टेजवर पुढे येऊन लोकांच्या मानवंदनेचा स्वीकार करावा, त्या थाटात निजलिंगप्पांनी एकदा नव्हे दोनदा, मान झुकवून आणि दोन्ही हात पसरून लोकांना अभिवादन केले. पुढारी येतच होते हितेंद्र देसाई आले...त्यांच्या मागोमाग एका स्वयंसेवकाचा आधार घेत वृद्ध कृपलानीही आले टाळ्यांचा सारखा कडकडाट चाललाच होता. मी माझ्याजवळच्या गुजराथी पत्रकाराला म्हटले,

" People are really excited ...या काँग्रेसमध्ये जे ठराव होतील त्याबद्दल त्यांना उत्सुकता वाटत आहे. "

त्या पत्रकाराच्या अंगात शल्यनीती पुरेपूर बाणली होती. तो म्हणाला, " या ठरावांबद्दल लोकांना काहीच वाटत नाही. लोक अजून बाल्यावस्थेत आहेत. जत्रे-मध्ये मुलाना गंमत वाटते तशीच आजच्या भाषणात लोकांना गंमत वाटते. "

सभा सुरू झाली होती. पहिलं भाषण चाललं होतं. मला तरी त्यात ऐकण्याजोगं वाटत नव्हतं. मंडपात पत्रकं वाटली होती. त्यांतलं एक मी वाचत होतो...

एका उताऱ्यावर माझं लक्ष खिळलं. अठराशे एक्याऐंशी साली कर्नल एच. एस. ऑलकॉट याने भारताच्या तत्कालीन स्थितीबद्दल विधान केलं होतं. त्यावर पत्रकात मल्लीनाथी केली होती.

" India in 1881; Has it changed now ? "

ऑलकॉट साहेबानं अठराश ऐक्याऐशी साली लिहिलं होतं,

" The India of old is a figment of the imagination, a faded picture of memory. The India of today is a stern reality, that confornts us.

The union of the olden days, is replaced by disunion. Province is arrayed against province, race against race, sect against sect, brother against brother. The demon of selfishness sits athwart all noble impulse. The struggle for life has made men sycophants, cowards and traitors. "

अठराशे एक्याऐंशी सालानंतर अनेक राष्ट्रीय चळवळी झाल्या. कित्येक फासावर गेले. खूपजणांनी अंदमानमध्ये जन्मठेपी भोगल्या. परंतु भारताचे त्या वेळचे चित्र आज बदलले आहे का, असा प्रश्न त्या पत्रकात केला होता. माझ्या डोळ्यापुढे तोच प्रश्न सारखा नाचत होता.

मी भाषणे ऐकत होतो. प्रत्येकाच्या भाषणात लोककल्याणाची घोषणा केली जात होती. समाजवादाचे नाव तर प्रत्येकजणच घेत होता. केरळमधील रवींद्र वर्मा नावाचा कोणी तरुण बोलत होता. तो इंदिरा गांधींनी ' डेमॉक्रसी ' धोक्यात आणली आहे असे सांगत होता. त्यांची स्थिती लवकरच इंडोनेशियामधील सोकार्नो-सारखी होईल याची त्याला खात्री होती. रामसुभगसिंग यांचेही बोलणे त्याच घाटाचे होते. त्यांचा पोशाख एखाद्या वकिलासारखा होता. लोकसभेत ते गाजत असतील. पण मोठ्या सभेतले त्यांचे भाषण मला तरी अनाकर्षक वाटले. रेकत बोलण्याची त्यांची पद्धत एकसुरी होती. " काँग्रेसका मूलाधार जनतंत्र है । " असं त्यांनी सांगितलं. ...... मुरारजी म्हणाले, कॉम्युनिस्ट होनेकी इंदिराजीकी शक्ति नहीं । वो सिर्फ अपनी सत्ताको मानती है । " त्यानतर निजलिंगप्पा भाषण

देण्यास उभे राहिले. ते म्हणाले, "मी काँग्रेसच्या सभांना इतकी गर्दी कधीही बघितलेली नाही. झेंडावदनाच्या वेळी तर एवढा प्रचंड जमाव आज जमला होता, की तितका एकोणीसशे सत्तावीस सालीदेखील जमला नसेल."

एकामागून एक वक्ते बोलत होते. मी प्रथम त्यांची वाक्ये टिपून घेत होतो. पण थोड्याच वेळात लक्षात आलं, की त्यात काही अर्थ नाही. तेच तेच बोलले जात आहे. निजलिंगप्पांनी सांगितले, "इंदिरा गांधींची स्थिती 'दो फूल एक माली' अशी आहे.

समाजवादाला काँग्रेस बांधली गेलेली आहे हे स्पष्ट आहे. आम्ही समाजवाद आणणारच आहोत इतकी वर्षे काँग्रेसने लोकांच्या इच्छाआकांक्षांना साथ दिली. खूप विचारविनिमय केला आणि मगच ठरवले की या देशात लोकशाही समाजवादाशिवाय तरणोपाय नाही."

त्यांनी माळ्याची उपमा मात्र सुंदर दिली .."The Indian National Congress is like a flower today, there are two malis for the Congress One is the President of the party. The other is the Prime Minister of the Govt.

This is as it should be.

Today Indira wants to be the only mali, for both, the Govt. and the party That is why the people must decide whether they must have ek phool do mali, or do fool ek mali."

मुरारजींनीही साम्यवादाचा उल्लेख केलाच परंतु स. का. पाटील यांनीही केला हे आश्चर्य ! जाता जाता त्यांनी नेहरूंना एक टोलाही लगावला ते म्हणाले, "काँग्रेसमधला समाजवाद म्हणजे खरोखर काय, हे कुणालाच सांगता येणार नाही. महात्मा गांधींनाही सांगता येत नव्हतं. त्यांना कुणी समाजवादाची व्याख्या विचारली म्हणजे ते नेहरूंकडे बोट दाखवून म्हणत, "त्याबद्दल त्यांनाच विचारा. ही इज द प्रोफेसर ऑफ सोशॅलिझम"

लवकरच भाषणाचा कंटाळा आला. मी आणि पारगावकर बाहेर पडलो. जेवणाच्या पेंडॉलसमोर हजारो लोकांचा क्यू होता. मुंगीच्या पावलांनी तो पुढे सरकत होता तिथं उभं रहाणं शक्यच नव्हतं.

आम्ही मंडपाच्या बाहेर आलो प्रवेशद्वाराजवळ गांधींचा उभा पुतळा होता – दांडी यात्रेच्या आविर्भावातला ! चेहऱ्यावर नेहमीप्रमाणेच हास्य होते...ते मिस्किल होते का ? ... का मुत्सद्दीपणाचे होते ? .. अनुयायांनी आपल्याला फसवलं म्हणून ते हसत होते ? ... काहीच कळत नव्हतं .. गांधींच्या हास्याचा अन्वयार्थ मला वाटतं कुणालाच कधी लागला नसेल

दुपारचे ऊन रणरणत होते. पोटात भूक कडाडली होती पुतळ्याच्या पलीकडेच

ग्रामोद्योग प्रदर्शन होते. पोटपूजा करून तिकडे जावे असे ठरवले. पुतळ्याच्या आसपास छोटी छोटी पाले होती. तिथे घाणेरडी उपाहारगृहे होती. निरनिराळ्या प्रांतांच्या पाट्या त्यावर होत्या. खुर्च्यांवर बसून स्त्री पुरुष ते घाणेरडे पदार्थ खात होते. मी त्या लोकांकडे पाहिले. काँग्रेसमध्ये पास झालेल्या ठरावांबद्दल कोणीही बोलत नव्हता. ठरावांचे सोयरसुतक कुणालाच नव्हते. आम्ही एका हॉटेलात गेलो आणि भजी मागवली. घाणेरड्या भज्यांच्या त्या प्लेटला हॉटेलवाल्याने आठ आणे घेतले. चहाच्या पाण्याला तो चार आणे घेणार, हे उघडच होतं. भज्यांच्या रूपाकडे पाहून पारगावकरांचा चेहरा पडला. त्यांना हसवण्यासाठी मी म्हटले, " ही समाजवादी भजी आहेत बरं का. "

मी थट्टा केली होती. पण आतले मन समाजवादाबद्दल विचार करतच होते. त्या दिवशीची भाषणे ऐकून रात्री खोलीवर परत आलो तरीही डोक्यातला समाजवाद गेला नव्हता. आदल्या रात्री वकीलसाहेबांनी विचारलं होतं. " तुमचा समाजवाद कोणत्या पद्धतीचा आहे ?" मनामध्ये तेच विचार येत होते.

अर्धवट झोपेत समाजवादाचा मला कळलेला इतिहास डोळ्यांपुढे येत होता. शाळा-कॉलेजात असताना पस्तीस सदतीस साली प्रथम तो शब्द ऐकला. दोन खोल्यातलं कनिष्ठ मध्यम वर्गीयांचं जीवन तेव्हाही होतंच. अंगावर घालायला पुरेसा कपडा नव्हता. हौस मौज नव्हती. घरात फर्निचर नव्हतं. समाजवादानं



सगळेच शिवाजी ! सगळेच समाजवादी !

सगळी गरीबी दूर होईल – जगातले सगळे लोक एकाच पद्धतीचे जीवन जगातील, असं वाटलं आणि मन पुलकित झालं. शोभिवंत पिसारा असलेल्या निळ्या पक्ष्या-प्रमाणे समाजवादावर मी प्रेम करायला लागलो.

त्यानंतर अनेक पावसाळे आले नि गेले. माझं दोन खोल्यातलं जीवन तसंच राहिलं. समाजवाद आलाच नाही. दोन हातावरून उडणाऱ्या शोभीवंत पक्ष्याप्रमाणे समाजवाद दिसतच आहे. हाताला मात्र लागत नाही.

आज तर सगळेच समाजवादी आहेत. इंदिरा गांधी, चव्हाण, जगजीवराम, मुरारजी, पाटील, निजलिंगप्पा – हे 'समाजवादी'च आहेत. जनसंघही समाज-वादीच आहे. स्वतंत्र पक्ष पूर्वी समाजवादी नव्हता. पण आता मसानींनीही तीच दीक्षा घेतलेली आहे. असा हा सगळा समाजवादी मेळा असूनसुद्धा मी मात्र दोन खोल्यातच आहे. झोपडपट्ट्या वाढतच आहेत. बेकारांचे थवे रस्तोरस्ती फिरतच आहेत. शिवाजीला पकडायला मुसलमानांचे सैन्य एका देवळात गेल्यावर तिथे सगळेच शिवाजी दिसले. खरा शिवाजी मुसलमानांच्या हाती सापडलाच नाही. आज सगळेच समाजवादी आहेत, पण समाजवाद मात्र सापडत नाही.

"तुम्ही कोणत्या पद्धतीचे समाजवादी ?" हा प्रश्न ! लेनीनवादी ? ... मग कामगारांची हुकूमशाही मान्य करायला हवी ... स्टॅलिनवादी ? ... मग सगळा दहशतवाद सहन करायला हवा ! स्टॅलिनला तरी खरा समाजवाद सापडला का ? कुणास ठाऊक ! स्टॅलिनचे एकाने वर्णन केले आहे. "Coercion, in the name of Utopia" स्टॅलिनला समाजवाद सापडलेला नसावा. कारण टिटोला त्यासाठी प्रयत्न करण्याची जरूरी उरली नसती. पण त्याने आपला निराळा मठ स्थापन केलाच – चीनचं तर सगळंच वेगळं ! कुणी म्हणतात, एखाद्या अनाथ पोरक्या मुलाप्रमाणं चीननं आपल्यावर अवलंबून राहावं, अशी रशियाची इच्छा होती. पण त्यानं ते मानलं नाही. त्यानं निराळा पंथ धरलाच !

भारतात हृदयपरिवर्तन करून समाजवादाकडे जावं असा गांधींचा हट्ट होता. नेहरूंचे तर आणखीनच वेगळे. त्यांचा समाजवाद कुणालाच कळला नाही. पण तो होता, हे खरे. सतरा वर्षे त्यांनी या देशावर अविरोध राज्य केलं. परंतु दोन हातावरचा तो निळा पक्षी एक हातावर काही आला नाही. निवडणुकीला मात्र समाजवादाने हात दिला. रशियाने पाच वर्षांत निदान निरक्षरता तरी घालवली आणि डॉक्टरांचे जाळे खेडोपाडी पसरले व रोगराई नाहीशी केली. नेहरूंचे वारस असलेले आम्ही मात्र खोटे ग्रामगौरव करीतच बसलो आहोत.

नेहरूंनंतर तर समाजवादाची आणखीनच परवड झाली. मरणोन्मुख झालेल्या रोग्याला वाचवण्यासाठी डॉक्टर आणावेत त्याप्रमाणे समाजवादाला वाचवण्यासाठी निरनिराळे राजकारणी जमले आहेत. इंदिरा गांधींचा समाजवाद वेगळा आहे. चव्हाणांचा आणखीनच वेगळा असेल. भारतात आम्हांला सगळ्यांना लोकतांत्रिक

समाजवाद आणायचा आहे. कम्युनिझम नकोच आहे. परंतु त्यातही. डावे उजवे आहेतच.

यापैकी कोण खरा, कोण खोटा, कळतच नाही. अहमदाबादची आणि मुंबईची, दोन्ही भाषणे मी या दृष्टीने मनःपूर्वक ऐकली. मलातरी काहीही अर्थबोध झाला नाही. अगदी तरुणपणी नेहरूंच्या भाषणात 'दारिद्र्य हटाव'च्या घोषणा ऐकून मन फुलून येई. आज तसे होत नाही. भारतातले लोक फक्त भाषणे ऐकतात. घोषणां-प्रमाणे कृती होणार नाही याचा त्यांना विश्वास असतो. महाराष्ट्र कॉंग्रेस '–समाज-वादी–' आहे – व्यक्तिगत संपत्ती राष्ट्राच्या मालकीची करावी, असं मत मांडलं जातं. पण त्यामुळे इथले श्रीमंत बागाईतदार आणि वतनदार व्यथित होत नाहीत. मागे दारूबंदी झाली तेव्हा पारश्यांनी आत्महत्या केल्या. सुवर्णबंदीनंतर सोनारांनी आत्महत्त्या केल्या. तसे आज का होत नाही.

मी तरी समाजवादी आहे का ? ... कुणास ठाऊक ! मला आज काहीच कळे-नासं झालं आहे. कोणत्याही तऱ्हेची संपत्ती नसणं, हा धर्म आमच्या कित्येक पिढ्यांना ठाऊक आहे. रानात शेत नाही नि गावात घर नाही अशी अवस्था आहे. मला समाजवादी व्हायला काही अडचण नाही. मी एक सामान्य मनुष्य आहे. राहायला घर असावं, नोकरी असावी, कपडालत्ता मिळावा, पैशाअभावी वैद्यकीय उपचार मिळाले नाहीत, असं होऊ नये, इत्यादी माझ्या साध्या गरजा आहेत. त्यासाठी एवढा गदारोळ कशाला ? रशियामध्ये सामान्य मनुष्य जगत असेल, त्यापेक्षाही जास्त चांगल्या तऱ्हेनं तो अमेरिकेत जगत असेल, तर, (अमेरिकेत समाजवाद नसला तरीही !) मला अमेरिकेचा द्वेष करण्याचे कारण काय ? ... काहीच कळत नाही. एवढे मात्र खरे, समाजवादाचा निळा पक्षी अजून दोन हाता-वरच आहे.

साऱ्या रात्रभर स्वप्नामध्ये मी तो निळा पक्षी धरायचा प्रयत्न करीत होतो. पण त्याने मला हुलकावण्या दिल्या. तो हातात गवसलाच नाही.

मुंबईला परत आल्यावर माझे हे स्वप्न मी एका मित्राला सांगितले. तो हसत म्हणाला, " मी जर भारताचा सर्वाधिकारी झालो तर एक कायदा करीन. त्याअन्वये 'समाजवाद' हा शब्द उच्चारण्यास किंवा लिहिण्यास मी बंदी घालीन. जो ती बंदी मोडेल त्याला देहान्ताची शिक्षा देईन. माझ्या हुकुमाचे जे नागरिक कसोशीने पालन करतील त्यांना नोकऱ्यात प्रमोशनं देईन, त्यांच्या मुलाबाळांना शिक्षण फुकट मिळेल आणि सर्व भारताचा प्रवास करण्यासाठी रेल्वेचा पहिल्या वर्गाचा पास मी त्या कुटुंबाला देईन. "

मित्र थट्टेने बोलत होता हे खरे. परंतु मला वाटते. 'समाजवाद' या शब्दाला वाचवायचे असेल तर एवढाच एक उपाय शिल्लक आहे !

(क्रमशः)

**(यापुढील लेखांक : वि. शं. पारगावकर)**

## चार

# मोरारजींचा बकरा

बादूमिया

जगात वर येण्यासाठी फक्त दोनच मार्ग आहेत. पहिला स्वतःच्या गुणांनी 'उद्धरेत् आत्मन् आत्मानम्.' हा झाला हिंदू वे ऑफ लाईफ. पूर्णपणे आदर्शवादी, अहिंसात्मक व सत्यवादी. दुसरा मोगल वा अहिंदू. मार्गात कोणी आडवा आला तर कापून काढ, मग तो मित्र असो, पुत्र असो का बंधू असो. दिल्लीत दारा जाऊन औरंगजेब गादीवर आला त्यामागे हे रहस्य होते. काही हिंदू राजे हे शिकले व सुखी झाले. जे पेशव्यांसारखे लोक हे रहस्य समजू शकले नाहीत ते असंख्य राघोबांमुळे जन्मभर पस्तावीत राहिले.

काँग्रेसने १९४७ ते १९५७ पर्यंत हिंदुमहासभा-निर्वासित-संघ (R. S. S.) हा ब्लॉकसीस् आपल्या उत्कृष्ट प्रचार तंत्राने व 'Every Hindu has his own price' हे तत्त्व अमलात आणून साफ नष्ट केला. हे केले नसते तर काँग्रेसला राज्य करणे जड गेले असते. नर्मदेच्या उत्तरेस ह्या ब्लॉकसीसने निश्चित बाजी मारली असती. नेहरूंच्या नाकाखाली प्रत्यक्ष दिल्लीत प्रा. वसंतराव ओकांनी कमाल करून सोडली होती. त्या वेळेस. आज मी त्या गृहस्थांना पाहतो तेव्हा मला वाईट वाटते. आमचे दोष त्याला कारणीभूत तर होतेच होते, आणि मुख्य म्हणजे सर्वांना 'जातीयवादी' बनविण्याची नेहरूंची किमया.

पुढे शिवी बदलली व इतर मुरब्बी मंडळींचे शिरकाण करण्याचा डाव शिजला. नव्या शिवीचे नाव प्रतिक्रियावादी, प्रत्याघाती. वरचा ब्लॉक्सीस साफ झाला. याचे कारण त्यांना पैशाचे महत्त्व कधी समजलेच नाही. वेडे आदर्शवादी लोक होते ते. पण हा दुसरा गट महा बिलंदर. काय वाटेल त्या शिव्या द्या पण बांध्या वाढ

घामडीच्या पक्षीकडे त्या गेल्या तर त्या यांना लागणार ना? पाटीलबोवा सोश- लिस्ट आहेत हे ऐकले की हसावे का रडावे तेच मला कळत नाही. पण ही मंडळी मुरब्बीपणे विचारतात, 'किर्लोस्करांचे कझीन् सरदेसाई कम्युनिस्ट आहेत त माकते वाटते तुम्हांला?'

माझ्या लक्षात येते, या लोकांच्यापाशी त्यांची केस चालवायला पालखीवाला छगला यांच्यासारखी प्रचंड ताकदीची माणसे आहेत. केव्हाही उपलब्ध. पेपर्स यांच्या बाजूचे. मनात आणले तर टाइम्स ऑफ इंडिया आजही पाच पैशात विकता येईल त्यांना नुकसानीत न जाता! इंदिरा गांधी अगदी सत्तेवर असल्या तरी काय? यांच्या बॉडीलाईन व बंपरसमोर टिकणे सोपे नाही.

पण म्हणून तर मॅच रंगली आहे.

पण हे युद्ध नव्हे. ही बाचाबाची आहे. आणि बाचाबाचीत विवेक फार कमी वेळा दिसून येतो. माणसाने विवेक सोडला की वेड्यासारखे काही बरळले जाते.

सध्या बाई कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना शिव्या देत आहेत. कॉंग्रेसच्या स्वातंत्र्योत्तर पहिल्या सोळा वर्षांच्या काळात सर्व सूत्रे नेहरूंच्याच हाती होती. फार काय, १९५९ साली कॉंग्रेसप्रमुख म्हणून पुरे एक वर्ष बाईंनी काम केले होते. शास्त्रीजींच्या कार- कीर्दीत बाई मंत्री म्हणून काम करीत होत्या म्हणजे या कॉंग्रेसच्या दुर्दशेस जबाब- दार कोण हे त्यांना कळावयास नको का?

गेल्या तीन वर्षांत देशाची व कॉंग्रेसची परिस्थिती सर्वांत बिकट होऊन बसलेली आहे आणि पक्षाची व देशाच्या राजकारणाची सर्व सूत्रे तर बाईंच्या हाती गेली तीन वर्षे आहेत. बाईंची गेल्या तीन वर्षांत जबाबदारीच धरायची नाही काय? का बाई 'बाई' असल्यामुळे त्यांना 'दूधभात'?

१९५७ सालची निवडणूक जवळ आली होती. नेहरूंनी एका दगडात पाच पक्षी मारले. 'जातीयवादी' पक्षी अर्धमेले होऊन पडले होते. समाजवादी लोक बरा थोडे डोके वर काढीत होते. कॉंग्रेसला कंटाळलेले लोक त्यांना कंटाळून, फिरून मते देतील हा संभव मोठा होता. बाहेरच्या साम्यवादी देशांना आम्ही समाजवादी आहोत हेदेखील दाखवायची जरुरी होती. आम्ही समाजवादी व डावे आहोत असे दाखवून, अमेरिकेकडून Pressure tactics खेळून मदत घेण्यासाठी नेहरू उत्सुक होतेच. पण हे दाखवायचे कसे? त्यासाठी नेहरूंनी नव्या दिशेचा आसरा घेतला. समाजवादाचे ध्येय पत्करले. हा कार्यक्रम साऱ्याच वरिष्ठ नेत्यांचा होता. प्रत्याघाती सिंडिकेटवर लादलेला हा प्रगतिशील इंडिकेटचा कार्यक्रम नव्हता. ठरावाचे पालन करण्याची जबाबदारी पंतप्रधानांवर नाही तर कोणावर होती? जे चांगले ते मी केले व जे खराब झाले ते सारे माझ्या प्रत्याघाती साथीदारांमुळे! जणू या दहा कलमी कार्यक्रमात यंग तुर्कांशिवाय अंमलबजावणी करण्यासाठी लायक कोणीच नव्हते!

पहिला मुद्दा सामान्य विम्याच्या राष्ट्रीयीकरणाचा. इंदिराबाईंनी त्याबाबतीत अजून का बरे काहीच केले नाही ?

दुसरा मुद्दा आयात–निर्यात व्यापार केंद्रीय करण्याचा. बाईंचे मुख्य विश्वासू सल्लागार दिनेशसिंग हे व्यापार उद्योग खात्याचे मंत्री. कालपरवा दिनेशसिंगांनी ' क्रमशः ' हे करू असे म्हटल्याचे आठवते. पण क्रमशः का ?

धान्याचा वाटणीविषयक व्यापार केंद्राने हाती घ्यायचा तिसरा मुद्दा. जगजीवन-राम हे समाजवादी वीर या खात्याचे मुख्य. ह्याचा विचार करण्यास जगजीवनराम विसरले कसे ? का प्राप्तिकराचा फॉर्म भरण्याप्रमाणे हेही...

जीवनावश्यक वस्तू माफक दराने देण्यासाठी शहरी व ग्रामीण सहकारी मंडळींचा विस्तार हा चौथा मुद्दा. महागाईने प्रजा इतकी कंटाळली आहे की ब्रेन ड्रेनमध्ये आमचा नंबर लागला तर बरे असे देशाभिमानी सुशिक्षितदेखील म्हणू लागले आहेत. गरीबांचे कैवारी, समाजवादी मन्त्री या गोष्टींकडे केव्हा लक्ष घालणार याची जनता आतुरतेने वाट पाहत आहे. अपना बाझार ही संस्था पराभूत पांढऱ्या टोप्यांना चेअरमन बनण्यासाठी व नुकसानीत जाण्यासाठी जन्मास आली आहे असे लोक म्हणतात.

अपना बाझार व ' खा ऽऽदी ' बोर्ड फायद्यात चालले आहे अशा शाखांची नावे कोणी चतुर वाचक मला कळवील काय ?

प्रोसेसिंग व कन्झ्यूमर ओरीएंटेड मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज् सहकारी क्षेत्रात नेणे. अजून नो प्रोग्रेस.

मुलांसाठी प्रोटीनयुक्त अन्न पुरविणे. मुद्दा सहावा. यास ऐटीत बालकांचा समाज-वादी चार्टर असे गोंडस नाव दिले गेले. पण बाई काही या दिशेने करून तर दाखवा.

शहरी प्राप्तीवर (कमाल) मर्यादा घालणे व संपत्ती व खोटे भपकेदार खर्च थांबविणे हा सातवा मुद्दा. याची चर्चा तर खूप झाली व होत आहे. पण प्रत्यक्ष फलित ? नुसते बोंबला. मंत्र्यांचे खर्च ऐकायचे आहेत एकेकाचे ? सॉरी. जागा नाही.

भूमिहीन मजुरांसाठी काही कार्यक्रम आखणे हा आठवा मुद्दा. फार उत्तम मुद्दा आहे. पण वेळ नाही विचार करायला.

नववा मुद्दा भूमिविषयक सुधारणांचा अंमल करण्याविषयी. गुजराथ व महाराष्ट्र या प्रांतांनी या दिशेने थोडी वाटचाल केली आहे. इतर राज्यांच्या नावाने पूज्य. बिहारात अजूनही जबरदस्त जमीनदारी चालते. एक खास गुपित सांगू ? स्वातंत्र्य मिळाल्यावर राजेंद्रबाबूंनी बिहारची हजारो एकर जमीन अगदी स्वस्त दराने विकत घेऊन आपल्या नातवांना बक्षीस दिली. मग इतर लोकांनी काय पाप केले आहे ? एक कांग्रेस खासदार उवाच, ' पण विकतच घेतली ना राजेनबाबूंनी ? कॉन्फिस्केट तर नाही केली ना ? '

दहावा मुद्दा राजेमहाराजांच्या वार्षिक तनख्यांविषयी. कोर्टात केस न्यायला सांगू म्हणजे दोन पंचवार्षिक योजना बघायला नको. वकिलांना पैसे दिले तर दहा कशाला, पंधरा वर्षेसुद्धा हा खटला चालू शकेल.

एकंदरीत, बँकेच्या राष्ट्रीयीकरणाप्रमाणे इतर मुद्दे हेही 'राजकीय'च आहेत, बहुजनहिताय नाहीत.

इंदिराबाई प्रगतिशील. म्हणून त्यांनी प्रत्याघाती मोरारजीभाईंना अर्थखात्या-वरून हाकलून दिले. प्रगतिशील म्हणजे समाजवादी. समाजवादी म्हणजे काय? संपत्तीचे विषम वाटप दूर करणारे ते समाजवादी धोरण.

त्या दृष्टीने मोरारजीभाईंची कारकीर्द तपासून पाहण्यासारखी आहे. जर न्याय द्यायचे ठरविले तर दोन्ही बाजू ठाऊक असावयास पाहिजेत. मी मोरारजींचा हस्तक नाही. त्यांची मुंबईतील कारकीर्द व अत्रे यांनी त्यांच्यावर केलेले आरोप माझ्या पूर्ण लक्षात आहेत. त्या प्रत्येक आरोपावर मी मोरारजीभाईंशी चर्चाही केली होती आणि सैतानाचीदेखील एक बाजू असते हे मला पटले होते. काय दुर्दैव असते एकेकाचे. त्या वेळी नेहरूंनी त्यांचा 'बळी' दिला आज त्यांच्या सुपुत्रीने. कारण? अती निष्ठेने त्यांनी या दोघांनी सांगितलेली कर्तव्ये पालन केली म्हणून. आमचे शास्त्रकार मोरारजींपेक्षा जास्त व्यवहारी आहेत. त्यांनी सांगून ठेवले होते, 'सत्यं ब्रूयात्' पण त्याजबरोबर हेही सुचविले की 'प्रियं ब्रूयात्.' मोरारजी व्यवहारी नाहीत व म्हणून 'यशवंत' नाहीत.

मोरारजींची ब्लिट्झने वर्णन केलेली कारकीर्द व कर्तृत्व साऱ्यांना माहीत आहे. पण पुढील सत्य फार थोड्यांना माहीत असेल.

१. १९४८ साली नांगरेल त्याची जमीन हा कायदा मोरारजीभाईंनी भारतात सर्वप्रथम महसूलमंत्री असताना करून साऱ्या आळशी जमीनदारांच्या शिव्या खाल्ल्या होत्या. या गोष्टीचा विचार १९६९ साली बाईंनी आपल्या दहा मुद्द्यात केलेला आढळतो.

२. गुजराथ प्रांतात जहागीरदारी व इनामी वतने नष्ट करून चार लाख भूमिहीनांना त्यांनी जमिनीचे वाटप केलें होते व जमीनदार, जहागीरदार व इनामदार यांच्या सामुदायिक शिव्या स्वीकारल्या होत्या.

३. मध्यमवर्गाने ज्याविरुद्ध खप आरडाओरड केली त्या अनिवार्य बचत योजनेचे जनक मोरारजीभाई होते. या बचतीने फायदा नाही असे कोण म्हणेल?

४. सोने हे विनउत्पादक आहे. त्यात पैसे गुंतविणे म्हणजे राष्ट्राचे सोने उगीच गंजत ठेवण्यासारखे आहे. अर्थात् मोरारजीभाईंनी जे धोरण आखले व त्याची कडक अंमलबजावणी केली त्याविरुद्ध खूपच ऊहापोह झाला. त्यामुळे मोरारजी अँटी-पीपल आहेत असा प्रचारही झाला. तत्त्व म्हणून मोरारजी चूक होते असे कोणीही म्हणू शकणार नाही. भारतात पंतप्रधानांपासून सर्वांना सोन्याचा मोह

आहे त्यामुळे ते सारे धोरण अयशस्वी ठरले.

५. कृषी–संपत्ती कायदा – यावर तर जो तो नाराज झाला आहे. शेतीवर इन्कम् टॅक्स नाही म्हणून मफतलालपासून दिलीपकुमारापर्यंत साऱ्यांनी फार्मस ठेवायला सुरुवात केली. 'मिनिस्टर विदाऊट ए पोर्टफोलीयो' प्रमाणे 'फॉर्मस विदाऊट एनी क्रॉप्स्' फक्त या देशातच आढळतात. मोरारजी, कसे होणार तुम्ही यशवंत ?

६. शेअर बाजारातील सट्टाखोरीवर मोरारजीभाईंनी अंकुश आणून प्रस्थापित हितसंबंधीयांचा (Vested interests) रोष ओढवून घेतला.

७. बँक्स व सामान्य विमा यांच्यावरील सामाजिक अंकुश. राष्ट्रीयीकरणाची ही पहिली पायरी होती. राष्ट्रीयीकरणास बाईंचा विरोध होता. सामाजिक अंकुश आणणे अवघड आहे. ते हळूहळू सफल झाले की मग राष्ट्रीयीकरणाची वाटचाल करणे सोपे जाईल असे मोरारजींचे म्हणणे होते. पण बाईंना एकदम राष्ट्रीयीकरणाचा झटका आला. त्या झटक्यात त्यांनी फक्त चौदाच बँकांचे राष्ट्रीयीकरण केले.

८. राज्यसरकारात बसेसच्या व्यवहाराचे राष्ट्रीयीकरण मुंबई सरकारने सर्वप्रथम केले.

९. दारूबंदीच्या कायद्याचा अंमल. खरं म्हणजे दारूबंदी मोरारजींचे धोरण नाही. धोरण कॉंग्रेस सरकारचे आहे. खुद्द मोरारजींचा मुलगा पितो असे त्याच्या दोस्तवर्गाने मला सांगितले. मग मोरारजींनी हे धोरण का अमलात आणायचा प्रयत्न केला ?

मोरारजी हे अडेलतट्टू, जिद्दी व फॅडिस्ट् आहेत असे मी एका लेखात लिहिले होते. त्यांनी मला विचारले, 'इतर विशेषणे मला मान्य आहेत पण फॅडिस्ट तुम्ही मला कशावरून ठरवले ?'

त्यांच्या हाती चरखा होता. मी समयसूचकपणे त्या चरख्याकडे बोट दाखविले. ते हसून म्हणाले, 'आमच्या पक्षाच्या नेत्यांनी काही तत्त्वे ठरविली आहेत. त्यांचे पालन आम्ही केले नाही तर जनता त्या तत्त्वांवर विश्वास कसा ठेवील, ते मला सांगा.'


'जग आज वेगाने पुढे जात आहे व तुम्ही मध्ययुगीन चरखा अजून सोडत नाहीत, हे दुर्दैव आहे.'

मी हे विधान केले व ठार मेलो. मोरारजींनी 'चरख्याचे उपयोग' या विषयावर मला अर्धा तास बौद्धिक सुनावले. माझ्या विधानाचा पडताळा मला एवढ्या लौकर येईल त्याची मला कल्पना नव्हती.

पण हे नेते नीट रागावले की चांगले बोलतात असा माझा अनुभव आहे.

[ पृष्ठ ४७ वर ]

# अध्यक्ष गमावले



रतनलाल भंडारी

## लेखांक : दोन

विन्स्लो ऑरीझॉन (आ. प्रेस सर्व्हिस)–'एअर फोर्स एक'ला अपघात झाला त्या खिडीच्या सर्व भागात पूर आले असून 'एअर फोर्स एक'चे सर्व अवशेष त्यात वाहून गेले आहेत. या पुरात दोन मदत कार्यकर्तेही बुडून मरण पावल्याचे वृत्त आहे. सर्वत्र तीन फूटांपर्यंत पाणी चढलेले आहे. जवळजवळ मैल दोन मैलांच्या परिसरात पुराच्या पाण्याने थैमान मांडले आहे. येथील अधिकाऱ्यांच्या गोटातून असे कळले की येथून पुढे अध्यक्षांच्या मृतदेहाचा शोध घेणे अशक्य झाले आहे.

### मंत्रीमंडळांची वादळी बैठक

ऑरीझॉनहून आलेल्या या वृत्तांची दखल तावडतोब उपाध्यक्ष फ्रेडरीक जे. मंडीगन यांनी घेतली आणि सायंकाळी मंत्रीमंडळाची बैठक बोलाविली.

या बैठकीसाठी एफ्. बी. आय्. चे डायरेक्टर रिअरडन्, सी. आय्. ए.चे पॅकर

आणि जनरल जिंजर—जॉईंट चिफ्स ऑफ स्टाफचे प्रमुख व जनरल कोस्टन (हवाई दलाचे प्रमुख) या सर्व मंडळींना आमंत्रीत केले होते.

अध्यक्ष मॅडीगन म्हणाले, "आपण सदैव याच परिस्थितीत राष्ट्राचा गाडा हाकू शकत नाही. या सर्व रहस्यांच्या संबंधात आपल्या या दोन जनरल्सनी दिलेल्या सविस्तर माहितीबद्दल आणि एफ्. बी. आय्. व सी. आय. ए. ने जी माहिती पुरवली त्याबद्दल त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले पाहिजे. यानंतर जर्मी हेम्स यांना आधिकृतरित्या मृत म्हणून जाहीर करण्याबद्दल आपला सल्ला मिळाला पाहिजे."

"अध्यक्ष त्या विमानात नसण्याची शक्यता असल्यामुळे त्यांचा मृतदेह अपघात-स्थळी न सापडणे शक्य आहे. त्यांच्या नाहीसे होण्याला इतरही कारणे असू शकतात." शार्कीने त्यांना आठवण करून दिली. "ते त्या विमानात नव्हते हेही गृहीत धरा."

"खरे आहे." मॅडीगन म्हणाले, "म्हणूनच आपण हा विचार केला पाहिजे असे मी म्हणतो. जर ते विमानात नव्हते तर ते आता प्रकाशात का येत नाहीत? ते भ्रमिष्ट झाले असतील, कदाचित त्यांचा खून झाला असेल अथवा कदाचित त्यांनी आत्महत्याही केली असेल."

"त्यांच्या अस्तित्वाविषयी कुठलाच धागादोरा मिळत नसल्यामुळे आपणाला त्यांच्या मृत्यूच्या संदर्भात अतिशय गंभीरपणे विचार केला पाहिजे."

"म्हणूनच हा विषय मी चर्चेसाठी आपणासमोर मांडीत आहे. या बाबतीत ॲटर्नी जनरल व मुख्य न्यायाधिशांनी आपला सल्ला द्यावा असे मला वाटते."

संपूर्ण डोक्यावर टक्कल पडलेले, जाडजुड अंगलटीचे ॲटर्नी जनरल हॉवर्ड केली यांनी उपाध्यक्षांच्याकडे नुसतेच रोखून पाहिले.

"मला ताबडतोब कुठलेच मत व्यक्त करता येणार नाही." संथपणे ते म्हणाले. "या बाबतीत तसा कुठलाच संकेत नाही. कुठलीही प्रथा नाही. मला असे वाटते की आपण या बाबतीत कोलंबीयांची पद्धती अवलंबावी. साधारणतः त्यांच्याकडे एक वर्षानंतर नागरिक मृत म्हणून जाहीर करण्याची जिल्हा निहाय तरतूद आहे असा माझा कयास आहे. त्याबद्दल थोडेसे बारकाईने पहावे लागेल."

"मुख्य न्यायाधिश, तुम्ही?" मॅडीगनला सत्ता आणि अधिकार यांच्यामुळे आपला उत्साह उतू जात असल्यासारखे वाटले.

"त्या जिल्ह्यांचे अध्यक्ष हे रहिवाशी नाहीत." ते म्हणाले "ते आपले मतदान आपल्या स्वतःच्या राज्यातून करीत असत. या बाबतीत आपणाला त्यांच्या राज्यातील अधिकाऱ्यांचा विचार घ्यावा लागेल."

परराष्ट्र मंत्री शार्कींना आपला राग लपविणे अवघड झाले होते. "ही सर्व चर्चा या वेळी तरी अगदी अनावश्यक आहे. उपाध्यक्ष महाशय, माझी अशी कल्पना आहे की यापेक्षा अधिक महत्त्वाच्या गोष्टींवर विचार करावयाचा आहे."

प्रथम मंत्रीमंडळाने अध्यक्ष विमानात होते किंवा नाही प्रश्नावर चर्चा करण्यास सुरुवात केली, तेव्हा हवाई दलाच्या प्रमुखाने "नव्हते" असे आपले दृढ मत सांगितले. आपल्या नकारार्थी उत्तराच्या समर्थनार्थ पुढील करणे नमूद केली.

प्रवाशांच्या यादीत सात जणांची नावे होती आणि ते सातही जण विमानात चढले हे प्रयाणाच्या वेळच्या चलचित्रांवरून निश्चितपणे सिद्ध झाले आहे.

तसेच जरी सर्व प्रेतांची ओळख पटलेली नसली तरी निरनिराळ्या सात जणांच्या मृत देहांचे ते अवशेष आहेत हे निश्चित झालेले आहे. विमान तळांवरच्या संरक्षण व्यवस्थेत दोष आहेत असे गृहीत धरूनही उड्डाणापूर्वी कोणीही आत घुसले नव्हते याची खूपच काळजी घेण्यात आली होती.

"परंतु यापैकी एक प्रेत हे कुणा आगंतुकाचे आहे. यावरून मूळच्या यादीतील एका व्यक्ती ऐवजी तो आत घुसला असला पाहिजे. आणि ही 'ऐवजी' व्यक्ती अध्यक्षच असली पाहिजे."

शार्कींनी जवळजवळ चिडूनच एक जळजळीत कटाक्ष उपाध्यक्षांच्याकडे टाकला आणि म्हणाले, "आपण या निर्णयाप्रत कसे आलात ?"

"सरळ आहे. जर ते विमानात असले तर त्यांना मृत्यू येणे अटळ आहे. पण ते विमानात नव्हते तर अद्यापपर्यंत त्यांनी प्रकट व्हावयास पाहिजे होते. याचाच अर्थ ते मरण पावले आहेत."

"या बाबतीत," आपला प्रत्येक शब्द तोलून मापून, जोर देऊन, संथपणे बोलत परराष्ट्र मंत्री म्हणाले "अनेक खुलासे, कारणे देता येतील. त्यांच्या मौनाचाही खुलासा होऊ शकेल. त्यांच्या मृत्यूबद्दलचा कुठलाच शंकाविरहीत पुरावा उपलब्ध होत नाही तोपर्यंत ही सर्व चर्चा म्हणजे वेळेचा अपव्यय आहे. एवढेच नव्हे तर ही चर्चा म्हणजे अमेरीकेच्या अध्यक्षांचा अपमान आहे."

शार्कीने जवळजवळ आव्हानच दिले. फ्रेडरीक जेम्स मॅडीगनने आव्हानाचा स्वीकार केला.

"कदाचित" उपाध्यक्ष म्हणाले, "तुमच्या या भावनेवरून असे दिसते की, माझ्या मंत्रीमंडळात राहून राष्ट्राची सेवा करण्याची आपली इच्छा नसावी."

"एक क्षणभर तुम्ही दोघेही थांबा. वैयक्तिक भांडणाची ही वेळ नव्हे." संरक्षणमंत्री म्हणाले.

मॅडीगन परराष्ट्र मंत्र्याकडे अंगुली निर्देश करीत म्हणाले, "जीम्, मला वाटते मीच प्रथम तुझी क्षमा मागितली पाहिजे. आय् ॲम सॉरी ! माझ्या मेंदूवर फारच ताण पडला आहे."

मंत्रीमंडळात उफाळलेल्या भावना थंड झाल्या. मध्यवर्ती गुप्तहेर खात्याचा रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला. मंत्रीमडळांचे सर्वसाधारण असे मत पडले की जरी अध्यक्षांच्या नाहीसे होण्यामागे रशिया अथवा चीनचा हात असल्याचा पुरावा

उपलब्ध नसला तरी बॉम्बफेकी विमाने व क्षेपणास्त्रे ही प्रतिरोध करण्यांच्या तयारीत सज्ज ठेवण्यात यावीत.

## शोधासाठी दाही दिशा

अध्यक्षांच्या संदर्भात कसलेच नवीन वृत्त हाताशी येत नव्हते. या बाबतीत निराळयाच दिशेने वास घेतला पाहिजे असे गुंथर डॅमन सारख्या जेष्ठ पत्रकाराला वाटत होते. या दृष्टीने परराष्ट्र मंत्री शार्कीबद्दल त्याला थोडीशी आशा वाटत होती. अध्यक्षांचा डावा हात म्हणून, मॅडीगनपेक्षाही आधिक, विश्वास त्यांनी संपादन केलेला होता.

देशात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याच्या दृष्टीने शार्की पुढे येईल असे सर्वांनाच वाटत होते. पण हे सूत्र धरून वृत्त लेखन करणाऱ्या अंतरराष्ट्रीय वृत्त संस्थेच्या चारीस हॅरीमनला तसले काहीच चिन्ह दिसत नव्हते. तो परदेशी वकीलांची गाठ घेत नव्हता. कुठलीही पत्रकार परिषद बोलवीत नव्हता. कसलाही गाजावाजा न करता हा मनुष्य राजकीय स्पर्धेतून बाजूला झाला होता.

हॅरीमनने हीच बाब गृहीत धरून एक खास लेख लिहिला. कारण हेन्सच्या संदर्भातले सारेच लिखाण जनता उत्सूकतेने वाचत होती. आपण फारसे महत्त्वाचे उजेडात आणले आहे असे हॅरीमनला वाटत नव्हते. त्यामुळे जेव्हा त्यांच्या वरिष्ठाने, गुंथर डॅमनने, त्यांच्या घरी फोन केला तेव्हा त्याची प्रतिक्रिया आश्चर्याचीच होती.

"मी गुंथर डॅमन बोलतोय चॅरीस्...तुझा तो लेख वाचला...त्यावरून मला एक कल्पना सुचलीय. गेल्या काही रात्री शार्कीचे काय उद्योग चालतात याबद्दल तुला काही वास आला आहे काय? मला असं कळलंय की, त्यांना तुला घरी भेटता येणार नाही असं कळविण्यांत आले आह."

हॅरीमनला कोड्यात पडाण्यासारखे वाटले. "तुम्हाला काय म्हणायचंय ते मला कळत नाही गुंथर. ते बरेच लवकरच बाहेर पडतात...सहा-सात वाजता म्हणा ना. बहुतेक ते घरी जात असावेत आणि..."

"चारीस्, ते घरी जात नसले पाहिजेत. मला वाटतं ते अमेरीकेच्या अध्यक्षांच्या भेटीला जात असावेत. अध्यक्ष म्हणजे फ्रेड मॅडीगन नव्हेत."

दुसऱ्या दिवशी स्टेट डिपार्मेंटमधल्या निग्रो शोफरची मुलाखत घेण्यासाठी श्री. चारीस हॅरीमन आलेले पाहून शोफरलाच आश्चर्य वाटले. हे महाशय मोठ्या लोकांच्या, पुढाऱ्यांच्या शोफर संबंधी कथा लिहिणार होते म्हणे. त्यांना कामाचा फार ताण पडतो का? एका आठवड्यात त्यांना किती प्रवास करावा लागतो! श्री. हॅरीमन यांना मैलांच्या आकडेवारीत फारच रस दिसत होता.

चॅरीस हॅरीमनकडून रिपोर्ट येईपर्यंत गुंथर डॅमन स्वस्थ बसले नव्हते. अनेक दृष्टीने या प्रश्नांची तपासणी करावयाची होती. उदाहरणार्थ अपघाताचा अधिकृत रिपोर्ट त्यांना तपासून पहावयाचा होता. रिपोर्टमध्ये अनेक तांत्रिक गोष्टींचे वर्णन

**SOUND SLEEP ON Kurl-on MATTRESS**



kurl-on is a completely new cushioning medium-resilient and restful. it is cool in summer and warm in winter the most ideal cushioning material.

**Kurl-on MATTRESSES**

AREA DISTRIBUTORS **MITRA AGENCIES** — 419, Narayan Peth, Poona 30 Phone : 57392 (Umbrya Ganpati Chowk, Near Gokhale Hall)

*Authorised Dealers :*

1. M/s. **Automotive Services,** Tilak Road, Poona 30. 2. M/s. **Aram Matresses,** Budhwar Peth, Poona 2. 3. M/s. **Bharatkumar Traders,** Near Quarter Gate, Poona 2. 4. M/s. **Car Care Centre,** Wellesley Road, Poona 1. 5. M/s. **Esso Corner,** Ganeshkhind Road, Poona 5. 6. M/s. **Kelkar & Company,** Bajirao Road, Poona 2. 7. M/s. **Kohinoor Stores,** Shanipar; Laxmi Road, Poona 30. 8. M/s. **Hari Ganesh Sane,** Bhanuvilas Chowk, Poona 2. 9. M/s. **Ladda & Co,** Z. P. Building, Poona 5. 10. M/s. **Super Automobiles,** J. M. Road, Opp. Hindvijay, Poona 4. 11. M/s. **Standard Automobiles,** East Street, Poona 1. 12. M/s. **Sagar Furnishers,** Bajirao Road, Poona 2. 13. M/s. **Shri Sai Service Station,** J. M. Road, Poona 4. 14. M/s. **Super Services,** Bombay-Poona Road, Pimpri, Poona 18. 15. M/s. **Tamhane Automobiles,** East Street, Poona 1. 16. M/s. **Southern Stationery Stores,** Main Road, Sang

(HEMBAWL)

होते. विमानांच्या बांधणीला अथवा पायलटच्या कृतीला कुठलाही दोष दिलेला नव्हता. पत्रकार परिषदेत हवाई दलाच्या प्रमुखांनी, जनरल कॉस्टननी हे मान्य केले होते की अध्यक्षांच्या पायलटने, कॅप्टन हेंडरसनने ' एअर फोर्स एकच्या 'ऐवजी जुने बोईंग ७०७ पसंत केले असते तर कदाचित अपघात टळला असता.

गुंथर डेमनने या संदर्भात रॉड पिचरशी बोलणी सुरू केली. त्यांनी विचारले, "खरंच हे असंच घडले आहे का? या रिपोर्टमुळे तुझे समाधान झाले आहे काय?"

"हो." पिक्चरने होकारार्थी उत्तर दिले.

"पायलटची काही चूक नाही? हा विमानाच्या कुवतीचाच प्रश्न होता? खरंच."

"निश्चितच्. या सगळयात या विमानाला अपघातच झाला नसता असे गृहीत धरले तर किती बहार उडाली असती. केवढे रहस्य हाताशी लागले असते. अर्थातच विमानात अध्यक्ष नव्हते हे गृहीत धरूनच मी विचार करतोय गुंथर."

डेमनने सहजपणे त्यांच्या मताशी अंशतः सहमत होत म्हटले. "अनेक गोष्टीही गृहीत धरूनच. त्यांत आगंतूकाला मुद्दाम घुसविण्यात आले होते. हेही गृहीत धरावे लागेल...खरच या अपघातामध्ये आणि अध्यक्षांच्या कुठे तरी गायब होण्याचे काय कारण असेल?"

"हा अपघात कदाचित घडलाच नसता," पिचरची टिप्पणी, "त्यांनी जर 'कॉन्डार' हे पूर्वीचेच विमान वापरले असते तर पुढची आपत्ती तरी टळली असती. पायलटला या बोईंग ७०७ चा चांगलाच सराव होता. एअर फोर्स एकच्या ऐवजी जर त्यांनी थोडचा वेळानेच विमानतळावर उतरलेल्या जुन्या 'एअर-फोर्स एक 'चा वापर केला असता तर."

"आपल्या भाषेतल्या या इवल्याशा शब्दांनीच इतिहास लिहला जातो. जसे 'जर' 'तर'" डेमन म्हणाले, "बरंय पिच्, आता तू तुझ्या कामावर रुजू हो."

पिच् चार पाच पाऊलेच पुढे गेला नसेल तोच एखादा झटका बसावा, साक्षात्कार व्हावा तसे गुंथर डेमन ओरडले, "पिच् ऽ?"

पिचर झटकन मागे वळला. गुंथरला नखशिखांत न्याहाळीत तो म्हणाला, "तुझं काही बिघडलय, गंथर?"

"तू आता काय म्हणालास ते पुन्हा सांग."

"काय पुन्हा सांग? मी असं म्हटलं की त्यांनी ७०७ नी प्रवास करावयास पाहिजे होता."

"नाही. तू म्हणाला होतास की त्यांनी थोडया वेळानेच रात्री उतरलेल्या 'जुन्या एअर फोर्स एक 'चा वापर केला असता तर. तुला ही क्षुल्लक बातमी मिळाली तरी कशी?"

" अँड्र्यू विमान तळावर मी जेव्हा विमानांच्या प्रयाण वेळा तपासून पहात होतो, तेव्हा माझ्या पहाण्यात आलेल्या विमानांच्या आगमन वेळाही पहाण्यात आल्या. ज्या तक्त्यांत N२६००० याही विमानांचा निर्देश करण्यात आला होता. हा नंबर केनडी आणि जॉन्सन वापरत असलेल्या बोईंग ७०७ चा आहे हे पटकन् माझ्या लक्षांत आले. एवढेच काय परंतु हे नवे विमान घेण्यापूर्वी हेग्स देखील त्याचा वापर करीत असत."

" पिच्, हे आले होते तरी कोठून ?"

" लेट् अस्, सी. मी जरा आठवण्याचा प्रयत्न करतो. मिनापोलियस् ... बरोबर ... मिनापोलियसहूनच. हे तिथे काय करीत असावे म्हणून मला थोडे, आश्चर्यच वाटले. मी टॉवरच्या प्रमुखांना याबद्दल मुद्दाम छेडले. परंतु त्याने या प्रश्नाला फारसे महत्त्व न देता ते ट्रेनिंगसाठी गेले असेल असे सांगितले."

" ते बरोबर किती वाजता उतरले ?"

" मला ते आठवत नाही. वेट ए सेकंड ... बहुतेक भल्या पहाटे पाच वाजता, फारतर त्यापेक्षा थोडया वेळाने ते उतरले."

" निश्चित ?"

" मला खात्री आहे. पाच किंवा थोडे फार मागेमागे. पण का –"

डॅमनने फोन उचलून कानाला देखील लावला होता. त्यांनी मिनापोलियसच्या आंतरराष्ट्रीय प्रेस सर्व्हिसच्या कार्यालयाला कॉल केला होता. जेव्हा फोन लागला तेव्हा त्यानी 'जुने एअर फोर्स एक' हे अध्यक्षांच्या विमानांच्या अपघातापूर्वी मिनीपोलियसला होते काय याची तावडतोब चौकशी करावयास सांगितली. त्यांनी तावडतोब माहिती हाती येताच पुनश्च कॉल करण्याचे आश्वासन दिले.

परंतु त्यानंतर लगेच आलेला फोन हा मिनीपोलियसचा नव्हता. तो चारिस हॅरीमनकडून होता.

श्रीयुत हॅरीमन यांनी आपली कामगिरी चोख बजावली होती. आवश्यक असलेली सर्व माहिती त्यांनी गोळा केली होती.

अपघात झालेल्या दिवसांपासून परराष्ट्रमंत्री शार्की यांची गाडी ७४० मैल धावली होती. माहितीबद्दल आभार मानून गुंथरने तावडतोब रस्त्यांचे नकाशे मागविले आणि तावडतोब आकडेमोडीला सुरुवात केली. त्यांच्याबरोबर त्यांचे प्रमुख स्टॅन दि व्हेरीन यांनीही नकाशावर वाकून बारकाईने पहाणी करण्यास सुरुवात केली. डॅमनच्या डोक्यात काय विचार चालले होते यांचा त्यांना बरोबर अंदाज आला होता. दि व्हेरीनच्या दृष्टीने हा दूरवर वेध घेऊन सोडलेला बाण होता. परंतु त्याने लक्ष्यांचा भेद होण्याची शक्यता होती.

त्यानंतर मिनीपोलियसहून 'ट्रंक' आला. गेले तीन आठवडे मिनीपोलियसमध्ये कोणीही जुने 'एअर फोर्स एक' पाहिलेले नव्हते.

गुंथर म्हणाले, 'स्टॅन, एअर फोर्स एकने आकाशात झेप घेतल्यावर बरोबर सात तासांनी हे विमान अँड्र्यूज विमान तळावर उतरले होते. या सगळ्या कटाशी, योजनेशी, रहस्याशी, त्यांचा संबंध असला पाहिजे. मला खात्री वाटते स्टॅन !"

"तुला असे म्हणावयाचे आहे काय की जुन्या 'एअर फोर्स एक'मध्ये हेन्स होते ? कुठेतरी जाण्याऐवजी ते कुठूनतरी येत होते काय ?

"नाही. त्या ७०७ मध्ये दुसरेच कोणीतरी होते. कोणीतरी म्हणजे ज्यांना गुप्तपणे हेन्स यांना भेटावयाचे होते ते. आणि म्हणूनच त्यांनी हा सगळा अव्यापुरेषु उद्योग केला असावा. ती पायस्प्रींगची फसवी सफर, हा अज्ञातवास या सर्वांचे सूत्र अजून नीट जुळत नाही. मग अजून लपवालपवीचा खेळ का चालू आहे ? इतक्या दीर्घ मुदतीचा हा अज्ञातवास आहे का ?"

"पण अँड्र्यूजवर ते उतरण्यास इतर अनेक कारणे असू शकतात." दि व्हेरीन म्हणाले.

"मग पिचरला ते मिनीशोलियसहून निघाले असे का सांगण्यात आले ? या विमानाच्या उतरण्याच्या वेळेस हवाई दलाने फसवणूकीचा पवित्रा का घ्यावा ? त्याचे कारण एकच ... हे विमान कोठून आले आहे त्याबद्दल दिशाभूल करण्यासाठी ... या प्रश्नांचा खुलासा हाच असू शकतो. चला. पुन्हा त्या नकाशाच्या पाठीमागे लागले पाहिजे."

हॅरोमनने दाखल केलेल्या आंकड्यांवरून असे दिसत होते की शार्कीची गाडी रोज एकशे ऐंशी मैल याप्रमाणे चार दिवस पळाली होती. त्यातून त्याच्या घरापासून वॉशिंग्टनमधील कचेरीपर्यंतचे चाळीस मैल काढून टाकल्यावर खाली एकशे चाळीस मैल शिल्लक रहात होते. म्हणजे एकेरी हिशोब केला तर दररोजचे रहस्यपूर्ण सत्तर मैल उरत होते.

हा प्राणी रोज वॉशिंग्टनपासून सत्तर मैल दूर जाऊन काय उद्योग करीत होता ? गुंथरने वॉशिंग्टनभोवती सत्तर मैलाचे वर्तुळ काढले. वर्तुळांच्या परिघावर कुठलेही महत्त्वाचे स्थळ दिसत नव्हते. परंतु परिघाच्या आतच पासष्ट मैलावर 'कॅटोस्टीन माऊंट पार्क' होते. आणि येथेच अमेरिकेच्या अध्यक्षांची खाजगी विश्रामाची कँप डेव्हीडची भूमी होती.

परंतु सर्वांत आधीच तर कॅम्प डेव्हीडची पाहणी करण्यात आली नव्हती काय ? त्या जागेची तपासणी करूनच मालकम जोन्सने त्यांना कळविले नव्हते काय की ती जागा वैराण असून तेथे स्मशान शांतता पसरली आहे म्हणून ? जर अध्यक्ष तिथेच असतील तर सर्वत्र पहारेकऱ्यांनी ती जागा भरून गेली असती.

गुंथरला ताबडतोब जोन्सशी बोलावयाचे होते, परंतु महाशय कार्यालयात हजरच झाले नव्हते. त्यांनी त्यांच्या घरी फोन केला. त्यांच्या पत्नीने सांगितले की, अतिश्रमामुळे गेल्या काही दिवसात घडलेल्या घटनांमुळे "त्याचे चित्त ठिकाणांवर

नाही." त्यांना गलितगात्र झाल्यासारखे वाटते आहे. गुंथरने सहानुभूतीचे दोन चार शब्द उच्चारून फोन खाली ठेवला.

"फोनवर कोण बोलत होते?" मालकम जोन्सने आपल्या पत्नीला विचारले.

"गुंथर होते. त्यांनी तुमची तब्येत कशी आहे याबद्दल चौकशी केली." थोडेसे अडखळून ती म्हणाली, "तुमच्या पुनश्च कॅम्प डेव्हीडला भेट देण्याबद्दल ते काहीतरी बोलत होते. मेल, हे काय लफड आहे रे?"

त्याने काहीच उत्तर दिले नाही. ते आपल्या खाजगी कोठडीत गेले आणि फोनवर एक नंबर फिरवला.

"श्री. रिअरडनचे ऑफीस" ते अतिशय हळू आवाजात बोलले.

## तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर

मंत्रीमंडळाच्या बैठकीला सर्वात शेवटी येणाऱ्यामध्ये परराष्ट्रमंत्री शार्की हे होते. नियोजीत वेळेपेक्षा अडीच मिनीटे अधिक झाली होती. ते याबद्दल 'क्षमस्व' म्हणणार होते, परंतु त्याच वेळी त्यांच्या डोळ्याने, एकाच गोष्टीचा वेध घेतला.

प्रत्येक सभासदांच्या नावाची दर्शिका ज्यांच्या त्यांच्या खुर्चीला पाठीवर मंत्री-मंडळाच्या बैठकीच्या खोलीत लावलेली होती. त्यावर त्यांचे हुद्देही लिहिलेले होते. उपाध्यक्ष मॅडीगनच्या खुर्चीच्या पाठीमागून पुढे जाताना त्यांनी त्यांच्या खुर्चीवरील दर्शिका पाहिली. "अध्यक्ष" त्यांनी ती अक्षरे पाहिली आणि त्यांना मळमळल्या-सारखे झाले.

अपघातानंतरच्या पहिल्याच बैठकीच्या वेळेस अध्यक्षांच्या रिकाम्या जागेचे प्रतिक सलत राहू नये म्हणून त्यांची खुर्ची मुद्दामच दूर कोपऱ्यात नेऊन ठेवण्यात आली होती. या अक्करमाशा मॅडीगनने या वेळेस ती खुर्ची वापरून त्यावरच आपली बैठक ठोकली होती. शार्कींना त्यामुळे एक प्रकारची घृणा वाटत होती. मंत्रीमंडळातल्या इतर सदस्यांच्या लक्षात आली होती की नाही कोण जाणे.

"जंटलमन्" मॅडीगन बोलत होते, "मी नुकतेच महत्त्वाचे कागदपत्र वाचून संपविले आहेत. त्यापैकी एक आता माझ्या हातात आहे. मला या गोष्टीची गंमत वाटते की, मी अधिकार सूत्रे हाती घेतल्याबरोबर माझे लक्ष या गोष्टीकडे वेधण्यात आले नाही. तसेच हे इतके महत्त्वाचे आहे की ताबडतोब मंत्रीमंडळाची बैठक घेऊन त्याची चर्चा करणे अतिशय महत्त्वाचे होऊन बसले आहे."

"तुम्ही कार्यकारी अध्यक्ष म्हणून जाहीर झाल्याबरोबर या गोष्टीकडे तुमचे लक्ष वेधण्यात आले होते." शार्की संथ आवाजात म्हणाले. परंतु त्यांच्या आवाजाला आक्रमकतेची धार होती.

मॅडीगन रागानेच म्हणाले की, "तुम्ही माझ्या टेबलावर कागदांचा एवढा मोठा गट्ठा आदळून सांगितलेत की जेव्हा मला वेळ होईल तेव्हा मी ते कागद नजरे-खालून घालावेत." त्यांनी प्रतिटोला दिला, "बरंय, मंत्रीमहाशय, आता मला

वेळ मिळाला आहे आणि मला धक्काही बसला आहे. या कागदपत्रात काय आहे याची आपण मला कल्पना न दिल्यामुळे मी अक्षरशः चकीत झालो आहे. हे आपल्या प्रिय भूमीवर बजावलेले संभाव्य मृत्यू वॉरंट आहे. मृत्यू वॉरंट."

आपल्या म्हणण्याचे सदस्यांवर केवढे नाटकीय परिणाम होत आहेत हे पहाण्यासाठी त्यांनी क्षणभर सर्वत्र नजर फिरवली आणि शार्की शिवाय सर्वांच्याच मनावर त्याचा परिणाम झाल्याचे पाहून त्यांना समाधान वाटले.

शार्की म्हणाले, "तुम्ही चीनच्या युद्धाला तयार असल्याबद्दलच्या राष्ट्रीय सुरक्षा मंडळाच्या रिपोर्टबद्दल बोलत आहात असे दिसते. तीन आठवड्यांपूर्वी जेव्हा अध्यक्षांना हा रिपोर्ट सादर करण्यात आला त्या कौंसिलच्या बैठकीला मी आणि संरक्षणमंत्री दोघेही हजर होतो या गोष्टीची उपाध्यक्षमहाराज आपण नोंद घ्यावी. आणि मला असे आठवते की तेव्हा आपण कुठल्यातरी जाहीर कार्यक्रमात गुंतला होतात."

"अगदी बरोबर" मॅडीगन छद्मीपणाने म्हणाले, "आणि दुर्दैवाने अध्यक्षांना तो परतल्यावर त्यातील मजकूर सांगावसा वाटला नाही. सध्या चर्चिला जात असलेल्या रिपोर्टचा अनेकांना अभ्यास करण्याची संधी मिळाली नसेल म्हणून यातील भावार्थ मी स्पष्ट करून सांगू इच्छीतो. हा नुसताच संदेश नाही, तर मित्रांनो हे गंभीर, मृत्यूचे वॉरंटच आहे."

"आपण पुढे बोलण्यापूर्वी," शार्की म्हणाले, "मला मंत्रीमंडळाला सांगावेसे वाटते की, कॉलीफोर्नियाहून परत आल्यानंतर अध्यक्ष या महत्त्वाच्या प्रश्नावर आपणा सर्वांशी चर्चा करणार होते. माझ्याच सल्ल्यावरून ही चर्चा त्यांनी पुढे ढकलली होती. हा रिपोर्ट मंत्रीमंडळापुढे चर्चेला ठेवण्यापूर्वी काही राजकीय हालचाली करणे योग्य ठरले असते म्हणूनच मी तसा सल्ला दिला होता. हा खुलासा मी क्षमायाचना म्हणून करीत नसून माहिती म्हणून देत आहे. आणि माझ्या या मताशी संरक्षण मंत्रीही सहमत होते."

"जर मला सल्ला विचारला असता" उपाध्यक्ष महत्त्वाचा विचार सांगत असल्यासारखे म्हणाले, "तर मी कधीच सहमत झालो नसतो. यामधील मजकूर इतका महत्त्वाचा आहे की, निव्वळ मंत्रिमंडळालाच नव्हे तर सर्व देशाला जाहीरपणे सांगितला पाहीजे. यातील काही महत्त्वाचे परिच्छेद मी वाचून दाखवितो. त्यांनी मंत्रीमंडळाला दाखविण्यासाठी अनेक परिच्छेद अंडरलाईन केलेले होते. त्यांच्यामुळे अनेकांना थोडेसे आश्चर्य वाटले. परंतु त्यांची प्रतिक्रिया ही घाबरल्याची, भीतीचीच होती. कारण या सर्व परिच्छेदांमध्ये लाल चीनने अण्वस्त्रांच्या स्पर्धेतील बहुतेक अंतर तोडल्याचे वर्णन होते व त्याचबरोबर क्षेपण पद्धतीतही प्रगती केली होती.

चीनच्या जवळ अमेरीकेचा प्रचंड भूभाग उध्वस्त करण्याची साधने होती आणि राष्ट्रीय सुरक्षा समितीला, चीनचा तसा उद्देश आहे, याबद्दल खात्री वाटत होती. त्यांना चीन हे केव्हा करील याबद्दल भविष्य वर्तविता येत नव्हते; परंतु चीन हल्ला चढवील याबद्दल त्यांना खात्री होती.

"तुम्ही आता जे काही वाचलेत त्यावरून चीनचा हल्ला करण्याचा दृढ निश्चय आहे हे समितीचे निश्चीत मत दिसत नाही–" दळणवळण मंत्री हार्वे ब्रुवकर म्हणाले, "त्यातच वेळेच्या बाबतीत अतिशय संदिग्धपणा आहे. मला वाटते 'दृढ-निश्चय' हा शब्द अतिशय कडक आहे."

"दृढनिश्चय अशा अर्थाने की जेव्हा चीनची अशी खात्री होईल की उद्याच लढाई करून जास्तीतजास्त मोठा विजय मिळण्याची शक्यता असेल तेव्हा" शर्की म्हणाले, "आणि जेव्हा अशी वेळ येईल तेव्हा आपणाला या विषयांची चर्चा करता येईल. कुणालाच खात्री देता येणार नाही."

"एक्झॅक्टली!" उपाध्यक्ष उत्साहाने म्हणाले, "कुणालाच खात्री देता येणार नाही. आता मला आपणा सर्वांना असे विचारावयाचे आहे की आपण आता या-बद्दल काय करणार आहोत? आपल्या घरी आरामात बसून त्यांच्या क्षेपणास्त्रांची वाट पहात बसावयाची काय?"

"मग आपण या बाबतीत काय करावे असे तुमचे म्हणणे आहे?" शार्कींनी साधा भाषेचा सभ्यतेचा बुरखाही फेकून दिला होता. त्यांनी नेहमीची 'सर' म्हणण्याची प्रथाही पाळली नाही.

"वेल्, मी तुम्हाला एक गोष्ट सांगून ठेवतो." मॅडीगन म्हणाले, "अणुयुद्धामुळे उध्वस्त झालेल्या या देशात अध्यक्ष म्हणून मी राहू इच्छित नाही. तसेच या स्थानांची, जबाबदारीची शपथ घेत असताना त्यात असे कुठलेही बंधन नाही की आमच्या शत्रूने आपल्या मनाला येईल त्या त्यांच्या सोईच्या वेळेस युद्धाला सुरवात करावी आणि आम्ही तोपर्यंत हातावर हात बांधून बसावे."

"मी आपणा सर्वांना विचारतो की," परराष्ट्र मंत्री पुनश्च म्हणाले, "आम्ही आतापर्यंत जे केले आहे त्यापेक्षा अधिक काय करावे? सर्व सैन्य युद्धासाठी जय्यत तयार ठेवण्यात आले आहे. कुठलाही हल्ला परतवून लावण्याच्या तयारीत आपण आहोत. आणि अशा अवस्थेत आपण वर्णन केल्याप्रमाणे आम्ही आरामात, हातावर हात बांधून येणाऱ्या आपत्तीला तोंड देण्याच्या तयारीत, बसून रहाणार आहोत. आपणाजवळ याला पर्याय आहे काय?"

"होय" मॅडीगन म्हणाले.

मॅडीगन, उपाध्यक्ष आता काय उत्तर देणार आहेत याच्या जाणीवेनेच मंत्री-मंडळात भीषण शांतता पसरली. त्यांची मने आणि वाचा दोन्हीही कल्पनेनेच थरारून गेली.

"आणि तुमचा उपाय ?" शार्कींना जरी उत्तर माहीत होते तरी त्यांनी विचारले.

"प्रतिबंधात्मक युद्ध. मला वाटते याच शब्दात त्याचे वर्णन करता येईल." अमेरीकेचे कार्यकारी अध्यक्ष म्हणाले.

## हेची फळ काय मम तपाला ?

मुख्य रस्त्यावरून गुंथर डॅमनने आपली मोटार बाजूला वळवली. लवकरच त्यांना संरक्षक शिपाई दिसू लागतील अशी त्यांची अपेक्षा होती.

त्यांनी लहानशा, रेताड रस्त्यावरून आपली गाडी हाकावयास सुरवात केली. रस्त्यांच्या कडेच्या झाडाझुडपातून कंपाऊंडच्या काटेरी तारा दिसत होत्या. "फेडरल प्रॉपर्टी – नो ट्रेसपासींग" हा बोर्डही त्यांचे लक्ष वेधून घेत होता.

हा कॅंप डेव्हीडचा बाहेरचा भाग होता तरी अजून रक्षकांची चाहूल लागत नव्हती.

आपले मत बरोबर आहे याची त्यांना शंभर टक्के खात्री होती. तो जॉन्सी आपल्याशी खोटे बोलला होता. त्याला निश्चितच इथे कसलातरी वास आलेला असला पाहिजे आणि वरिष्ठ पातळीवरून कोणीतरी दडपण आणून त्याच्या तोंडाला कुलूप घातले असले पाहिजे, परंतु आता गुंथरचा विश्वास डळमळू लागला होता. जॉन्सीने वर्णन केल्याप्रमाणे खरच सर्वत्र स्मशान शांतता पसरलेली होती. सारा मुलूख वैराण वाटत होता. त्याने सगळ्या बाहेरच्या अंगाला चक्कर मारली व शेवटी रखवालदारांच्या 'बॉक्स'पाशी आला. इथे मात्र कुणीतरी मनुष्य होता. एक तरुण कॉर्पोरल रखवालदारी करीत होता.

खरच त्या काटेरी कुंपणापलीकडे, अमेरीकेचे अध्यक्ष गुप्त बैठकीसाठी आले असले तर निदान चुकल्या माकल्या रखवालदारापेक्षा अधिक पुरावा निश्चितच नजरेस आला असता.

त्यांनी रखवालदाराला आपली ओळख करून देऊन त्याला असे विचारले की की आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेला असा सुगावा लागला आहे की कॅंप डेव्हीडमध्ये काहीतरी शिजते आहे. काहीतरी अध्यक्ष हेन्सच्या संदर्भात. आम्ही फक्त पडताळून पहात आहोत.

"अध्यक्ष हेन्स ?" कॉर्पोरल हसला, "येथे कुणीसुद्धा नाही. माझ्यासारखेच दोन-चार जण वावरत आहेत."

डॅमनने आजूबाजूला नजर टाकली. एक मरीन कोअरची जीप तेवढी नजरेच्या टप्प्यात येत होती. "तुम्ही जेव्हा कामावर हजर झालात तेव्हा अजूबाजूला गडबड होती काय ? हेलीकॉप्टर्स, लिमोइनशाईन्स असे काही तुम्हाला आढळले काय ?

"नाही रे बाबा. अगदी स्मशान शांतता नांदते आहे येथे. सॉरी सर, परंतू..."

"मला ठाऊक आहे. अच्छा..."

त्याने सांगितल्याप्रमाणे खरच सर्वत्र स्मशान शांतता नांदत होती. परत फिरताना गुंथर डॅमन हाच विचार करीत होते. किती योग्य वर्णन आहे परिस्थितीचे. 'स्मशान शांतता.' आता त्यांच्या मनात जर्मी हेन्सच्या मृत्यूबद्दल कुठलीही शंका राहिलेली नव्हती.

कुणाच्यातरी अवघडलेल्या खाकरण्याने व्हाईट हाऊसमधील मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या खोलीत पसरलेल्या शांततेचा भंग झाला. सर्वात प्रारंभी परराष्ट्रमंत्री जेम्स शार्कींनी बोलावयास सुरवात केली.

" प्रतिबंधात्मक युद्ध," ते म्हणाले, " हे आपणाला काँग्रेसच्या अथवा अमेरीकन जनतेच्या माथी मारता येणार नाही याचा या मंत्रीमंडळाने विचार करावा. ही गोष्ट आपल्या विचारांच्या बाहेर आहे. हे अधमपणाचे कृत्य ठरणार आहे."

उपाध्यक्ष फ्रेडरीक मॅडीगन यांनी आपल्या समोरच्या फाईलकडे बोट दाखविले. त्यामध्ये अतिशय गुप्त स्वरूपाचा राष्ट्रीय संरक्षण समितीचा रिपोर्ट होता. त्या रिपोर्टवरून हे सिद्ध होत होते की लाल चीनजवळ हैड्रोजन बॉम्बस् तर होतेच, पण त्याबरोबर त्यांचा अचूक मारा करणारी क्षेपणास्त्रेदेखील होती आणि ती वापरण्याचा त्यांचा निश्चय होता.

समितीच्या मताप्रमाणे. अमेरीकेचे नाव व निशाण पुसून टाकणारे युद्ध सुरू करण्याची तयारी केलेली होती. चर्चेचा विषय " चीन हे करील काय ?" असा नसून " चीन केव्हा हल्ला चढवील ?" असाच होता त्याबद्दल समितीला कुठलीच शंका राहीलेली नव्हती.

आणि आता गमावलेल्य अध्यक्षांनी त्यांच्यापासून लपवून ठेवलेली सर्व माहिती कार्यकारी अध्यक्षपद आल्यामुळे फ्रेडरीक मॅडीगन यांच्या समोर आली होती. त्यांना एकच उपाय दिसत होता—तो म्हणजे अमेरीकेनेच प्रथम हल्ला चढविणे

आपल्या दृष्टीकोनांच्या समर्थनार्थ त्यांनी सेनादलांचे सयुक्त सेनापती जनरल जिगर यांच्याकडे आपला मोर्चा वळविला. परतु त्यांना हवे तसे समर्थन प्राप्त झाले नाही.

" उपाध्यक्ष महाशय " ते म्हणाले, " ज्यांनी ही प्रतिबधात्मक युद्धाची कल्पना जगासमोर मांडली ते फार मोठे सेनानी होते हे मला मान्य आहे, परंतु मी आपणास असे सांगू इच्छितो की या कल्पनेच्या विरुद्ध आम्ही आहोत. ती एक गुन्हेगारीच्या समर्थनाची भव्य कल्पना आहे. हे मी सर्व सेनादल प्रमुखांच्या वतीने आपणास सांगत आहे."

मॅडीगन म्हणाले, " तुम्ही चीनच्या मुख्य भूमीवरच्या आपल्या लक्षांची प्रॉयटी यादी तयार केली आहे काय ?"

"होय, सर."

"या सर्व लक्ष्यांना उध्वस्त करणारी बॉम्बफेकी विमाने व क्षेपणास्त्रे तुमच्याजवळ आहेत ना ?"

"आपणाजवळ रशिया व चीनची लक्ष्ये एकाच वेळी उध्वस्त करतील एवढी नसतील."

"मी तुम्हाला जे विचारतोय त्याचे उत्तर हे नव्हे." मॅडीगन चिडखोरपणे म्हणाले, "आपण चीनबद्दल बोलत आहोत, रशियाबद्दल नव्हे. चीनमधील ही महत्त्वाची स्थळे उध्वस्त करण्याइतकी ताकद आपणाजवळ आहे किंवा नाही ? मला 'होय' किंवा 'नाही' असे उत्तर पाहिजे."

"मला तुम्हाला तसे होकारार्थी अथवा नकारार्थी उत्तर देता येणे शक्य नाही." जिगर म्हणाले.

"मग माझ्या प्रश्नांची तात्त्विक उत्तरे द्या, प्लीज. प्रत्यक्षात आपण एकाच हल्ल्यात चीनचे कंबरडे मोडू शकतो की नाही ?"

जिगरनी संरक्षण मंत्री टोबीनकडे पाहिले. परंतु अपेक्षित सहाय्य त्यांच्याकडून मिळू शकले नाही. मॅडीगनच्या आग्रहीपणामुळे त्यांच्या मेंदूवर चांगलाच आघात होऊ लागला होता. त्यांनी नाखुशीनेच मान हलविली.

"तात्त्विकदृष्ट्या" जनरल थोड्याशा तुच्छतेनेच म्हणाले, "होय."

उपाध्यक्ष सुटकेचा निश्वास टाकून आरामशीरपणे, आपल्या खुर्चीवर रेलून बसले. "मित्रहो, आपल्या शत्रूंनी आपल्यावर हल्ला करून आपल्या प्रतिकाराची ताकद कमी करण्याच्या अगोदरच आपण त्यांच्यावर हल्ला करण्यात आपण आपली जबाबदारी सोपी करीत आहोत. त्यात धोका कमी आहे. मारू किंवा मरू

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अँण्ड कं. प्रा. लि. बम्बअी-१.

शार्की; पहिला ठोसा कोण अंगावर घणार ? मला कोणी विचारले तर मी मात्र त्यांच्याकडेच बोट दाखवीन."

शार्कीच्या उसळत्या भावना उफाळून आल्यामुळे ते आपल्या जागेवर उठून बोलू लागले, " माझा असा आग्रह आहे तर, आपण आपल्या अध्यक्षांवर कुठला प्रसंग आला आहे याचा शोध घेईपर्यंत आपल्या अंधळेपणामुळे तिसऱ्या महायुद्धाच्या काठावर ओढून नेणाऱ्या विचारांचा फक्त प्रचार करावा." ते खाली बसले.

मॅडीगनने उल्हासाने आपला एक हात त्यांच्या खांद्यावर ठेवला. त्यात त्यांच्याशी एकमत दर्शविण्याऐवजी त्यांना शांत करण्याचा भाव होता.

"ओके. जीम. आपणांपैकी याबाबतीत कुणाच्या बाजूला उभा राहतोय तें पाहू या. मंत्रीमंडळांतील वरिष्ठ सदस्य म्हणून तुमच्यापासूनच सुरुवात करू या. मी असे गृहीत धरून चालतो की तू आपण थांबावे या मताचा आहे."

" तुम्ही माझा विचार योग्यपणे समजून घेतला आहे. आणि म्हणून–"

" तुमचे मत योग्य तऱ्हेने नोंदवून घेतले आहे. अर्थमंत्री तुमचे मत ?"

ग्रीकवंशाचे रुबाबदार विल्सम लॅगोस म्हणाले, " थांबावे."

" संरक्षण मंत्री ?"

मिचेल टोबीनने आपली मान खाली घातली. " मला आताच माझे मत व्यक्त करावे असे वाटत नाही." ते म्हणाले.

मॅडीगन म्हणाले, " ठीक आहे. तुमच्या मताकडे आपण मागाहून येऊ. ॲटर्नी जनरल ?"

हॉवर्ड केली म्हणाले, " मी कार्यकारी अध्यक्षांच्याच मताचा आहे. "

" पोस्टमास्तर जनरल ?"

कार्ल हर्टन म्हणाले, " थांबावे."

" गृहमंत्री तुम्ही ?"

" उपाध्यक्ष महाशयांनी इतकी व्यवस्थित बाजू मांडली की, " विल्फर्ड विक्स म्हणाले, " दुसरा कुठलाही मार्ग दिसत नाही."

" शेतकीमंत्री ?"

थिओडर लॉरीसन म्हणाले, " माझे मत विकस् व केली प्रमाणेच आहे. आता थांबणे हा आत्मघातच ठरेल."

" व्यापारमंत्री ?"

लहानगे उद्योगपती एडवर्ड सिलव्हरमन म्हणाले, " जर अध्यक्ष हेन्स हे युद्धाचा आदेश द्यावयास तयार नव्हते तर मीही त्याच मताचा आहे." मॅडीगन आपल्या हातातील पॅडशी रागाने खेळू लागले.

"आरोग्य, शिक्षण आणि समाजकल्याणमंत्री ?"

डोनाल्ड निकल्स म्हणाले, " जर आपण कृती केली नाहीतर त्याचा परिणाम आत्मघातातच होईल."

" घरबांधणी मंत्री ?"

बॅर्णी लिटलने प्रथम शार्कीकडे पाहिले आणि नंतर मॅडीगनकडे पहात ते उद्गारले, " थांबावे."

" मजूरमंत्री ?"

निकोलसन् गिलबर्ट म्हणाले, " माझा अध्यक्ष हेन्स आणि परराष्ट्रमंत्र्यांच्या निर्णय शक्तीवर विश्वास आहे. थांबावे."

" दळणवळण मंत्री ?"

हार्वे ब्रुककर पूर्वीच्याच आवाजाची नक्कल करीत म्हणाले, " माझा कार्यकारी अध्यक्षांच्या निर्णयशक्तीवर, देशभक्तीवर आणि बुद्धीमत्तवर विश्वास आहे."

मॅडीगननी आपल्या नोंदणी वहीकडे बारकाईने पाहिले. " थांबावे असे सहा जणांचे मत आहे. पाचजण माझ्या मताशी सहमत आहेत. अर्थातच मी माझ्याच बाजूने उभा राहणार हे ठरलेले आहेच. मित्रहो, दोन्ही बाजूला सहासहा मते पडली आहेत. मीक, तुझे मत हे निर्णयात्मक ठरणार आहे असे दिसते."

टोबीनच्या चेहऱ्यावर वेदनांचे, चलबिचलीचे असंख्य भाव उमटलेले होते. " परमेश्वरा मला मदत कर." ते पुटपुटले, " मी आता काय करू ? काय करावे हेच मला समजत नाही."

" डॅमइट् मिक " शार्की उसळून म्हणाले, " दुसऱ्या कोणी पहाण्याच्या आधी तूच प्रथम हा रिपोर्ट पाहिला आहेस. याच्या आधारे प्रतिबंधात्मक युद्ध सुरू करू नये असे अध्यक्षांचे मत होते हे तुला चांगले ठाऊक आहे. तू कशासाठी मागे पुढे पहातो आहेस ?"

" कारण " टोबीन म्हणाले, " हा रिपोर्ट पाहिल्यापासून माझी झोप उडाली आहे म्हणून."

" थांबावे की थांबू नये महाशय ?" मॅडीगननी आग्रह धरला.

" मी तावडतोब तुम्हाला उत्तर देऊ शकत नाही." टोबीन उत्तरले.

" समजा " शार्कींना सुचविले, " आपण थोडावेळ विश्रांती घेतली तर काही लोकांची मते बदलू शकतील."

मॅडीगननी मान्य केले. मंत्रीमडळ लहान लहान गटात विभागले गेले. शार्की आणि जनरल बाहेर व्हराडयांत निघून गेले. मंत्रीमंडळांच्या बैठकीच्या खोलीत मॅडीगननी टोबीनचा ताबा घेतला. " आता असे पहा मिक .."

## युद्धाचा निर्णय

विश्रांती संपली होती आणि मॅडीगनचा विजय झाला होता. " संरक्षण मंत्र्यांनी आपले मत निश्चित केले आहे " त्यांनी जाहीर केले आहे ' कदाचित पुन्हा कधीही न दिसणाऱ्या अध्यक्षांच्यासाठी आपण थांबावे असे त्यांना वाटत नाही."

" उपाध्यक्ष महाशय " शार्की म्हणाले, " मी आपणाला विनंती करतो की,

आपण हा अखेरचा निर्णय घेण्यापूर्वी कॉंग्रेसच्या प्रमुख सभासदांचा विचार घ्यावा."

"तसा विचार घेण्याची मला फार गरज वाटत नाही. कारण अध्यक्षांनी मला स्वतःलाच अंधारात ठेवले होते" मॅडोगन म्हणाले, "सारे मंत्रीमंडळही याबाबतीत अंधारातच होते. त्यातच आपले कॉंग्रेसचे सदस्य रहस्य स्वतःशीच ठेवण्याबद्दल फारसे प्रसिद्ध नाहीत. त्यातील एखादा पत्रकारांशी सूतोवाच करील आणि असे घडले म्हणजे आपणालाच बॉम्बविरोधी शेल्टरमध्ये आसरा धुंडाळावा लागेल. यातील बेसावधपणे हल्ला करण्याचे तंत्र संपूर्णपणे नष्ट होईल. जाताजाता हेही लक्षात घ्या की कोणी वृत्तपत्र प्रतिनिधीने छेडलेच तर हा नेहमीचीच मंत्री-मंडळाची बैठक होती असे सांगा."

"ही एवढीच चर्चा आपण करणार आहोत काय?" शॉर्की जवळजवळ ओरडलेच, "तुम्ही आता घेतलेल्या निर्णयाबद्दल आपल्या अंतरात्म्याला आणि सदसद्विवेक-बुद्धीला कौल लावलात काय! या सत्तेसाठी हपापलेल्या सामान्य माणसांच्या नादी लागून तुम्ही अमेरिकेला तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटणार आहात काय?"

"शार्की महोदय, मी राष्ट्रीय सुरक्षा समितीच्या म्हणण्याप्रमाणे कृती करीत आहे याची मी आपणाला जाणीव करून देत आहे. सी. आय. ए. ने देखील चीनच्या दुष्ट हेतूची ग्वाही दिलेली आहे. या सर्व धोक्यांचा विचार न करता मी वर्तन केले तर मी आधिकाररूढ होताना घेतलेल्या पवित्र शपथेला बट्टा लागेल. तुमच्या वैयक्तिक विरोधामुळे तर माझ्या देशाचे रक्षण करण्याची माझी भावना दृढमूल झालेली आहे. तुमच्या माहितीसाठी सांगतो परराष्ट्र मंत्री महाशय, मी आता या खोलीतून बाहेर पडून माझ्या कार्यालयात जाणार आहे. तिथे माझ्या डेक्कला एक लाल बटन लावलेले आहे. ते पॅंटागॉनमधील युद्ध कचेरीशी संबंधीत आहे. मी ते दाबून त्यांना इशारा देणार आहे. मंत्रीमंडळाने माझ्यावर विश्वास व्यक्त केला आहे आणि–"

"पण हे मतदान म्हणजे तोडून मोडून बळे बळे जमविलेले मतदान आहे." गिलवर्ट घोगऱ्या आवाजात म्हणाले.

उपाध्यक्षांनी त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले. ते उठून उभे राहिले. शार्कीही ताठ उभे राहिले. हा बुटकासा परराष्ट्र मंत्री मॅडीगनला जरूर पडली तर शारीरिक दृष्टचा देखील विरोध करून प्रतिबंध करण्याच्या पवित्र्यात उभा होता.

"माझ्या मार्गातून दूर हो शार्की" मॅडीगन थंडपणे म्हणाले.

"तुम्ही जे करणार आहात ते करण्याचा आधिकार फक्त अमेरिकेच्या अध्यक्षांना आहे." परराष्ट्रमंत्री पुटपुटले.

"मीच अमेरिकेचा अध्यक्ष आहे." फ्रेडरीक जेम्स मॅडीगन म्हणाले, "हेन्स मेले आहेत."

"नाही." खोलीच्या दुसऱ्या टोकावरून आवाज आला. "ते मेलेले नाहीत."

सर्वांच्या माना झटकन् खोलीच्या प्रवेशदाराकडे वळल्या. (क्रमशः)



लेखक : शं ना. नवरे

दिग्दर्शक : रमेश चौधरी

# ग्रँड रिडक्शन सेल

सर्वसामान्य मराठी वाचकाला श्रीयुत शं. ना. नवरे हे नाटयपूर्ण कथा लिहिणारे कथाकार आणि अत्यंत यशस्वी कथाकथनकार म्हणून माहीत आहेत. तरीही विचक्षण रसिकाचे लक्ष श्री. शं. ना. नवरे यांच्या नाटय रचनेकडे कधीच वळलेले आहे. श्री. नवरे यांच्या नाटय लेखनांतील बराच भाग भाषांतरित-आधारित असला, तरी भाषांतरासाठी त्यांनी केलेली आयेनेस्को, आल्बी यांच्या नाटकांची निवड, संवादलेखनातील सहजता यामुळे त्यांच्या स्वतंत्र नाटयलेखनाविषयी विशेष उत्सुकता आणि अपेक्षा सुजाण रसिकाच्या मनात निर्माण झाल्या आहेत.

चालू वर्षातील राज्यनाटय महोत्सवात श्री. नवरे यांच्या 'ग्रॅन्ड रिडक्शन सेल' या स्वतंत्र नव्या नाटकाचा प्रयोग 'उदय कला केन्द्रा'ने सादर केला. प्रस्तुत नाटकाची कल्पना अभिनव आहे. तीन अंकांमध्ये काही पात्रांच्या जीवनखंडाचे सुसंगत दर्शन घडविणाऱ्या परपरागत नाटय रचनेचे गृहीततत्व येथे नाटककाराने नाकारले आहे. या नाटकात समाज हाच नायक आहे; आणि विविध समाजचित्रांतून नाटकांतील मूळ अनुभव लेखकाने मांडला आहे. हा मूळ अनुभव आजच्या जगात जगणाऱ्या प्रत्येकाचा अनुभव आहे. आजचे जग म्हणजे विक्रेत्यांचे जग आहे. पैसा हा या जगाचा परमेश्वर आहे; वेग आणि व्यवहार ही त्याची भाषा आहे; स्त्रीदेहापासून तो विद्वत्तेपर्यंत येथे सर्वांची ग्रॅन्ड रिडक्शन सेल चालू आहे; उत्तम विक्रेता हाच आजचा वीर आहे.

हा अनुभव श्री. नवरे यांनी दोन समाजचित्रांचा एक अंक, अशा तीन अंकी रचनेतून मांडला आहे. नाटकाच्या प्रारंभीच काळ पुरुष एक गाडी ढकलीत प्रवृत्तीचे विवेचन करीत येतो आणि जातो. पुढेदेखील सर्व प्रवेशातील पात्रांना रंगमचावर सादर करण्याचे काम तो करतो. पहिल्या प्रवेशात प्रेक्षकांना दिसते एक जोडपे-महत्त्वाकांक्षी नवरा व सुंदर बायको यांचे. "आपल्या घरात विकण्यासारखी एकच वस्तू आहे; आणि ती म्हणजे तुझे रूप" असे बेमुर्वतखोरपणे आपल्या निष्ठावती पत्नीला सांगणाऱ्या या नवऱ्याच्या मोठ्या आकांक्षा अफाट

धन–प्राप्तीमध्ये गुंतलेल्या आहेत. त्यासाठी पत्नीने सेल्स गर्ल म्हणून नोकरी करावी; आपल्या बॉसचा कोणत्याही मर्यादेपर्यंत अनुनय करावा; असे त्याला वाटते. त्याच्या पत्नीला मात्र ते मान्य नाही. सुखाची तिची कल्पना अगदी वेगळी आहे. परंतु पतीच्या अरेरावीपुढे तिचा विरोध दुबळा ठरतो. अशा वेळी अचानक तिचे सासरे येतात, आणि तिला फार मोठा आधार लाभल्यासारखा वाटतो. पण तिचे सासरेच मुळी मुलाचा वशिला लावून नोकरी मिळवू पाहतात; आणि एकमेव आधार कोसळल्यामुळे ती आल्या प्रसंगाला खालमानेने सामोरी जाते...दुसरा प्रसंग नाटयाच्या दृष्टीने अधिक परिणामकारक, श्री. नवऱ्यांच्या खास संवादशैलीने रोचक झाला आहे. हा एक उच्चस्तरीय कुटुंबातील प्रसंग आहे. कधीच घरात एकत्र न भेटणारे आई, वडील आणि मुलगा हे कुटुंबातील घटक एका दुपारी अचानक घरी येतात ते त्या प्रत्येकाने कोणालातरी गुप्तपणे घरी बोलावले असते म्हणून. या कुटुंबातील तरुण मुलगा वाह्यात आहे; सबकुछ झूट मानणारा आहे; पण आपले घर वेगळे असते तर आपणही वेगळे झालो असतो, असे समजणारा आहे. या मुलाने एका स्टेनो मैत्रिणीला घरी बोलावले आहे. वडिलांनी एका स्टेनोलाच कामाला बोलावले आहे. आईनेही एका स्टेनोलाच बसायला, चहाला बोलावले आहे आणि या तिघांची स्टेनो एकच आहे! वडील आणि आई दंभ-स्फोटाने चिरडीला येतात, आणि या विलक्षण परिस्थितीतून बाहेर नेणारा मार्गच नसल्याने मुलाचा आकांत होतो.

दुसरा अंक, पहिल्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशातील अनुभवाचा पुढचा टप्पा रंगवताना दिसतो. या अंकातील पहिला प्रवेश महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांच्या खाजगी सहलीचा आहे. थ्रिलसाठी दारू, मुलगी, खून अशा कोणत्याही मर्यादेपर्यंत जाणाऱ्या संतप्त पिढीचे हे दर्शन आहे. दुसऱ्या प्रवेशामध्ये शिक्षणक्षेत्रांतील विद्रूप बाजार मांडलेला आहे. तिसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशात स्त्रिया; मुले अशा माणसांचा व्यापार करणाऱ्या टोळीची कारवाई दिसते; तर दुसऱ्या प्रवेशात एका जातिवंत कवीने केलेल्या लाचार तडजोडीचे चित्र आहे. हा कवी साहित्यक्षेत्रांतील यश तोकडे मानून राजकीय यशप्राप्तीची स्वप्ने पाहतो. त्याची हळवी, पूर्वीच्या हळूवार स्मृती आळवणारी सहचरी हे सहन करू शकत नाही. निवडणुकीच्या संबधातील सभेकडे लुब्रेपणाने जाणारा आपला पती जणू वधस्तंभाकडे जाणारा वसंत सेनाघातकी चारूदत्त आहे असे वाटून त्याची पत्नी विद्ध होते. आणि नाटक संपते. हे नाटक नेमके संपले अथवा नाही याविषयी प्रेक्षागारात संदेह निर्माण झाला होता. पण खरे म्हणजे या नाटकातील गोष्ट कधीच संपणारी नाही.

असे हे नाटयाशय नव्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करणारे नाटक ' उदय कला केंन्द्रां'त ' दिग्दर्शक श्री. रमेश चौधरी यांनी सादर केले आहे. गेली तीन चार वर्षे ही नाटयसंस्था, गाजावाजा न करता, नवी प्रायोगिक नाटके प्रयत्नपूर्वक सादर

करीत आ`. (दोन वर्षांपूर्वी श्री. रत्नाकर मतकरी यांचे 'निखारे'–ट्वेल्व्ह अँग्री मेन या नाटकाचे भाषांतर हे नाटक याच संस्थेने सादर केले होते.) प्रस्तुत नाटकाचे दिग्दर्शन मात्र श्री. चौधरी यांनी अल्पकल्पकतेने केलेले दिसते. वर विशद केलेल्या पद्ध ीचा नाट्याशय परंपरागत बंदिस्त मंचावर सादर केल्यामुळे त्याची परिणाम-कारकता पुष्कळच कमी झाली आहे. याऐवजी ही विविध समाजचित्रे, रंगमंचाचे विविध कोपरे त्या त्या वेळी प्रकाशित करून, मागील भागाचा अवकाशसूचनासाठी उपयोग करून, सादर केली असती तर हा सामाजिक आशय पदींच्या प्रत्यक्ष परिणामांसह मांडता आला असता. तसेच सहलीचा प्रसंग वा, रेल्वे स्थानकावरील प्रसंग, पार्श्वभूमीला माणसांचा समुदाय वापरून सादर केला असता तर रोजचे सुरळीत दिनचक्र चालू असतानाच ही भीषण चेष्टितेही चालू असतात हे सुचवता आले असते. नाटकाची प्रकाश योजना तर अतिशय प्राथमिक स्वरूपाची होती.

श्री. शं. ना. नवरे यांना या नाटकात जे सांगायचे आहे ते जरी गहन असले तरी नाट्यरचनेत दृश्यात्मक अंगाला महत्त्व देऊन संवाद परंपरागत भाषणबाज संवादांपासून सर्वस्वी मुक्त ठेवणे उपकारक ठरले असते. तसेच काही ठिकाणी एक नाट्याचा आधार घेतला असता तर नाटकातील संघर्ष अधिक तीव्रपणे व्यक्त होऊ शकला असता.

या नाटकात कोणा एखाद्या पात्राला फारसे महत्व नाही. महत्त्व आहे ते समूहाला. त्यामुळे प्रयोगात देखील वैयक्तिक अभिनयापेक्षा सामूहिक अभीनयाला महत्त्व होते. परंतु दिग्दर्शकाला सामूहिक हालचालीतून नाटकाच्या गतिमान दृश्यात्मकतेला आकार देण्यात सर्वच ठिकाणी यश आले असे नाही. अशा काही प्रसंगी सौ. विजया मेहता, श्री. अरविंद देशपांडे यांच्यासारख्या दिग्दर्शकांची स्मृती उत्कटतेने झाली. एखाद्या अधिक जाणकार दिग्दर्शकाने या नाटकाची रंगावृत्ती सिद्ध केली असती तर अनेक वर्षे आठवण काढावी असा एक नाट्यप्रयोग निर्माण झाला असता. असो.

तरीही श्री. शं. ना. नवरे यांच्यासारख्या सिद्धहस्त कथाकाराने कथानक प्रधान रचना टाळून नाट्यरचनेचा जो अभिनव प्रयत्न प्रस्तुत नाटकात केला आहे तो मराठी रंगभूमीच्या भविष्याच्या दृष्टीने शुभसूचक मानावा लागेल. कादंबरी स्वरूप कथानकाच्या कचाट्यांतून आणि झगमगीत संवादांच्या हव्यासातून मराठी नाटक जेव्हा कधी मुक्त होईल तेव्हा श्री. नवरे यांच्या या नाटकाची स्मृति कृतज्ञता-पूर्वक काढली जाईल असे वाटते.

**– सौ. पुष्पा भावे**



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ◻ रॉंग नंबर : एक काव्य-विषय

आजकालच्या यांत्रिक जीवनात गुरफटलेल्या आधुनिक माणसाचे काव्यप्रेम नाहीसे होऊ नये म्हणून इंग्लंडमधल्या एका गावात एक अभिनव योजना आखण्यात आली आहे. तेथल्या काही कविताप्रेमी मंडळींनी म्हणे अशी व्यवस्था केली आहे की टेलीफोनवर एक विशिष्ट नंबर फिरवला की टेलीफोन करणाऱ्या माणसाला एक कविता ऐकू येईल. – अन् दर आठवड्याला नवी कविता ! कल्पना अत्यंत काव्यमय आहे यात शंका नाही, अन् कालिदास-भवभूतीच्या आपल्या देशात निश्चित अनुकरणीय आहे, पण एक ग्यानबाची मेख आहे. एका टेलिफोनवाल्याला आवडणारी कविता दुसऱ्याला कशावरून आवडेल ? उदाहरणार्थ, आमच्या धोरणाने "चिवचिव चिमणी छतात" ऐकण्याच्या इच्छेने टेलीफोन केला अन् त्याला "पिपात मेले ओल्या उंदीर" ऐकू आले तर ? किंवा केशवसुत ऐकण्यासाठी टेलीफोन करणाऱ्याला केशवकुमार ऐकू आला तर ? मला वाटते जुन्या-नव्या कवींचा झगडा टाळण्यासाठी रामबाण उपाय म्हणजे टेलीफोन-एक्स्चेंजमध्ये कविता करणारा कॉम्प्युटर बसवावा. डायल फिरवला की इन्स्टंट कविता ? पण एक यक्ष–प्रश्न उरतोच : कविता की रॉंग नंबर ?

## ◻ अंकगणिताची संगीत बारी

लंडन विश्वविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाने म्हणे असा शोध लावला आहे की, विद्यार्थ्यांना कुठलाही विषय शिकविताना संगीत वाजवले तर तो विषय त्यांना अधिक चांगला समजतो. च्यामारी ! म्हणजे पूर्वी सचित्र अंकगणित असायचे त्याच्याऐवजी आता संगीत अंकगणित येणार म्हणायचे. सुदैवाने आपल्याकडे फिल्मी दुनियेच्या कृपेने जगातला कुठलाही विषय शिकताना उचित संगीत बारीची उणीव पडायची नाही. इतकेच नव्हे तर कुठला विषय शिकताना कुठली फर्माइश करावी लागेल हे कुठलाही कॉलेजकुमार बसल्या बैठकीला सांगू शकेल. काही मासले... गणित : एक, दो, तीन, आ जा मोसम है रंगीन. वनस्पतिशास्त्र : बागोमे बहार

है. वाङ्मय : कोरा कागज था मन तेरा. मानसशास्त्र : ए मेरे दिल कही और चल. हवामानशास्त्र : सावनका महिना पवन करे सोर. मेकॅनिकल इंजिनियरिंग : प्यारका लेकर उडन खटोला. स्पेस सायन्स : मेरे सामनेवाली खिडकीमे एक चांदका टुकडा रहता है. अंतरराष्ट्रीय राजकारण : मेरा जूता है जापानी, ये पटलून इंग्लिस्तानी, सरपे लाल टोपी रूसी...

## ◻ प्रभू रामचंद्राची फॉरीन ट्रिप

काही पाश्चिमात्य तरुण मंडळीत म्हणे राम आणि कृष्णाची भक्ति वाढत आहे अन् त्यांनी सतारीच्या तालावर "हरे राम, हरे कृष्ण" भजन म्हणून दाखविण्याचा कार्यक्रमदेखील टेलीव्हिजनवर सादर केला असे परवा वर्तमानपत्रात वाचले. चला आपले धार्मिक मत निश्चित झाले. कारण साहेबाला – निदान साहेबाच्या पोराला – ज्याअर्थी राम अन् कृष्णाची भक्ति करावीशी वाटते त्याअर्थी देवभक्ती आता फॅशनेबल झाली असे म्हणायला हरकत नाही. खरे म्हणजे आतापर्यंत कुठल्याही देवळासमोरून जाताना मी कुणाला कळणार नाही अशा बेताने 'हलो'च्या थाटात किंचित् झटकून देवाला गुपचुप नमस्कार करीत असे. कारण भीती वाटायची – च्यायला, देवाला नमस्कार करताना कोणी पाहिले म्हणजे पोझिशन जायची ! पण आता ती धास्ती मिटली. आता आपण देवाला नमस्कारच काय अगदी शेकहँड करायला देखील कचरणार नाही. आता राम अन कृष्ण याच देवांना नेमकी फॉरीन पॉप्युलॅरिटी कशी मिळाली याचे कोडे माझ्या भाविक मनाला सुटलेले नाही. श्रीकृष्ण गोपींच्या बरोबर रासक्रीडा करीत असे खरा, पण ट्विस्ट करीत असल्याचे ऐकिवात नाही. बरे, सतारीमुळे रविशंकर इंग्लंड-अमेरिकेत पॉप्युलर झाला तसा बासरीमुळे श्रीकृष्ण झाला असेल असे म्हणावे तर पन्नालाल घोषप्रमाणे श्रीकृष्णाची एकही रेकॉर्ड निघालेली नाही अन् रामात या मंडळींना का राम वाटावा हे तर याहून मोठे कोडे आहे. एवढे मात्र खरे की सीता-हरण स्टोरी मेट्रो-गोल्डविन्-मेयरच्या एखाद्या सनसनाटी थ्रिलरला साजेल अशी आहे. त्यामुळे प्रभू रामचंद्राच्या हिच्कॉक-टाइप रहस्यकथेत पाश्चिमात्य मन रंगले असावे. ते काही का असेना, यापुढे वनवासातले प्रभू रामचंद्र पँट घालून अन् खांद्यावर रायफल टाकून सुवर्णमृगाच्या शिकारीला जाणार अन् श्रीकृष्ण कालिंदी-किनारी बासरी वाजवीत नंदाची गुरे वळवण्याच्या ऐवजी एखाद्या अमेरिकन डेअरीतल्या गाईंच्या समोर इलेक्ट्रिक अॅकॉर्डियनचा प्रोग्राम करणार. नाही तरी क्रिकेट खेळणारा गणपति बाप्पा दाखविणाऱ्या महाराष्ट्रातही असेच मॉडर्न देव पाहिजेत.

◻ ◻ ◻

## मोरारजींचा बकरा

[ पृष्ठ २४ वरून ]

" Nehru's Dreamland " असे म्हणून मी बाईंना गरम केले होते त्या वेळी मला बाईंचा हाच अनुभव आला. महाराष्ट्रातील एका थोर बाल-ब्रह्मचाऱ्यास " A true ब्रम्हचारी does not exist, " असे मी माझे medical opinion सांगताच ते पुढारी काय पिसाळले होते माझ्यावर. माझ्याबरोबर आलेला माझा एक आप्त तर घाबरूनच गेला ! पण नंतर त्या नेत्यांचा तब्बल तीन तास defence ऐकल्यावर स्वारी खूष झाली !

मोरारजी इंदिरेपेक्षा राजकारणात जास्त मुरब्बी, जास्त, अनुभवी व जास्त हुशार आहेत. त्यांनी 'चौ' व मुंबईच्या अमेरिकन काऊन्सलला निर्भयपणे कसे सटकाविले होते याचा अहवाल खुद्द त्यांच्याच तोंडून ऐकल्याचे भाग्य मला लाभले होते. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर मराठी ब्राह्मण पुढारी त्यांच्याकडे येऊन कसे रडत ते... खैर, जाने दो. याच पुढारी वर्गाने मोरारजींवर एकेकाळी टीका केली होती. काळाचा महिमा अगाध असतो. काही सत्ये उजेडात आली की सामान्य माणूस चटकन् आपले मत बदलतो.

पण सत्य उजेडात यायलासुद्धा काही काळ जावा लागतो.

मोरारजी यशाच्या बाबतीत दुर्दैवी आहेत. यश त्यांच्याजवळ जाते पण ते त्यांच्या पदरी काही पडत नाही. ते गांधीजींजवळ सरकारी नोकरी सोडून आले. सरकारी नोकरीत लोक त्यांची थट्टाच करीत असत. त्या वेळेस त्यांच्या शेजारी राहणारे श्री. ऐय्यर नावाचे इंजिनीयर माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. सरकारी नोकरीत एवढा सोवळेपणा कसा चालत नसे, मोरारजी त्या वेळेस गीतारहस्य रोज नियमाने कसे वाचीत, मराठी उत्तमपणे कस बोलत वगैरे गमतीदार गोष्टी ऐय्यर यांनी मला ऐकवल्या होत्या. गांधीजींच्या आश्रमात सारीच फॅड्स चालत. तेथे मोरारजींचा चांगला भाव होता. सरदार पटेलांकडे ते बऱ्याच गोष्टी शिकले. विशेषतः कडक शासकीय व्यवस्था व मुस्लीम-विरोध. सरदार पटेलांना मुसलमानांची थट्टा करण्याचा खूप शौक होता असे मोरारजी मला सांगत. मोरारजींनी तो गुण (?) उचलला आहे. अहमदाबादेच्या दंगलीवरून म्हणून त्यांना लोकसभेत 'दंगलीचे जनक' असे विशेषण मिळाले. मोरारजी काँग्रेसमन् असून मुसलमानांत लोकप्रिय कधीच नव्हते; आजही नाहीत.

चौ-एन्-लायला बेधडकपणे टरकाविणारे फक्त मोरारजी. त्यांचा कम्युनिस्ट विरोध वॉशिंग्टननेसुद्धा मान्य केला होता. ते १९६२ च्या सुमारास अमेरिकेस गेले तेव्हा 'आफ्टर नेहरू ?' प्रश्नाचे उत्तर आज अमेरिकेत हजर आहे असे लिहून अमेरिकन वृत्तपत्रांनी त्यांचे स्वागत केले होते. पण त्यांना नेमके तेच नडले. कम्यु-

निस्टांना ते प्रिय नव्हते आणि अमेरिकन्यना ते जास्त हुशार वाटले. ते मुख्य मंत्री असताना अमेरिकन कॉन्सल त्यांना भेटायला आला. आमची संस्कृती आपण घोक्यात आणत आहात, आमचा हॉटेल्स् आपण बाराच्या आत बंद करण्याचा हुकूम दिला आहे, सिनेमांतील चुंबनांचे प्रकार आपण बंद केले आहेत वगैरे तक्रारी कॉन्सलने मोरारजींसमोर मांडल्या.

'मग त्यात वाईट काय झाले ?'

'अहो, एकमेकांना आपापल्या संस्कृतींची ओळख झाली पाहिजे, नाही का ?'

'पण हे आपले मत आहे का अमेरिकन सरकारचे ?'

'अर्थात् अमेरिकन सरकारचे. त्याला शैक्षणिक किमत आहे.'

'हो, खरं आहे.'

कॉन्सलला वाटले, आपण जिंकली.

मोरारजींनी आपल्या चिटणिसांना बोलावले व पत्र डिक्टेट केले. पत्र अमेरिकेच्या अध्यक्षांचे अभिनंदन करणारे होते. एकमेकांच्या संस्कृतींची ओळख व्हावी व शिक्षणात भर पडावी म्हणून मोरारजींचे सरकार शंभर मोठ्या आकाराचे फोटो अमेरिकेच्या अध्यक्षांकडे धाडीत होते व ते अमेरिकेतील प्रमुख शाळांत फ्रेम करून लावण्याची विनंती मोरारजींनी पत्रातून केली होती. ह्या शैक्षणिक मूल्याचे सारे श्रेय त्यांनी अमेरिकन कॉन्सलला दिले होते.

पण कॉन्सलच्या चेहऱ्यावर त्या डिक्टेट केलेल्या पत्राने घाम फुटला. त्याने हात जोडून कृपया हे पत्र अध्यक्षांना धाडू नये अशी विनंती केली.

'पण त्याने एकमेकांच्या संस्कृतींची परस्परांना तोंडओळख–'

'मी माझा पराभव कबूल करतो व माझी एकही तक्रार नसल्याचे लिहून देतो.'

'अच्छा, लिहून द्या.'

हे असे का घडले ?

मोरारजींनी पत्रात कोणार्क मंदिरातील निरनिराळ्या आसनांचे शंभर फोटो अमेरिकन शाळांना भेट देण्याची ऑफर दिली होती ! मोरारजींनी त्या कॉन्सलला जाताना खडसावले, 'जशी तुला तुझ्या संस्कृतीची मूल्ये टिकवून धरण्याची कळकळ आहे ना तशीच कळकळ माझ्याही मनात आहे. मला नाही वाटत, हॉलीवुडचे तिसऱ्या दर्जाचे सारे सिनेमे अमेरीकन संस्कृतीचे दर्शन घडवून आणीत असतील.'

ही धमक फार थोड्या मंत्र्यांमध्ये दिसून येते. गोरा साहेब म्हटला की या काळच्या साहेबांना देवदूत भेटल्यासारखे वाटते.

अमेरिकन कॉन्सलने एकदा मोरारजींना सुनावले, 'पण आम्ही तुम्हांला मदत देत आहोत.'

'सो व्हॉट, तुमची मदत अशा हीन कार्यासाठी वापरायची आहे का हे पण आपण तुमच्या अध्यक्षांना पत्र लिहून विचारू.'

काय बिशाद होती अमेरिकन कॉन्सलची पुढे जास्त गडबड करण्याची?

मोरारजी एकदा मला सांगत होते, 'ही परराष्ट्रे आधी बघतात आपले कुठवर चालेल या अविकसित देशात? त्यांना होयबा व सह्याजीराव पुढारी जास्त पसंत असतात.'

दिल्लीच्या एका प्रमुख इंग्रजी साप्ताहिकाच्या सुप्रसिद्ध संपादकाने दोन वर्षांपूर्वी मला सांगितले होते, 'मोरारजी दिसतात तेवढे स्ट्रॉंग नाहीत. He has his own weaknesses.'

गेल्या दोन वर्षांतील घटनांनी माझ्या संपादक मित्राचे हे विधान खरे आहे अशी माझी खात्री झाली आहे. मोरारजी पुन्हा डोके काढतील तर आणखी Explosive मालमसाला डावऱ्या लोकांजवळ तयारच आहे! वरून छु: म्हणण्याचाच अवकाश आहे.

अशोक मेहता व मोरारजीभाई यांचे सिंडिकेटमध्ये म्हणूनच जमत नाही.

सिंडिकेटच्या इतर मातब्बर लोकांच्यात एकमेकांविषयी बराच संशय आहे हे मानायवास खूप जागा आहे. कामराजांनी मोरारजींना तीन वर्षांपूर्वी हैराण केले होते हे मोरारजी कसे विसरतील?

मोरारजी अर्थमंत्री झाल्यावर त्यांनी आपली बुडणारी अर्थनौका बरीच स्थिर केली रुपयाचे डीव्हॅल्युएशन् करण्यास त्यांचा विरोध होता. ही गडबड अमेरिकन व रशियन दबावाखाली इंदिरा व कामराज यांनी घडवून आणली. दुर्दैवाने अर्थशास्त्राचे ज्ञान दोघांनाही नाही.

अर्थशास्त्र वाटते तेवढे अवघड शास्त्र नाही. पण बुडणाऱ्या आर्थिक नौकेला सावरून धरण्यासाठी तीन मुख्य चीजांची आवश्यकता असते. १ : राष्ट्रीय दृष्टी, २: शासनावर व लोकांवर असणारी कडक पकड आणि ३: बरीचशी सामान्य बुद्धी याने कॉमन सेन्स्. जपान व जर्मनी किंवा इस्राएल वा अमेरिका यांचे अर्थमंत्री स्वर्गातून उतरलेले देव नाहीत. त्यांना त्यांच्या देशाची परिस्थिती सुधारता येते तर ते आपणास का जमू नये? त्यात अवघड काय आहे?

अवघड फार आहे.

आम्ही 'स्वतंत्र' याचा अर्थ 'आझाद' असा करून घेतला आहे. या आझादीमुळे आमच्या जनतेस राष्ट्रीय कर्तव्य वा जबाबदारी सांगण्यास कोणी पुढे येत नाही. मजुरांना, विद्यार्थ्यांना, कर्मचाऱ्यांना, संपादकांना, पत्रकारांना हक्काची जाणीव आली आहे, कर्तव्याची नाही. भोगाची लालसा जागृत झाली आहे, त्यागाची भावना दिसत नाही.

२४ जानेवारी १९७०

लाचलुचपतीमुळे तर परराष्ट्राच्या ओंजळीने पाणी पिण्याचे धोरण आमची बडी मंडळीच आखतात, मग छोट्यांनी छोटी लाच खाल्ली तर त्यात नवल ते कोणते ?

दुसरे कारण आज लोकांवर कडक पकड कोणाची आहे ? १९६२ साली भारतीय लोक निदान एकसंध उभे राहिले. १९६५ साली तोच अद्भुत प्रकार डोळ्यासमोर घडला. पण १९७२ सालची आपण खात्री देऊ शकत नाही. उत्तरासाठी बंगाल, बिहार, काश्मीर व केरळ येथे डोळे उघडे ठेवून हिंडा व मग सांगा मला मी म्हणतोय ते खोटे आहे का.

तुमची अर्थशास्त्रीय धोरणे खूप उत्कृष्ट असतील. पण शासनव्यवस्थेने तुमच्याशी सहकार्य दिले तर ती धोरणे यशस्वी होणार ना ! जगजीवनराम किंवा गुलझारीलाल नंदा यांना त्यांचे आय. सी. एस. अधिकारी कसे उद्धटपणे हुकूम सोडतात, त्यांच्या ऑर्डर्स कशा नाकारतात हे मला माहीत आहे याउलट प्रत्येक गोष्टीची कसून छाननी करणाऱ्या मोरारजींना त्यांचे मंत्रालय आजही वचकून असते. हा फरक का ते मी सांगावयास का पाहिजे ?

कॉमन सेन्स ! तोच आज अनकॉमन आहे. वार्षिक अंदाजपत्रकात खोट पडत आहे, मग काडयापेटीवर दोन पैसे चढवा, चहाच्या प्याल्यावर चार पैसे चढवा, साखरेवर पाच पैसे चढवा ! मला सांगा, यास ' जीनीयस ' लागतो कोठे ? आणि विशेषतः भारतासारख्या शांतवृत्तीच्या लोकांत ? इतर गरम मिजासीच्या लोकांमध्ये एवढा अन्याय झाला तर काय प्रक्षोभ होईल ! येथे सारे कसे शांत शांत ! गुलामी मनोवृत्तीमळे चीड येणे बंद झाले आहे व राष्ट्रवादी वृत्तीच्या नैराश्यामळे दिवसेंदिवस लोप होत चालला आहे.

भांडवलशहा पैसा कमावण्याच्या बुद्धीत श्रेष्ठ असतील; पण परराष्ट्रांशी संगनमत करून भारतीय हिताशी गद्दारी करणाऱ्या भांडवलवाल्यांना क्षमा का व कोणी करावी ? त्यांच्यासारख्याच परराष्ट्रांशी संधान जोडलेल्या गद्दार पुढाऱ्यांनी. तेरी बी चुप व मेरी बी चूप राखण्यासाठी.

हा प्रकार आजचा नाही. त्याची सुरुवात स्वातंत्र्यानंतर लगेच झाली. तेव्हापासून भारतीय भांडवलशाहीचे प्रत्येक वेळी फत्तेच होत गेली. दुर्दैवाने.

स्वातंत्र्य मिळाले. काळाबाजारवाल्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अतोनात फायदा कमावला होता. ह्या सान्यांना वाटले, पटेल गृहमंत्री आहेत तेव्हा आपलेच राज्य आहे. त्यांना अक्षरशः हाव सुटली. नेहरूंनी ते डावे असल्यामुळे 'प्राईस कंट्रोल ' (किंमतीवर नियंत्रण) हे धोरण जाहीर केले. पण गांधीजी या काळाबाजारवाल्यांच्या मदतीस धावले. भांडवलशहांना आणखी काय पाहिजे होते ? त्या वेळेस एकदम किंमती तीस टक्क्यांनी वाढल्या. उत्पादन घटले व त्याच्या तयार मालाचा दर्जादेखील. सान्यांना फायदा उकळविण्याची घाई झाली होती. आणि

दुर्दैवाने या Quick Profit च्या रेसमध्ये सारे काँग्रेसचे उजवे बैल सामील झाले होते. मला त्या वेळचे नेहरूंचे रेडिओवरील भाषण आठवतंय. मी वयाने बराच लहान होतो; पण त्यांच्या शब्दांतील घुस्सा व जुस्सा आजही मी विसरू शकत नाही. ते १८ जानेवारी १९४८ रोजी रेडिओवर म्हणाले,

" There is a kind of creeping paralysis in our economy and the whole of India....I am the last man to say that the labour should be denied this weapon of strike, nevertheless there are times when strikes are dangerous...this is one of those times."

दुसऱ्या एका भाषणात व्यापारीवर्गाचे यथार्थ चित्रण त्यांनी रंगविले,

" I hope no one will challenge me when I say that during this last war a certain section of the employer class.. behaved exceedingly badly, exceedingly egotistically...I have yet to understand how, in spite of the ..heavy taxation in India, these last fortunes were made...We have to find some means and machinery to prevent this kind of shameful traffic in human beings and profiting at the expense of the nation."

वा: नेहरू, काय उत्तम बोललात! आपण काळाबाजारवाल्यांना चांदणी-चौकांतील घंटाघरावर लटकावून फाशी देण्याची भाषा काढली होती. ते बिचारे घंटाघर! तब्बल तप-दीड तप त्याने वाट पाहिली की नेहरू आज नाहीतर उद्या एखाद्या काळाबाजारवाल्यास तेथे लटकावतील. पण नेहरूंच्या राज्यात ते चिन्ह दिसेना. शेवटी वैतागून, कंटाळून, त्राग्याने ते घंटाघरच कोसळले, काळाबाजारवाले ताठच राहिले.

हा नेहरूंचा पराभव कोणी, कसा व का घडवून आणला ?

ह्या प्रश्नाच्या उत्तरात आमच्या देशाच्या आर्थिक भुकेकंगालीची सारी मीमांसा बघावयास मिळेल.

पहिला पराभव पटेलांनी घडवून आणला. त्यांनी काळाबाजारवाल्यांना चक्क अभयदान दिले. एका समाजवादी थोर नेत्याने मला सांगितलेले वाक्य मी अजून विसरू शकत नाही. 'नेहरू सोशलायझेशन कशाचे करणार होते ? पटेलांनी त्यांच्या प्रत्येक समाजवादी हालचालीवर नियंत्रण आणले. कारण त्यात पटेलांच्या नातेवाइकांचे हात गुंतले होते. लाखो रुपये त्यांनी कमावले ! म्हणून नेहरूंना एकच मार्ग मोकळा राहिला. सोशलायझेशन ऑफ व्हॅक्यूम ! ते केवळ घोषणा करीत राहिले, त्याला अर्थ उरला नव्हता.'

मी कम्युनिस्ट नाही. तरीही मार्क्सच्या थोरवीस मी मानतो. युरोपास त्याने एक बघण्यासाठी नवी आर्थिक दृष्टी दिली. ती सारी दृष्टी आपण येथे आख्खीच्या

आखखी आणून फिट्ट करण वडेपणाचे होईल हे मीही जाणतो. पण मार्क्सने भांडवलशहांचा आपल्यासमोर जो एक्स-रे ठेवला आहे तो आपण विसरणेही आत्महत्या करण्यासारखे होईल असे मला वाटते.

नेहरूंच्यासमोर ही एक्स-रे प्लेट होती पण ट्रीटमेंट देणे त्यांना जमले नाही. ट्रीटमेंट यशस्वी केव्हा होत नाही ? १: डॉक्टर बुद्दू असेल तर. २: औषधे मिळत नसतील तर. ३: खोटी औषधे दिली गेली तर. ४: रोग्यास औषधे घेणे परवडत नसेल तर व ५: रोग्यास औषधोपचार करायची इच्छाच नसली तर.

इथे रोगी, डॉक्टर दोन्ही उपचारासाठी उत्सुक होते. पण मध्ये अलबते गलबते लोकांचा विरोध होता. दोघांनाही हा विरोध काढून फेकून देऊ शकता आला असता. पण ते होऊ शकले नाही. नाहीतर भारताचा जर्मनी वा जपान झाला असता. समीट कॉन्फरन्समध्ये भारताचे नाव असते. मला असे वाटते, सुभाषबाबू जिवंत असते तर हा विरोधाचा माग त्यांनी हसत ठोकरून दिला असता. कारण ते गतिशील होते, क्रियाशील होते. त्यांना देशहितापुढे स्वतःच्या फॅड्सची पर्वा नव्हती. स्वातंत्र्यानंतर आम्हांस पराभूत जर्मन राष्ट्राकडून संरक्षण व आर्थिक धोरणाचा 'मोफत' Know How मिळू शकत होता हे आज मला येथे उघड करण्यास भीती वाटत नाही. पण नेहरूंनी फॅसिस्ट व नाझी सरकारची ॲलर्जी म्हणून ह्या तज्ज्ञांना हाकलून दिले. ही संधी पुन्हा आपल्याला कधीच मिळाली नाही. नंतर म्हणून जी foreign collaborations झाली त्या बहुतेकात अपवाद न वगळता सारी स्वार्थी व बदमाषी होती. आमच्या पुढाऱ्यांनी या सर्व खटाटोपातून अनंत पैसा खाल्ला व स्विस बँकातून जमा केला. आमच्या पुढाऱ्यांच्या लीला एका स्विस बँकरच्या तोंडून ऐकण्याचा प्रसंग आला म्हणून सांगतो, सारा प्रकार लाजीरवाणा आहे. रोज कमीत कमी एक कोट रुपयांचे स्मगलिंग चालते. आता devaluation मुळे जास्त. जे वडिलांना नियंत्रित करता आले नाही ते मुलीला कोठून साधणार ?

येथे मोरारजींचा उपयोग होईल.

कारण कडक शासन, हट्टीपणा व थोडीशी (?) दंडुकेशाही मोरारजींना आवडते व जमतेदेखील. त्यातील पथ्य किती, हे पाळायचे मात्र त्यांना जमत नाही. इंदिराबाईंना यातले काहीच जमले नाही, जमणार नाही व जमत नाही. म्हणून त्यांच्या वडिलांप्रमाणेच 'सोशलायझेशन् ऑफ् व्हॅक्यूम्' चालले आहे. निरर्थक व निस्तेज.

नेहरूंना कळून चुकले की भांडवलदारांपुढे त्यांचे काहीही चालणार नाही. त्यांच्याशिवाय कॉंग्रेसच्या निवडणुकांचा जंगी खर्च कोण सोसणार ? म्हणून त्यांनी पराभवातून मिश्र अर्थशास्त्राचे अभिनव तत्त्वज्ञान निर्माण केले. १९५० साली प्लॅनिंग् कमिशन नेमून सामाजिक न्याय व समानता देण्यासाठी एक आर्थिक योजना आखली. त्यांचे धोरण त्यांचे पुढील शब्द स्पष्ट करतात :

"If we do not ultimately solve the basic problems of our country, the problems of food, clothing, housing and so on, it will not matter whether we all ourselves capitalists, socialists, communists or anything else. If we fail to solve these problems we shall be swept away and somebody else will come in and try to solve them. So ultimately these major problems of the day are not going to be solved by argument or by war but by the method that succeeds in delivering the goods. That method need not necessarily be an extreme method belonging to either of these two rival ideologies may be something in between."

नेहरूंना भांडवलदारांनी नमविले. ते त्यांना विकत घेऊ शकले नाहीत. कारण नेहरू सत्तेवर होते, नेहरू डावरे होते, नेहरूंवर मार्क्सचा पगडा होता. तरीही त्यांनी भांडवलशहांशी 'काँप्रोमाईज्' केले. काँप्रोमाईज् याचा अर्थ पराभव. आणि या पराभवातून पंचाहत्तर 'मोनोपोलीज्' जन्मास आल्या. १९५१ साली भारताचे पाव भांडवल तेरा गटांमध्ये साचलेले होते. १९५८ साली ते पाच टक्क्यांनी वाढले. १९६३-६४ साली ७५ लोकांत देशाचे सुमारे पंचेचाळीस टक्के भांडवल वाटलेले आहे असे दिसून आले. (हझारी यांचा अहवाल) आणि या ७५ लोकांचे खास असे एक का दोनच 'दादा' आहेत ! आणि बाकीचे सारे त्यांचे विश्वासू हस्तक ! पैसे कमावणे हा गुन्हा नाही. ते पुण्यकर्म आहे, तो वैश्यांचा धर्म आहे. त्याने देशाची संपन्नता वाढते. पण भारतातील भांडवलदार मालाच्या दर्जाकडे बघत नाहीत. राष्ट्रांतील शास्त्रज्ञांना वाव देत नाहीत, पुरेसे कर भरीत नाहीत. मुद्दाम टंचाई निर्माण करून माल दुप्पट किमतीने विकतात. ते फोर्ड वा रॉकफेलर नाहीत, ते हिशेबाच्या वह्यांत गोलमाल करणारे मुनीम आहेत, सरकारी अधिकाऱ्यांना खिशात ठेवणारे कृतघ्न देशद्रोही आहेत. राजकारणाचा व्यापार व व्यापाराचे राजकारण या मोनोपोलीज्नी सुरू केले व देशाच्या अभ्युदयास खड्डयात टाकले. कारण स्पर्धेस ते वाव देत नाहीत स्पर्धा नाही म्हणजे मालाचा 'दर्जा खाली व किंमत वर !' यांच्याकडून लाखो रुपयांचे अनुदान मागणारे राजकारण। कोणत्या तोंडून व्यापाऱ्यांना सांगतील की भाव खाली झाले पाहिजेत म्हणून. भांडवलदारांच्या स्टीमरोलरपुढे नेहरू नमले, तेथे पाटील, निजलिंगप्पा, मोरारजी काय रडणार ?

सिंधी-पंजाबी लोक निर्वासित म्हणून आले. आज ते गब्बर झाले आहेत. कारण मेहनत करून त्यांना आपला व्यापार वाढविला. जर्मनी, जपान, इस्राएल या देशांनी या सिंधी-पंजाब्यांप्रमाणे व्यापार वाढविला, माल निर्यात करून अफाट पैसा मिळविला व आज आपले देश संपन्न केले. आमचे पब्लीक सेक्टरमधले लाचखाऊ अधिकारी व प्रायव्हेट सेक्टर्समधील स्वार्थी भांडवलशहा ! कसली

इभ्रत, कसली कमी किंमत, व कसला मालाचा दर्जा? म्हणून तर बट, केळी वगैरे निर्यात केलेल्या वस्तू परत येतात! जपान, चीन व हाँगकाँगच्या स्पर्धेसमोर आज आम्ही जबरदस्त मार खात आहोत निर्यात व्यापारात. त्यातून Devaluation झालेले. कच्चा माल कमी पैशास परदेशांना विकायचा व परदेशी यंत्रे व तयार माल जास्त किंमतीस विकत घ्यायचा. इतके दिवस Traditional निर्यात ज्यूट, रबर वगैरे वस्तूंचा तरी होई. आजच्या Synthetic चिजांच्या जमान्यांत तेथेही मार खात आहोत आपण. आमच्या कापडास अविकसित देशांत खप चांगला होता. पण त्या सर्व देशांत आज स्वतःचे कापड तयार होते. आमच्या साऱ्या निर्यात व्यापाराचा पाया शेती. शेती पावसावर अवलंबिलेली. अवर्षण किंवा अतिवृष्टी झाली की निर्यात मुर्दाबाद! आज आमच्या व्यापाऱ्यांना त्यांचा तयार माल इथेच खपविण्यास आनंद वाटतो. गिऱ्हाईक खूप व किंमती दुप्पट. शहरात सर्वत्र बाबू लोकांची Extra कमाई वाढली आहे. त्यामुळे हे मार्केट सोडून कोण निर्यात करण्याची तसदी घेतोय? परदेशी गिऱ्हाईक पडले चोखंदळ. त्यामुळे Export Promotion ही घोषणा सरकारला फसविण्यापुरतीच. निर्यात नाही म्हणजे आमच्या भांडवलाचा परदेशांना नुसता वन वे ट्रॅफीक! कोठून दरडोई उत्पन्न वाढेल भारतीयांचे?

मृत्युशय्येवर असलेली व्यक्ती शेवटी खरे सांगण्याचा प्रयत्न करते. मेडिकल ज्यूरीसप्रूडन्समध्येसुद्धा या जबानीस फार महत्त्व दिले गेले आहे. मोरारजींची इमारत आज पुरी कोसळली आहे. ती पुन्हा उठून उभी राहील एवढा आशावादी मी नाही. अशा परिस्थितीत मोरारजींची 'जबानी' भवितव्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरणार आहे.

मोरारजी इंदिरेस पंतप्रधान मानावयास आज तयार नाहीत. त्यांनी सांगितले, 'टेकनिकली त्या पंतप्रधान असतील. पण त्यांचे काँग्रेसचे प्राथमिक सभासदत्व काँग्रेस अध्यक्षांनी रद्द केले असल्यामुळे राजीनामा देणे हेच त्यांचे खरे कर्तव्य ठरेल. त्यांच्यामागे नव्वद टक्के लोक आहेत ह्या खोचक प्रश्नावरचे त्यांचे भाष्य तेवढेच खोचक आहे, 'लोकमत त्यांच्या बाजूने असेल तर त्यांनी फेरनिवडणुका घेऊन ते सिद्ध करावे.'

'लोकसभेत त्यांचे बहुमत नाही. त्यामुळे फेरनिवडणुकीची मागणी करण्याचा त्यांना खरं म्हणजे अधिकार नाही. राष्ट्रपतींचे खरे कर्तव्य हे की फेरनिवडणुकांपेक्षा काही दुसरा चांगला मार्ग आहे किंवा नाही हे पाहणे. इंदिरेची संसद विसर्जनाची मागणी कायदेशीर नाही असे माझे स्पष्ट मत आहे.'

'निरनिराळ्या पक्षांचे धोरण पाहता काँग्रेससरकारच्या व सिंडिकेटच्या दृष्टीने काही राजकीय बदल घडतील काय?'

'साऱ्याच पक्षांच्या धोरणात आज बदल घडून येत आहेत. जनसंघाचे नवे

धोरण प्रगतिशील आर्थिक कार्यक्रम आखण्याकडे दिसते. अर्थात् तो त्यास समाजवाद हे नाव देत नाही. स्वतंत्र पक्षाचे मसानी यांनी नुकतेच जाहीर केले आहे की स्वतंत्र पक्षास फार वेळ अलग (Isolated) राहता येणार नाही. मी फार वर्षांपासून सांगत आलो आहे की या देशात आर्थिक क्षेत्रात समाजवादी धोरणाशिवाय तरणे अवघड आहे. भारताची गोष्ट सोडा, साऱ्या जगातील राष्ट्रांत आज हीच भावना प्रबळ झाली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्व लोकांत समानतेची भावना निर्माण झाली. त्यामुळे समाजवादाची एक गरज निर्माण झाली आहे. मला वाटते, निरनिराळ्या पक्षांना समान कार्यक्रम ठेवणे वाटते तेवढे अवघड नाही.'

'सर्वांत अडचण आहे साधनांची—'

'कबूल. पब्लीक सेक्टरची आज फार जाहिरात होत आहे. परंतु सारे धन या जंगी उद्योगधंद्यात गुंतविणे लोकांच्या दृष्टीने फायदेशीर होणार नाही. आपल्यापुढे मुख्य प्रश्न आहे सर्वांना रोजगारी देण्याचा. आपण असे नियोजन आखले पाहिजे की १९७५ – १९७६ पर्यंत सर्वांना रोजगारी मिळू शकेल. त्याचबरोबर सर्वांना किमान जीवनमाने उपलब्ध झाली पाहिजेत. भारी उद्योग व तेही पब्लीक सेक्टरमध्ये—त्यात अफाट पैसा गुंतवण्याची जरुरी असते. उदा. बोकारो येथे आपण १००० कोटी रुपयांची गुंतवण केली आहे. त्याउलट खेडेगावच्या शेतीच्या उत्पादनाचे वर्धन करण्यासाठी आपण जर ५०० कोटी रुपये खर्च केले तर साऱ्या देशभर लहान लहान उद्योग सुरू होतील. त्याचे दोन फायदे आहेत. त्यामुळे जमिनीवरील लोकसंख्येचा दाब कमी होईल. जमिनीवर जादा मजुरी करण्याची मेहनत कमी होईल. शेतीवर जगणाऱ्या लोकांना चांगली प्राप्ती होईल.'

'जंगी उद्योगधंद्यांचे पब्लीक सेक्टर्समधील गुंतवणुकीचे भविष्य काय ?'

'पब्लीक सेक्टर्स प्रॉफीट–ओरीएंटेड् झाले पाहिजेत. ह्यात फायद्याकडे लक्ष न दिले पाहिजे ही कल्पना खुळी आहे. तेथील अधिकाऱ्यांना अनुभव नसतो व त्यामुळे तेथे गैरव्यवस्था माजते. आता पब्लीक सेक्टर्सचा आपल्याला अनुभव आला आहे. ही जास्त जास्त स्वायत्त झाली पाहिजेत. राजकारणी पुढाऱ्यांनी त्यांच्या शासनात ढवळाढवळ न केली पाहिजे. त्यांचा तेथे संबंध सामान्य धोरणांपुरता ठीक आहे. पण तेथील नेमणुका ह्या राजकीय पुढाऱ्यांनी केलेल्या नसाव्यात. कार्यदक्षता व तांत्रिक ज्ञान यावर सारा भर असला पाहिजे. इतके दिवस आम्ही इकडे दुर्लक्ष केले होते. भविष्यात या गोष्टीकडे लक्ष न पुरविल्यास पब्लीक सेक्टर्समधून जास्त उत्पादन व जास्त नफा मिळणे मुष्कील आहे.'

'ग्रामीण राहणी उंचावण्याची जबाबदारी तर राज्य सरकारांची. सहाजिकच, त्यांचे आर्थिक धोरण त्यांनीच आखले पाहिजे.'

'राज्य सरकारांना मार्गदर्शन नीट दिले गेले पाहिजे. ग्रामीण जीवनाचे चित्र सुधारले तरच लोक अधिकाधिक संख्येने तेथे पैसे गुंतवतील. प्रायव्हेट व पब्लीक

सेक्टर्समध्ये लोकांना भागदार होता येते ना ? त्याने भांडवल चटकन् उपलब्ध नाही का होत ? ग्रामीण विभागात प्रजेस भागदार बनवून घेतले पाहिजे.'

'ही गोष्ट तर रोज बोलली जाते.'

'पण प्रत्यक्षात तसे कोठे घडते ?'

'ह्या राजकारणाच्या धकाधकीत शेवटी फलित कोणते ? बहुमत ज्यांच्या बाजूला त्यांचाच विजय हे साधे तत्त्व तुम्हांला मान्य नाही का ?'

'पण बहुमत कोणाचे ? ज्यांना सभासद म्हणून आम्ही हाकलून दिले आहे अशांचे बहुमत ?'

'पण ह्या दोन शकलांचे पुनश्च एकीकरण होणार नाही काय ?'

'सध्या ती शक्यता फार कमी वाटते. बाईंच्या मर्जीनुसार साऱ्यांनी चालावे अशी त्यांची इच्छा दिसते आहे.'

'एकता व्हावी असे तुम्हांस वाटत नाही ?'

'ऐक्य साऱ्यांनाच पाहिजे आहे. मलादेखील ऐक्यच पाहिजे आहे. सध्या चालले आहे ते काही मोठे सुंदर व चांगले चालले आहे असे तुम्हांस म्हणायचे आहे का ? त्याने तर देशास एक धोका उभा झाला आहे. पण हा धोका कोणी उत्पन्न केला ?'

'पण ऐक्याचे प्रयत्न—'

'पण त्यासाठी सुरुवात कोणी करायची ? तेओ सत्ता पर छे, तेमणे पहेल करवानी छे के पछी मारे जई तेमने पुछवानु छे ? आवा जोडाणोमाटे तेमनी कोई इच्छा छे खरी ? वडाप्रधाने तो पछी मने एकदम फेंकी केम दीधो ? शरुआतथी आ बधु योजनाबद्ध ए रीते चालयु आवे छे.'

याचा अर्थ उघड आहे.

ही सत्तेची साठमारी आहे.

एक पक्ष खलास झाला तरच ती साठमारी बंद राहील. पण तसे होणे नाही.

हे सारे राजकारणी लोक महावस्ताद आहेत. ते दोघांचे तीन होतील व त्रिकोणातील दोन बाजूंची बेरीज तिसऱ्या बाजूपेक्षा नेहमीच जास्त राहील.

या नशिबवान दोन बाजू कोणत्या व त्या नेहमीच एका गटात राहतील का याचा विचार पुढील लेखात.

(क्रमशः)

जिंकतील कोण ? इंदिरा का कम्युनिस्ट ?

पुढील लेखांक.



अनिल बर्वे

# मैं तो डरपोक आदमी हूँ

क्षितिजापाशीही न संपणारा अथांग सागर. ब्रह्मस्तोत्र गात आहे. कुठेच न संपणारा – कुठेच न जाणारा एक रस्ता त्या सागराच्या कडेने अगम्याच्या गर्भात शिरत आहे. वाळूपासची माडाची रोपे वाट चुकलेल्या शिडांची वाट पाहताहेत. तिथंच कुठेतरी कोपऱ्यात एक घरकुल आहे. त्यात समाजबंधनात जखडलेलं कलावंताचं मन असह्य कोंडमारा सहन करीत काहीतरी निर्माण करायचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. त्या घरकुलाला नावाची पाटी नाही. पण त्या मनाला मात्र विशेष नाम आहे–

## हृषिकेष मुखर्जी !

'मैं तो एक डरपोक आदमी हूं. हिंदी फिल्मोंकी प्रॉडक्शन कॉस्टही इतनी बडी होती है की मैं कुछ कर नही पाता –हृषिकेश

'तरीसुद्धा अनुपमा–अनुराधा–आशीर्वाद–सत्यकामसारखे चित्रपट निर्माण करून आपण आपल्यातला कलावंत दाखवला '–मी

'नही भाई, आम्ही तर धंदेवाईक माणसं आहोत. आम्हाला स्वतःला कलाकार म्हणवून घ्यायचा आता काही एक हक्क नाही'–माझे वाक्य मध्येच तोडत विषादपूर्ण स्वरात हृषिदांनी कबुली दिली. मीही थोडा बावरलो – वरमलो.

'अधून मधून मन बंड करते आणि मग संधी मिळते तेव्हा काहीतरी चांगले चित्र तयार करायचा प्रामाणिक प्रयत्न करतो '– हृषिदा.

'चित्रपट तयार करताना तुम्ही हेतूला प्राधान्य देता की कथावस्तूला प्राधान्य देता?' माझा एक उगाचच बोजड प्रश्न.

'मला जे आवडते ते दाखवायचा मी साधा प्रयत्न करतो.' हृषिदांचे तितकेच साधे उत्तर.

'हृषिदा अनुराधा ते सत्यकाम वाट न्याहाळता तुम्ही प्रेक्षकांची 'टेस्ट क्रीएट' करू इच्छिता असे वाटते. –मी.

'नाही. ते एकटया दुकटया व्यक्तीचे काम नव्हे. जोपर्यंत शिक्षणाचा प्रसार वाढत नाही, सर्वसामान्य जनतेचे रहाणीमान सुधारत नाही तोपर्यंत केवळ एकतर्फी अभिरुचीची वाढ होणे अशक्य आहे. असा प्रयत्न म्हणजे 'लंगडया घोडयाची दौड' ठरेल. त्याकरता आपल्या समाजरचनेत बदल झाला पाहिजे.

'खरंय, तुम्ही म्हणता त्यात बरेच तथ्य आहे. माझी कबुली – अजून मला असं वाटतं की 'अशीर्वाद'ची लांबी जरा कमी पाहिजे होती. संपूर्ण लांबीच्या चित्राची एवढी काय आवश्यकता आहे?'–मी.

'परिणामाच्या दृष्टीने तशी काहीच नाही. परंतु हिंदी प्रेक्षकांच्या समाधानाला संपूर्ण लांबीचे चित्रपट लागतात व हिंदी चित्रांची किंमत एवढी जबरदस्त असते की, ही तडजोड करावीच लागते.'–हृषिदा.

'तुम्हीही तडजोड करता?'–मी.

'होय, करावी लागते. म्हणूनच मघाशी सांगितलं की मी भित्रट माणूस आहे. आज फिल्म आर्ट न राहता फिल्म इंडस्ट्री आली आहे. त्यामुळे नाईलाजाने मनाला न पटणारे हीन मूल्यांचे चित्रपट निर्माण करावे लागतात. मला माझ्या व माझ्या युनिटच्या पोटाची काळजी घ्यावी लागते.' हृषिदा.

'हा जो कलेचा धंदा झाला त्याचा दोष कुणाकडे?'–प्रश्न

'हा कुणा एका व्यक्तीचा नव्हे तर आपल्या समाजरचनेचाच दोष आहे.'–उत्तर.

'अनुपमाच्या यशानंतरही तुम्ही रंगीत चित्रांचीच कास का धरली?'–मी

'आपण जो निसर्ग पाहतो तो रंगीतच असतो नव्हे का? मग रंगांना का डावलायचं? रंगांवर बहिष्कार घालणे काही कलाकाराचे लक्षण नव्हे जर व्यवस्थित चित्रण केले तर ते परिणामकारक ठरतात. धंदाही बरा होतो. तेव्हा रंगीत चित्रांना 'अछूत' मानण्याचे काहीच कारण नाही!'

'हृषिदा, आपण आपल्या समाजातले 'सोशल प्रॉब्लेम्स' उदा. जातीभेदाचा प्रश्न वगैरे – का हाताळत नाही?'

'मनात आणले तर सरकार जातीभेदादी सर्व प्रश्न एका रात्रीत संपवेल. पण हे सरकारच अप्रामाणिक व लबाड आहे.'

– सौम्य प्रकृती बरीच जहाल वृत्तीची झाली!

'तरीसुद्धा 'आशीर्वाद 'मध्ये माझ्या वतीने मी हा प्रश्न हाताळला आहे!'

'हं! हृषिदा तुमचे पिक्चर बरेच वास्तवतावादी असतात असे वाटते.'–मी

'सर्टन स्टेजपर्यंत असतातही. परंतु अजून मी 'वास्तवतावादी' चित्र तयार केलेले नाही. त्या दृष्टीने विमलदांचे 'दो बिघा जमीन' बरेच आदर्श होते. भारतात वास्तवतावादी चित्रपट फक्त सत्यजित रे तयार करतात.'

'वास्तवतावादी म्हणजे नेमके कसे असे तुम्हाला वाटते?'–मी

'रिॲलीस्टीक म्हणजे डॉक्युमेंट्री नव्हे. ज्यात सत्याचा अंश आहे ते वास्तवतावादी. आपल्या ऑडीयन्सचे मानसिक वय सध्या आठ वर्षे आहे. त्यामुळे आम्हाला 'रूपककथाच' मोठ्या माणसांना दाखवाव्या लागतात. एक हीरो बारा जणांशी लढतो वगैरे'

'चित्रपटसृष्टीत आलेल्या 'न्यु वेव्ह' बद्दल आपणास काय वाटते?'

'काही तरी नवीन करणे म्हणजे 'न्यु वेव्ह' नव्हे. आणि तसं पाहिलं तर 'न्यु वेव्ह'ची व्याख्या करणंही फार अवघड आहे. पण सर्वसाधारण फिल्म कन्व्हेन्शन तोडून जी चित्रे तयार केली जातात त्यांनाच तुम्ही 'न्यु वेव्ह' किंवा 'रेव्होल्युशनरी' फिल्मस् म्हणा. फोटोग्राफी–ॲक्टींगचे कन्व्हेन्शन तोडून सत्यजीत रे यांनी बरेच पिक्चर बनवले. पण खऱ्या अर्थाने भारतीय चित्रसृष्टीत 'न्यु वेव्ह' आली नाही. जशी फ्रेंच वा इतर पाश्चात्य चित्रपटसृष्टीत आली आहे.'–हृषिदा.

'आपल्याकडल्या 'यादे' किंवा 'बंबई रातकी बाहोमे'सारख्या प्रायोगिक चित्रपटांचे भवितव्य काय?'–मी

'आपल्याकडे खऱ्या अर्थाने प्रायोगिक चित्रपट अजून झालेच नाहीत. तुम्ही म्हणता ते चित्रपट 'चाकोरीबाह्य' जरूर आहेत; परंतु प्रायोगिक असे नक्कीच नाहीत.'–हृषिदा.

'तुमचा प्रायोगिक निर्मितीचा विचार आहे काय? –मी

'आहे. पण हिंदीत शक्य नसल्याने मी मराठी – बंगाली चित्र तयार करण्याचा प्रयत्न केला. पण अजून काही जमले नाही.'

'आपणाला मराठी चित्रपट काढावेसे का वाटते?'–मी

'मी जरी जन्माने बंगाली असलो तरी 'चॉइस'ने मराठीच आहे'–हृषिदा

'हृषिदा, चित्रसृष्टीची परिस्थिती सुधारायला सरकारची काही मदत आवश्यक आहे काय?'–मी

सरकारला दर्जा असता तर अपेक्षा करण्यात काही अर्थ होता. वानगीदाखल एक उदाहरण देतो. परवा इंदिरा गांधी आल्या तेव्हा ग्लॅमर गर्ल आणि बॉईजचे प्रदर्शन भरवले. परंतु माझ्यासारख्या चांगल्या चित्राच्या निर्मात्याला साधं आमंत्रण सुद्धा आलं नाही.

—खंत होती. चिड होती. रागही होता.

'तरी पण तुमच्या काही अपेक्षा असतील नाही का ?'—मी

'हो मला वाटतं की 'एक्झीबेशन हाउसेस'चे राष्ट्रीयीकरण व्हावे आणि चित्रांच्या सेन्सॉर तारखेप्रमाणे वितरण व्हावे. चित्राच्या दर्जाप्रमाणे त्याला ए. बी. सी. सर्टिफिकेट द्यावे. वितरणाची हमी निर्माण झाली की बरेच प्रश्न आपोआप सुटतील. आज आम्हाला मोठ्या डिस्ट्रिब्यूटर्सचे व एक्झिबिटर्सचे पाय धरावे लागतात ते धरावे लागणार नाहीत.'

'चित्रपटसृष्टीतील ह्या मक्तेदारीवर काय उपाययोजना करावी ?' मी.

'हा सारा आपल्या अर्थव्यवस्थेलाच दोष आहे.' हृषिदा.

'तुम्ही कम्युनिस्ट आहात काय ? मघापासून तुम्ही सारखे समाजव्यवस्थेवर घसरताय म्हणून विचारतो.' मी.

'मी कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंधीत नाही; परंतु मार्क्सवादावर माझा विश्वास आहे. कोणीही प्रामाणिक माणूस – बुद्धिवादी माणूस हा मार्क्सवादीच असतो.' हृषिदा.

'बरं, ह्या चित्रपटसृष्टीतील काळचा पैशाचे काय करावे ?' मी.

'चोवीस वर्षं सक्तमजुरी आणि मालमत्ता जप्त करावी म्हणजे कुणी काळा पैसा ठेवायचा नाही.' हृषिदा.

'खोसला रिपोर्टविषयी आपणास काय वाटते ?' मी.

'रिपोर्ट तंतोतंत मान्य व बरोबर आहे; परंतु शेवटी त्याचा उपयोग धंद्याकरताच होणार अशी भिती वाटते. पण आपल्याकडेही नवीन – चांगले तयार करणाऱ्यांचा ग्रूप आहे, त्यांना फायदा घेता येईल.'

'तुमचं पहिलं पिक्चर कोणते ?' मी.

'मुसाफीर' त्यात मी शॉर्टस्टोरीज एकत्र केल्या होत्या दिलीपकुमार–किशोरकुमार – सुचित्रा सेननी त्यात कामं केली होती. ५७ सालचे पिक्चर असावे. त्याबद्दल मला सर्टिफिकेट ऑफ मेरीट मिळाले होते. हृषिदा.

या व्यतिरिक्त किती बक्षीसे तुम्हाला मिळालीत ? मी.

बरीच. 'अनुराधाला' गोल्ड मेडल. आनाडी व अनुपमाला सिल्व्हर मेडल. 'आशिर्वाद'ला बेस्ट प्रॉव्हिंशियल फिल्मचे बक्षीस मिळाले.


'आजपर्यंत तुम्ही किती पिक्चर बनवलेत ?'

पंधरा तरी केलीत. त्यात 'बिवो और मकान'सारखी 'ऑपेरा कॉमेडी' आहे आणि 'सत्यकाम'ही आहे. सत्यकाम माझे सर्वात चांगले पिक्चर आहे. – हृषिदा.

ग्लासातला चहा संपता संपता मुलाखतही संपली.

बाहेर अथांग सागर – अज्ञात रस्ता – माडाची रोपे. कुठे तरी वाचले आहे.

'हृषिकेश तीर्थस्थान आहे !' □ □ □



# अंदाज

पंडित वि म जोशी
ज्योतिष विशारद

२४ ते ३० जानेवारी १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान त्रासदायक आहे. शनी – रवी – शुक्र–गुरू केंद्रात आहेत. शनीची दशम दृष्टी रवी – शुक्रावर आहे. भाग्यस्थानापासून मालायोग झालेला आहे. यामुळे धनलाभ व व्यापारधंद्यात खात्रीने यश येईल; पण जिवाची धावपळ जास्त. प्रत्येक बाबतीत शारीरिक कष्ट पडतील. उष्णतेचे विकार होतील. आयत्या वेळी स्त्रीनातलगांकडून – विशेषत: आतेमामेबहिणींकडून मदत होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या घरातून होत आहे. ता. २७।२८ धनदायक जातील. पहिले दोन दिवस सोडून आठवडा यशदायी आहे. सार्वजनिक कामात निश्चित यश प्राप्त होईल. सरकारी कामात यश प्राप्त होईल. विद्याभ्यासाकडे लक्ष लागणार नाही. त्यातल्यात्यात सायन्सकडील विद्यार्थ्यांना जास्त अपयश येईल. कॉन्ट्रॅक्टर्सना ता. २९।३० रोजी जरूर ते भांडवल मिळेल.

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान नुकसानकारक आहे. शनी बारावा, मंगळ अकरावा, राहू दहावा, रवी – शुक्र नववे, बुध आठवा असा मालायोग आहे. चंद्राचे भ्रमण चार – पाच – व सहा या स्थानातून आहे. २४।२५।२६ घरगुती भांडणे होतील. मनस्वास्थ्य बिघडेल. भावंडांशी मतभेद होतील. कंत्राटदार – विशेषत: यांत्रिक व्यवसायाशी संबंध असलेल्यांना आठवडा चांगला जाईल. ता. २७।२८।२९ या दृष्टीने जास्त फायदा होईल. सरकारी कामात यश येईल. कोर्टकचेरीतील निकाल मनासारखे लागतील. अचानक धनलाभात अडथळे निर्माण होतील. विद्यार्थ्यांना अपयश. पंचमेश बुध आष्टमात आहे. भाग्येश गुरू सप्तमात आहे, त्यामुळे आर्थिक नुकसान फार होणार नाही. एकंदरीत आठवडा साधारण आहे.

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान धनदायक आहे. अकरावा शनी, दहावा मंगळ नववा राहू, आठवे रवी – शुक्र, सातवा बुध व पांचवा गुरू; सर्वच ग्रह शुभ फलदायी आहेत. चंद्राचे भ्रमण तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या घरातून आहे व ते शुभ आहे. बुध हा ग्रह स्वगृहावर पाहणारा आहे. आरोग्य चांगले राहील. अचानक धनलाभ होईल. भावंडांशी जमणार नाही. विद्यार्थ्यांना आठवडा चांगला जाईल. ३२ च्या पुढे वय असलेल्या व्यक्तींच्या हातून शास्त्रीय लिखाण होईल. वैद्यकीय धंद्यातील डॉक्टरांच्या हातून ऑपरेशन्स चांगली पार पडतील. केमिकल्सचा आणि रंगाचा धंदा करणाऱ्यांना अमाप नफा होईल. मित्राकडून फसवणूक होईल.

सरकारी अगर सहकारी कामात थोडा अडथळा येईल. ता. २४।२५ मनस्वास्थ्य बिघडेल. धाडसाची कामे करू नयेत. ता. २७ ते ३० हे दिवस चांगले जातील. त्यातल्यात्यात बुधवार, शनवार सर्व कामे यशस्वी होतील.

कर्क : या सप्ताहातील ग्रहमान धनप्राप्ती करून देईल. शनी दहावा हा एकच एक राजयोगकारक ग्रह. नववा मंगळ, आठवा राहू, सातवे रवी – शुक्र, सहावा बुध व चौथा गुरू – सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. अचानक धनलाभ होईल. लॉटरीत – वायदे बाजारात पैसे मिळतील. मेडिकल व्यवसायातील व्यक्तींना पैसा, मानसन्मान मिळेल. सार्वजनिक कार्यकर्त्यांना मोठेपणा प्राप्त होईल. त्यातल्यात्यात सिंडिकेटचे कार्यकर्त्यांना प्रगतीपर आहे. चंद्राचे भ्रमण २, ३ व ४ या घरातून आहे. ता. २४।२५।२६ – वाचाशुद्धी कमी होईल. बोलण्यात सयम पाळणे जरूर आहे. सार्वजनिक कामाला पैसा गोळा करण्यासाठी या तारखा शुभ आहेत. धनलाभात पत्नीचे साहाय्य होईल. लॉटरीचे तिकीट पत्नीच्या अगर मुलांच्या नावाने घ्यावे. याकरिता मंगळवार जास्त चांगला आहे. २९।३० तारखा धनदायक आहेत.

सिंह : या सप्ताहातील ग्रहमान कष्टदायक आहे. शनी नववा, मंगळ आठवा, राहू सातवा, रवी – शुक्र सहावे, बुध पाचवा, गुरू तिसरा. एकच राजयोगकारक ग्रह मंगळ अष्टमात आहे. सुखनाश, उन्नतिकारक घटनांमध्ये अडथळा, अशी त्याची फळे मिळतील. भावंडांशी मतभेद प्रवासात त्रास, मनस्वास्थ्य बिघडणे असे परिणाम दिसतील. एकच शुभफलदायी ग्रह म्हणजे रवी. 'लग्नेशेषष्ठगेहस्थे सिंहतुल्य पराक्रमी' ज्यांच्या कायमच्या कुंडलीत असा योग असेल त्यांना नोकरीत (सरकारी) नेहमी उच्चस्थान मिळते. चालू आठवड्यात या योगामुळे प्रमोशनचे हुकूम येतील. भागीदारांशी व पत्नीशी होणारे मतभेद विकोपाला जाणार नाहीत. ता. २४।२५।२६ या दृष्टीने वाईट जातील. २७।२८ धनयोग होईल. २९।३० चांगले दिवस आहेत.

कन्या : या सप्ताहातील ग्रहमान सौख्यकारक आहे. शनी आठवा, मंगळ सातवा, राहू सहावा, रवी – शुक्र पाचवे, बुध चौथा व गुरू दुसरा असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. फक्त अष्टमातील शनी विद्याभ्यासात अपयश व संततीशी मतभेद निर्माण करील. गुरू-शनी पाहात असल्यामुळे त्याचा त्रास होणार नाही. गुरू-शनीची फळे मूळ कुंडलीतील गुरू – शनीच्या फळांच्या बरोबर उलट असतात. कुंडलीतील (मूळ) गुरु त्या स्थानाचा नाश करतो तर गोचरी गुरु त्या स्थानाचा उदय करतो. उलट मूळ कुंडलीत शनी ज्या स्थानात असतो त्याच्यासमोरच्या स्थानाचा नाश करतो; पण गोचरी ज्या स्थानात जातो त्या स्थानाचा नाश करतो. गोचरी शनीचे अष्टम स्थानाचे फळ वाईट मिळत नाही, तसेच गोचरी धनस्थानातील गुरूचे फळ चांगले मिळते. शत्रूंचा नाश व अचानक धनलाभ होईल. २४।२५।२६ चंद्राचे भ्रमण व्ययस्थानातून होत असल्यामुळे मानसिक यातना, मित्रांकडून फसवणूक व धनलाभात अडथळे उत्पन्न होतील. ता. २७ ते ३० फारच चांगल्या आहेत.

तूळ : या सप्ताहातील ग्रहमान भोगदायक आहे. लग्नी गुरू, तिसऱ्या स्थानात बुध, चतुर्थात रवी-शुक्र, पचमात राहू, षष्ठात मंगळ व सप्तमात शनी असा माला योग झालेला आहे. शिवाय चंद्राचे भ्रमण अकरा, बारा व प्रथमस्थानातून आहे. पैकी ता. २७, २८ या दिवशी सार्वजनिक कार्यकर्त्यांना अत्यंत अडचणीची परिस्थिती निर्माण होईल. पण सहावा मंगळ त्यावर मात करील. विशेषत: स्त्री कार्यकर्त्यांना जास्त त्रास होईल. सरकारी व सहकारी कामात बाकीच्या दिवशी यश येईल. विद्याभ्यासात अडथळे निर्माण होतील. विशेषत: सायन्सच्या विद्यार्थ्यांना जास्त त्रास होईल. सर्जन लोकांच्या हातून अवघड ऑपरेशन्स यशस्वी होतील. या राशींच्या व्यक्तीत राम आणि रावण दोन्ही असू शकतात. एक विद्वान पण अनीतीमान, दुसरा ज्ञाता असून सद्‌गुणी भागीदारांशी व पत्नीशी जमणार नाही. सार्वजनिक कामात भरघोस यश मिळेल.

वृश्चिक : या सप्ताहातील ग्रहमान कष्टदायक आहे. गुरु बारावा, बुध दुसरा, रवी-शुक्र तिसरे, राहू चवथा, मंगळ पाचवा, शनी सहावा असे ग्रह आहेत. धन व सुखाचा नाश होईल. विद्याभ्यासात त्रास होईल. भावंडाशी मतभेद. चंद्राचे भ्रमण दशम, एकादश व द्वादश स्थानातून आहे. पैकी २४, २५, २६ भाग्येश चंद्र राहूसमोर येतो. त्यामुळे मनस्वास्थ्य बिघडेल; धडाडीची कामे अगर भाग्योदयकारक गोष्टी होण्याला विलंब लागेल. शेवटचे चार दिवस २७ ते ३० यशदायी आहेत. स्त्रियांकडन फायदा होण्याचा योग आहे. वयाचे ४२ च्या पुढील व्यक्तींना अचानक धनलाभ होईल. घराचे व्यवहार निर्विघ्न पार पडतील. वृश्चिक राशीची माणसे मनाची अत्यंत हलकी असतात. त्यांना आधी भौतिक जगाशिवाय काहीच समजत नाही. स्वार्थ हेच त्यांचे ध्येय. राजकारणात व इतर सार्वजनिक कार्यात भरघोस यश येईल.

धन : या सप्ताहातील ग्रहमान भोगदायक आहे. बुध लग्नी, धनस्थानात रवी-शुक्र, राहू तिसऱ्या स्थानात, मंगळ चतुर्थात, शनी पंचमात व अकरावा गुरू शिवाय गोचरी चंद्राचे भ्रमण नऊ, दहा व अकराव्या स्थानातून होत आहे. प्रवासात लाभ होईल. सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. विद्याभ्यासात खंड पडेल. मंगळाचे मागे शुक्र मकरेत आहे व सप्तमेश लग्नी आहे. त्यामुळे प्रेम प्रकरणात जोडीदाराकडून विचारणा होईल. स्त्रीला पुरुष मित्राकडन व पुरुषाला स्त्री मित्राकडून. ज्यांची वये २७ ते ३२ आहेत त्यांना हा योग विशेष आहे. अर्थात दोन्ही व्यक्ती बुद्धिमान-कलावान असतील. ज्यांचे आधीच प्रेमविवाह झाले असतील त्यांना सबंध आठवडा आनंदात जाईल. अचानक धनलाभ ता. २९-३० ला होईल. सर्व आठवडा यशदायी-धनदायी व आनंदकारक आहे.

मकर : या सप्ताहातील ग्रहमान शुभफलदायी आहे. रवी-शुक्र लग्नात, राहू

धनस्थानात, तृतीयात मंगळ, चतुर्थात शनी, दशमात गुरू व व्ययात बुध. चंद्राचे भ्रमण अष्टम, नवम व दशमातून आहे. सुखनाश होईल. व्यक्तीच्या हट्टी व आग्रही स्वभावाने सरकारी व सहकारी कामात अपयश. फॅन्सी वस्तूंचा व्यापार–विशेषतः एजंट म्हणून काम करणारांना भरपूर फायदा होईल मकर लग्नाचा एक केंद्र त्रिकोणाधिपती राजयोगकारक ग्रह लग्नी आहे. तो फार चांगला आहे. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना संतती योग आहे. भावंडांशी मतभेद होतील. स्वभावात चिडखोरपणा येईल. संयम पाळणे जरूर आहे. यावर उपाय दररोज १०८ महामृत्युंजयाचा मंत्र स्नान करताना जपावा. ता. २७ ते ३० शुभ दिवस आहेत.

**कुंभ :** या सप्ताहातील ग्रहमान सर्व बाजूंनी शुभ आहे लग्नी राहू, धनस्थानात मंगळ, तृतीयात शनी, व्ययात रवी–शुक्र, एकादशात बुध व नवमात गुरू. याशिवाय चंद्राचे भ्रमण सप्तम, अष्टम व नवमस्थानातून आहे. २४, २५, २६ तारखांना चंद्र राहूसमोरून व केतूवरून जातो आहे. त्याचे फल ४२ वर्षांच्या आतील व्यक्तींच्या गृहसुखाला बाधा आणणारे आहे. पत्नीशी व भागीदारांशी हट्टी स्वभावामुळे मतभेद होईल. अर्थात भाग्यातील कारक गुरू त्याची तीव्रता कमी करील. जमिनीचे किंवा घराचे व्यवहार पुढे टाकावे. सरकारी कामात अपयश येईल. विद्याभ्यासात यश मिळेल. लेखकांच्या हातून साहित्यसेवा होईल. ३२ ते ३६ वयाच्या व्यक्तींना धनलाभ चांगलाच होईल. या राशीच्या व्यक्तीत एक दोष असतो. ते सर्व जगाशी चांगले वागतात, पण घरच्या माणसांशी अगर स्वजनांशी त्यांचे जमत नाही. यावर उपाय–त्यांनी दररोज चंद्रदर्शन करावे. शुभ तारखा २७ ते ३०.

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान सुखकारक आहे. पहिला मंगळ, दुसरा शनी, बारावा राहू, अकरावे रवी–शुक्र, दहावा बुध व आठवा गुरू. याशिवाय चंद्राचे भ्रमण सहा, सात व आठव्या घरातून आहे. ता. २४, २५, २६ सुखात व्यत्यय, घेणेदारांकडून त्रास व मानसिक अस्थिरता. २७ ते ३० दिवस धनदायक व भाग्य वाढविणारे आहेत. भाग्येश व धनेश मंगळ लग्नी आहे. तो पैशाच्या सर्व अडचणी दूर करील. स्त्रियांकडून भरपूर धनलाभ होईल. लग्नेश व दशमेश गुरू अष्टमात आहे. त्यामुळे मानमरातबाला कमीपणा येईल. पण गुरू हा शुभ ग्रह आहे व शिवाय भाग्येश मंगळ लग्नी आहे. रवी–शुक्र अकरावे आहत ते बचाव करतील सरकारी, सहकारी कामात यश मिळेल. थोडासा मूत्र विकाराचा त्रास होईल. गुरूची वाईट फळे कमी होण्याकरिता शुक्रवारचे २७ उपवास करावेत. गजांत लक्ष्मीच्या तसबिरीला दर शुक्रवारी हार घालावा. □ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

...मुखपृष्ठ २ वरून

वाचक म्हणून तन्मय होतो आणि राजा म्हणून त्याला मुजरा करतो...आणि कधी कधी तर चक्क फ्रीस्टाईल कुस्त्या (हो हो ! फ्रिस्टाईल कुस्त्याच) बघायला जातो आणि घसा बसेपर्यंत उत्तेजनवजा आरडाओरडा करतो, संतापतो, सचिंत होतो, हर्षभरीत होऊन नाचतो आणि इतर करीत असलेली खुर्च्यांची फेकाफेक आणि मोडतोड जीव लावून पाहत राहतो ...

रोजच्या जीवनातील ह्या हरप्रकारच्या घटनांनी त्याच्या मनात नाना तरंग उठतात आणि ते तरंग हा माणूस मोठ्या आकर्षकपणे अभिव्यक्त करतो. असे जगण्यातच माणूसपण आहे असा त्याचा मनोमन विश्वास आहे. नव्हे ह्या विश्वासाच्या आधारावर त्याने 'कोवळी उन्हे' आणि 'रातराणी' ही सदरे लिहायला सुरुवात केली.

अशा माणसाचे आणि आम्हा मराठी माणसांचे ह्या दोन्ही सदरातून फार घनिष्ठ आणि खासगी संबंध जुळले होते. वाटत होते की विजय तेंडुलकर आपल्यातलेच आहेत, नव्हे आपलेच आहेत. पण परवा 'शांतता! कोर्ट चालू आहे' या नाटकाबद्दल भारतीय नाट्यसंघाने ५ हजार रुपयांचे 'कमलादेवी चट्टोपाध्याय' पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला. इतकेच नव्हे तर त्या नाटकाचा सर्व भारतीय भाषांतून अनुवादही करण्याचे ठरवले. त्यामुळे, फार फार आनंद झाला आणि फार फार वाईटही वाटले. वाटले की हा माणूस पुन्हा नाटकांकडे वळणार, वळो बिचारा. आम्हाला मात्र खरेखुरे विचारले तर आम्ही सांगू की, नाटककार तेंडुलकरांबद्दल आपल्याला आदर आहे, पण जवळीकमात्र रातराणीवाल्या, कोवळी उन्हेवाल्या, तेंडुलकरांशी आहे. नाटककार तेंडुलकरांना आमचा हात त्रिवार मुजरा करील पण तोच हात रातराणीवाल्या तेंडुलकरांच्या पाठीवर थाप मारण्यासाठी पुढे होईल आणि अशा माणसाच्या हातात हात घालून हे आडवेतिडवे जीवन लाखलाखदा जगण्यासाठी आम्ही धडपडून उठू.

— देवीदास बागल

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




" हां, आस्ते, आस्ते साहेब ! गांधी-राग हा रचला आहे तो महात्मा गांधींवरून; इंदिरा गांधींवरून नाही. अन् समाजवादाशी त्याचा काही संबंध नाही ... "